# माणूस

## स्त्री मुक्ती झिंदाबाद ! !

समस्त जनतेला आम्ही आवाहन करतो–एक होऊन निषेध करा.

कलेच्या आणि करमणुकीच्या नावाखाली स्त्रीचे बीभत्स प्रदर्शन करणाऱ्यांचा धिक्कार असो !

स्त्रीला बाजारातील वस्तू बनवून आपली तुंबडी भरणाऱ्या 'सत्यं शिवं सुंदरम्'सारख्या चित्रपट–निर्मात्यांचा निषेध करा !

ग्रामीण, श्रमिक स्त्रीचे विकृत चित्रण करणाऱ्यांचा धिक्कार असो !

अशा चित्रपटांना परवानगी देणाऱ्या सेन्सॉर बोर्डाचा निषेध करा !

आपला माल विकून जास्तीत जास्त नफा उकळण्यासाठी स्त्रीच्या शरीराचे प्रदर्शन करणाऱ्यांचा धिक्कार असो !

जनतेच्या अंधश्रद्धा आणि स्त्रीच्या शोषित व्यक्तित्वाची प्रतिमा कायम ठेवणाऱ्यांचा निषेध करा !

या सर्व प्रवृत्तींना उत्तेजन देणाऱ्यांचा धिक्कार असो !

या मोहिमेतील प्रतीकात्मक कृती म्हणून रविवार ९ जुलै १९७८ रोजी पुण्यातील खालील स्त्रीसंघटना आणि इतर पुरोगामी संघटना यांनी मिळून एक मोर्चा काढला.

– पुरोगामी स्त्री संघटना
– वल्लभनगर महिला मंडळ
– कामगार महिला आघाडी, कासारवाडी
– पूना युनिव्हर्सिटी विमेन्स असोशिएशन
– अखिल भारतीय स्त्री शक्ति संघटना
– अखिल भारतीय कस्तुरबा स्मारक निधी
– सावित्रीबाई फुले मंडळ, पांडवनगर
– समाजवादी महिला सभा
– महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन
– श्रमिक महिला समिती
– पुणे विद्यापीठ विद्यार्थी संघटना
– युवक क्रांती दल
– पुणे शहर युवा जनता
– ऑल इंडिया यूथ फेडरेशन, पुणे शाखा
– नवनिर्माण संघटना, पिंपरी–चिंचवड
– नगरपालिका कामगार आघाडी, पिंपरी–चिंचवड
– सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स, पुणे शाखा
– पुणे महानगर पालिका कामगार युनियन
– समाज परिवर्तन संस्था
– भाडेकरू पंचायत, पिंपरी–चिंचवड

**हा मोर्चा कसा निघाला ? एक प्रतिक्रिया ...**

पृष्ठ ...... २२

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक सातवा

१५ जुलै १९७८

मूल्य ७५ पैसे



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४४३४५९

¤


# सप्रेम नमस्कार

¤ आपल्या १७ जून १९७८ च्या अंकातील 'दक्षता समिती व प्रकल्प समिती' या लेखात असा उल्लेख आहे की, 'झोत' हे पुस्तक जनता पक्षाच्या राजकीय परिषदेत विकायला मनाई करणारा ठराव पक्षाच्या कार्यकारिणीने केला होता. हे खरे नाही. पक्षाच्या कुठल्याही पातळीवरील कार्यकारिणीने हा ठराव केलेला नव्हता. जनता पक्षाचा स्वतःच्या पुस्तक–विक्रीचा जो स्टॉल असेल त्यावर पक्षाच्या प्रकाशनांवर इतर कुठलीही पुस्तके विक्रीस ठेवायची नाहीत, असे ठरले होते आणि इतरांनी आपले पुस्तक-विक्रीचे स्टॉल लावण्यापूर्वी श्री. राजन अन्वर यांची परवानगी घ्यावी, अशी सूचना बोर्डावर लिहून ठेवली होती.

३०।६।७८ **पन्नालाल सुराणा**

[वरील लेखातील उल्लेख दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या वार्तांवर आधारित होता. उदाहरणार्थ :

'नंतर श्री. कोटेचा तेथून निघून गेले व आवाराबाहेर एक फलक लावून त्यांनी परवा जयप्रकाशनगरात विक्रीवर बंदी घालण्यात आलेले श्री. रावसाहेब कसबे यांचे 'झोत' हे पुस्तक विकण्यास प्रारंभ केला ...'

...केसरी १० जून.

सकाळ, तरुण भारत या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वार्ताही पुस्तकविक्रीवर काही बंधने असल्याची समज करून देणाऱ्या होत्या.]

¤ आपल्या कुशल संपादनाचा पुन्हा एकदा अनुभव! (बरसात विशेषांक १ जुलै १९७८) वर्षारंभ अंक म्हणून एक लेखकी अंक वाचून समाधानाची पावती देतो न देतो तोच हा अंक मिळाला. माणसाच्या जीवनाची समृद्धी–सफलता विविध रसांचा, विषयांचा आस्वाद, अनुभव घेण्यात आहे. माणूस हे ह्या अर्थी नाव सार्थ करणारे साप्ताहिक म्हणून मराठी पत्रसृष्टीत आपले नाव कायम करील, ह्यात शंकाच नाही.

आपणच अपेक्षा वाढविता म्हणून काही इच्छा प्रकट करतो. ह्यानंतर आपल्या योजनेनुसार प्रा. ना. सी. फडके विशेषांक काढावा. तसे मराठी साहित्यात मातब्बर लेखक अनेक आहेत; परंतु वयाने आणि कर्तृत्वाने अग्रणी ठरावे असे नाव चट्कन आठवले म्हणून सुचविले.

केव्हा तरी चित्रपती व्ही. शांताराम यांच्यावरही विशेषांक काढावा ही विनंती.

राजकपूर आणि शांताराम (दोन 'शो'मन) ह्या लेखात ह्या दोघांची तुलना करण्याचा प्रयत्न केला आहे. व्ही. शांताराम इतर क्षेत्रात (चित्रपटाच्या) श्रेष्ठ असले तरी मालक म्हणून त्यांचे वर्तन आणि राजकपूरचे मालक म्हणून वर्तन यांचाही उल्लेख आला असता तर बरे झाले असते. राजकमलला कलावंतांचे थडगे म्हणतात. आर. के. बद्दलही तसेच आहे का? इतर कलाकारांना वाव देणे, त्यांच्यातील गुणांना उजाळा देणे ह्याबाबतीत तुलना झाली असती तर बरे झाले असते.

पुन्हा एकवार ह्या दोन विशेषांकांबद्दल धन्यवाद.

**चंद्रशेखर र. राजे**

३ जुलै डोंबिवली

¤ आपला दि. १–७–७८ चा 'बरसात' विशेषांक वाचला आणि अतीव दुःख झाले आणि 'माणूस'चा एक अंक फुकट (waste) गेला असे वाटले.

ज्यांनी सत्याच्या शोधासाठी आपले आयुष्य वेचले, शिवासाठी उपासना केली आणि मानवी जीवन सुंदर बनविण्यासाठी सतत धडपड करीत आहेत त्याबद्दल हा अंक असता तर फारच छान झाले असते.

**अविनाश मोरेश्वर मराठे,**

३ जुलै वसई

¤ राजकपूर विशेषांक वाचला.

आपल्याकडे To supply according to

पृष्ठ २२ वर

राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

# जनता पक्षाच्या बलस्थानाचा प्रत्यय

राजधानीत आठ दिवस धुमाकूळ घालणारे वादळ विरून गेले आहे. मध्यंतरी या वादळाने इतका विलक्षण वेग घेतला होता की, जनता पक्ष मुळापासून दुभंगून जातो की काय, अशी भीति वाटत होती. चरणसिंगांच्या संतापातूनच या वादळाचा उद्भव झाला आणि त्यांनी समजूतदारपणा दाखविला म्हणूनच त्याचा निचरा झाला. १७ जुलैचा संकल्पित किसान मेळावा आपण रद्द करीत आहोत, असे त्यांनी जाहीर करताच परिस्थितीचा ताण एकदम सैल झाला. कारण जनता पक्षाचे विभाजन हा केवळ त्या पक्षापुरता मर्यादित प्रश्न नव्हता. यापूर्वी राजकीय पक्ष फुटले नव्हते असे नाही. समाजवादी पक्षाचे प्रजासमाजवादी आणि संयुक्त समाजवादी असे दोन गट पडले होतेच की! मॉस्को आणि पेकिंग यापैकी कोणाशी निष्ठा बाळगायची, यासंबंधी वाद होऊन कम्युनिस्ट पक्षाची उजवी आणि डावी अशी विभागणी झाली. कॉंग्रेसचे तर आठ वर्षांत दोन वेळा विभाजन झाले. या सगळ्या घटना राजकीय दृष्टीने महत्त्वाच्या असल्या तरी लोकांना त्यात रस नव्हता. जनता पक्ष जन्माला आला तोच मुळी असाधारण परिस्थितीमध्ये. म्हणूनच लोकांनी त्याला दोन महिन्यांच्या आत केंद्रीय सिंहासनावर आरूढ केले. इंदिरा गांधींच्या हुकूमशाहीचे आव्हान स्वीकारण्यासाठी हा पक्ष उभा राहिल्यामुळेच त्याला हे अनपेक्षित यश प्राप्त झाले. त्या निवडणुकीत इंदिरा गांधींचा विजय झाला असता तर आणीबाणीतील अत्याचारांची प्रकरणे उजेडात आलीच नसती! इतकेच नव्हे तर देशाला इंदिराजींसमवेत संजयचे उन्मत्त वर्तनही सहन करावे लागले असते. जनता पक्षाची ही ऐतिहासिक कामगिरी अजून पूर्ण झालेली नाही. कारण सत्तेवर यायचा इंदिरा गांधींचा खटाटोप अजूनही चालू आहे. यदाकदाचित त्यांना या कारवाईमध्ये यश मिळाले तर त्या पहिल्यापेक्षाही अधिक सूडबुद्धीने वागून मधल्या काळात जी बदनामी सहन करावी लागली तिचे उट्टे काढण्याचा पवित्रा घेतील. म्हणून त्यांचा पूर्णपणे राजकीय अस्त होईपर्यंत जनता पक्षाला आपले एकसंघ स्वरूप टिकवून धरलेच पहिजे. तशी त्याने शपथ घेतली म्हणून तर लोकशाहीसंबंधी आस्था असलेल्या लोकांना जनता पक्षासंबंधी ममत्व वाटते. इतर पक्षांच्या विभाजनाच्या वेळी उदासीन असलेले लोकमत या वेळी अस्वस्थ झाले होते ते त्यामुळेच.

मोरारजी देसाई यांनी आपला राजीनामा मागितला म्हणून आधीच संतप्त असलेल्या चरणसिंगांच्या प्रक्षोभाची धग वाढणे स्वाभाविक होते; परंतु अशा वेळीच संयमाची आणि विवेकाची गरज असते. चरणसिंगांच्या स्वभावात हे घटक नसल्यामुळे त्यांच्या मित्रांनी ही जबाबदारी पार पाडायला हवी होती; परंतु ते चरणसिंगांपेक्षाही उतावीळ झाले. चंद्रावती किंवा देवीलाल यांची भाषणे विवेकशून्यता दाखवणारीच होती. मंत्रिमंडळातून आपल्याला काढून टाकण्यामागे काही वरिष्ठ नेत्यांचा कट होता, असे चरणसिंग म्हणाले ते समजण्यासारखे होते; परंतु देवीलाल यांनीही तोच आरोप करून आणि चंद्रावती यांनी तीस लाख शेतकऱ्यांना दिल्लीत गोळा करण्याचा संकल्प सोडून वरिष्ठ नेतृत्वाला अडचणीत आणण्याचा जो प्रयत्न करून पाहिला तो निश्चितच त्यांच्या कुटील मनोवृत्तीचा निदर्शक होता.

मोरारजीभाईंनी राजीनामा मागताच चरणसिंगांनी तो दिला, त्याबाबत त्यांनी काहीही खळखळ केली नाही, याचेच देवीलाल–चंद्रावती यांनी कौतुक केले. चरणसिंगांनी राजीनामा द्यायचे नाकारले असते तर त्यांचेच हसे झाले असते. राजीनामा दिल्यानंतर संसदीय जनता पक्षाची बैठक होईपर्यंत चरणसिंगांनी मौन पाळले असते तर त्यांची प्रतिष्ठा वाढली असती. त्याऐवजी त्यांनी इंदिरा गांधींच्या तंत्राचा अवलंब केला. दररोज आपल्या निवासस्थानी ते समर्थकांचे मेळावे भरवू लागले आणि त्यांच्यासमोर आपल्या मनातील मळमळ ओकू लागले. 'आपल्यामुळे मोरारजीभाई पंतप्रधान होऊ शकले', हे वाक्य तर त्यांनी या काळात अनेकदा उच्चारले. चरणसिंगांनी जगजीवनराम यांच्या उमेदवारीला विरोध केला म्हणून मोरारजी देसाई पंतप्रधान झाले, हे तर खरेच आहे; परंतु तसे करताना चरणसिंगांनी स्वतःचीही सोय पाहिली होती. जगजीवनराम पंतप्रधान झाले असते तर हेमवतीनंदन बहुगुणा यांचे प्रस्थ भलतेच वाढले असते. चरणसिंग आणि बहुगुणा हे दोघे उत्तर प्रदेशच्या राजकारणातील एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी. जगजीवनरामांनी आपल्या मंत्रिमंडळात बहुगुणा यांना गृहमंत्री केले असते. चरणसिंगांना नेमके तेच टाळावयाचे होते; म्हणून त्यांनी घाईघाईने जयप्रकाशनारायण यांना चिठ्ठी लिहून मोरराजी देसाई यांनाच पंतप्रधान करण्याची सूचना केली. अशी परिस्थिती असताना, चरणसिंगांना, आपण पाठिंबा दिला म्हणून मोरराजीभाई पंतप्रधान झाले, अशी फुशारकी मारण्याचे काहीच कारण नाही.

कांतिलालच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यासाठी आयोग नेमा, अशी आपण मागणी केली म्हणून मोरारजीभाई बिथरले आणि तेव्हापासून आपल्याला मंत्रिमंडळातून काढून टाकण्यासाठी ते निमित्त शोधू लागले, हा चरणसिंगांचा आरोपही निरर्थक आहे. कांतिलाल म्हणजे काही संजय गांधी नाही. आपल्या वडिलांच्या स्थानाचा फायदा कांतिलालने अगदीच घेतला नसेल असे नाही; परंतु म्हणून त्याला संजयच्या रांगेत बसविण्यात चरणसिंग त्याच्यावर आणि मोरारजीभाईंवर अन्याय करीत आहेत. संजयने सार्वजनिक जीवनातील किमान सभ्यताही धुडकावून दिली होती. मारुती

लिमिटेडच्या निमित्ताने त्याने बेकायदेशीर दडपणं आणून कोटचवधी रुपये गोळा केले आणि ते कारखान्यात न गुंतविता स्वतः गिळंकृत केले. याहीपेक्षा संजयच्या हातून भयानक अपराध घडलेला आहे. दिल्लीत त्याने आणि त्याच्या अर्जुनदासासारख्या गुंडांनी आणीबाणीत एवढा हैदोसघुल्ला घातला होता की सूर्यास्तानंतर एकटचादुकटचा तरुणीस बाहेर पडायची हिंमत होत नव्हती. अशा या महाप्रतापी संजयच्या व्यवहारांची चौकशी करण्यासाठी आयोग नेमणे आवश्यकच होते. तोच न्याय चरणसिंग जर कांतिलालला लावू पहात असतील तर मग कदाचित त्यांचे आप्तस्वकीयही अशा चौकशीपासून अलिप्त राहू शकणार नाहीत. मीरत येथील पृथ्वीनाथ सेठ या व्यापाऱ्याचे वैभव वाढविण्यात आपला मुळीच हातभार लागलेला नाही असे चरणसिंग शपथेवर सांगू शकतील काय ?

त्यामुळे चरणसिंग मोरारजींवर कटाचा आणि सूडबुद्धीचा जो आरोप करीत होते त्यामध्ये वैतागाचाच भाग अधिक होता. एवढे आरोप करूनही मोरारजीभाई नमत नाहीत, असे आढळून आल्यानंतर चरणसिगांनी किसान मेळाव्याचे शस्त्र वापरण्याचे ठरविले. हे मेळावे स्वयंस्फूर्त नसतात; भाडोत्री वाहनांतून भाडोत्री माणसे आणून दबावाचे वातावरण निर्माण करायचे, हा अशा मेळाव्यांचा एकमेव हेतू असतो. काही काळ हे मेळावे उपयोगी पडतात, हे इंदिरा गांधींनी अनुभविले आहे. चरणसिगांना आपले बलप्रदर्शन करण्यासाठी त्यांना इंदिरा-तंत्राचाच अवलंब करण्याची गरज भासली. यावरून बाजू आपल्यावर उलटत चाललेली आहे हे त्यांना जाणवले होते, हेच दिसून आलें. या किसान मेळाव्याशी आपला काहीही संबंध नाही असा आभास निर्माण करण्यासाठी त्यांनी 'किसान संमेलन' या तथाकथित संघटनेला पुढे केले. किसान संमेलन अशी संघटना अस्तित्वातच नाही. गेल्या डिसेंबरमध्ये आपला वाढदिवस थाटाने साजरा व्हावा म्हणून चरणसिगांनी दिल्लीत किसान मेळावा भरविला होता. शेतकरी आपणहोऊन या मेळाव्यात सहभागी झालेले आहेत, हे दाखविण्याकरिता 'किसानसंमेलन' हे नाव स्वीकारण्यात आले. या किसानसंमेलनाचे सूत्रधार आहेत तरी कोण ? राजनारायण आणि चंद्रावती.म्हणजे चरणसिगांचीच माणसे.

हे असे भाडोत्री मेळावे भरवायचे ठरविले की, राज्यसरकारांची मदत घ्यावी लागते. त्याशिवाय हजारो मालमोटारी उपलब्ध होऊच शकत नाहीत. उत्तर प्रदेश आणि बिहार येथल्या मुख्यमंत्र्यांचा या किसानमेळाव्याला पाठिंबा असला तरी ते उघडपणे त्यात भाग घेऊ शकत नव्हते. कारण त्यांना आपले आसन अस्थिर करून घ्यायचे नव्हते. देवीलाल तेवढे उत्साहाने किसान मेळाव्याची तयारी करू लागले. त्यांची अशी कल्पना होती की, आपण कसेही वागलो तरी आपले मुख्यमंत्रिपद धोक्यात येणार नाही; परंतु हरयाना विधानसभा जनता पक्षातील ७९ सदस्यांपैकी फक्त ३१ जणच आपल्या पाठीशी उभे राहिले आहेत, हे पाहिल्यानंतर देवीलाल यांचे पहिले अवसान गळले आणि ते वाटाघाटींना तयार झाले. आपण किसान मेळावा रद्द करीत आहोत, असे त्यांनी जाहीर केले. त्या बदल्यात त्यांनी हरयाना विधानसभा जनता पक्षाची बैठक गुंडाळून ठेवण्याचा मनसुबा सिद्धीला नेला; परंतु दुसऱ्या दिवशी पुन्हा किसान मेळाव्याचा विषय निघालाच. तीन दिवसांत सर्व प्रश्न वाटाघाटींनी सोडविण्यात आले नाहीत तर आपण मेळावा घेऊच, असे चरणसिगांनी सांगून टाकले.

ही तीन दिवसांची मुदत त्यांनी आदल्या दिवशी घातलेली नव्हती. त्या वेळी त्यांना घाई होती ती हरयाना विधानसभा जनता पक्षाची बैठक रद्द करून घेण्याची. तो डाव यशस्वी झाल्यानंतर चरणसिंगगटाने आपले मूळ रूप पुन्हा प्रकट केले. चरणसिगांनी अशी आयत्या वेळी धोकेबाजी केल्यामुळे, एकजुटीचे प्रयत्न करणाऱ्यांची पंचाईत झाली. मात्र त्यांनी, या वेळी नमते घ्यायचे नाही असे ठरविले. चरणसिगांना त्या तीन दिवसांमध्ये आपल्या मंत्रिपदाचा प्रश्नही सोडवून घ्यायचा होता. त्या बाबतीत पंतप्रधान या नात्याने मोरारजीभाईच निर्णय करू शकतात; फक्त पक्षीय पेचप्रसंगच आपण हाताळू शकतो, असे संसदीय मंडळाने एकमताने चरणसिगांना कळविले. संसदीय मंडळातील काही जण आपल्या हट्टाचा पुरस्कार करतील असा जो चरणसिगांचा कयास होता तो चुकल्यामुळे त्यांना अखेरीस किसान मेळाव्याचा बेत विनशर्त मागे घ्यावा लागला.

आपण सध्या घेत असलेली माघार तात्पुरती आहे असे दाखविण्याचा चरणसिगांकडून प्रयत्न होत राहील. जोपर्यंत केंद्रीय मंत्रिमंडळात पुनश्च प्रवेश होत नाही तोपर्यंत भारतीय लोकदलाच्या या सरदार पटेलांची बेचैनी नाहीशी होणार नाही. मोरारजीही त्यांना मंत्रिमंडळात घ्यायला विरोध करतील अशी शक्यता नाही; परंतु पंतप्रधानांनी सर्व महत्त्वाचे निर्णय आपल्याला विचारून केले पाहिजेत, ही अट चरणसिगांनी मागे घेतल्याशिवाय मोरारजीभाई त्याबाबत कोणतीच हालचाल करणार नाहीत. कारण चरणसिगांनी या मधल्या आठ दिवसांमध्ये मोरारजीभाईंचे आसन अस्थिर करण्याचा आपल्या परीने शर्थीचा प्रयत्न करून पाहिला; परंतु मंत्रिमंडळाने आणि संसदीय मंडळाने मोरारजीभाईंच्या भूमिकेचा पाठपुरावा केल्यामुळे चरणसिगांचे मनोरथ वाऱ्यावर उडून गेले. चरणसिगांच्या काही किरकोळ मागण्या मान्य होतीलही; पण त्यांना खरी आच लागली आहे ती उपपंतप्रधानपदाची. मोरारजीभाईंविरुद्ध उघड बंड करून आणि त्यांच्या बदनामीची मोहीम प्रवर्तित करून चरणसिगांनी स्वतःचेच नुकसान करून घेतले आहे. आपण तशीच वेळ आली तर जनता पक्षातून बाहेर पडू आणि नवा पक्ष स्थापन करू अशी ते धमकी देत असले तरी तेवढे बळ त्यांच्या दुर्बळ शरीरामध्ये उरलेले नाही आणि प्रकृती साथ देत नसताना, चरणसिगांनी आपल्या महत्त्वाकांक्षेला लगाम घातला असता तर त्यांचा दबदबा कायम राहिला असता. राजनारायण आणि देवीलाल यांचे सल्लागार भोवती असताना चरणसिगांना आपल्या मर्यादित सामर्थ्याचे मोजमाप करता येणे शक्यच नव्हते.

मोरारजीभाईंनी या काळात कोणत्याही वैयक्तिक वादंगात भाग घेतला नाही. संसदीय मंडळ आणि मंत्रिमंडळ यांच्या बैठकीतच काय ते आपले मत मांडीत होते. त्यांनी चरणसिंग-प्रकरणाबाबत जी निग्रही भूमिका स्वीकारली ती कायम राखली. त्यामुळे त्यांचे स्थान पहिल्यापेक्षा अधिक घट्ट झाले. चरणसिगांना जे नको होते तेच घडून आले. लढाई सुरू करताना ती केव्हा थांबवायची याचे सेनानीला आपल्या मनाशी गणित मांडावे लागते. चरणसिगांना एवढी घाई झालेली होती की, तसे गणित करायची त्यांना गरजच वाटली नाही. म्हणूनच त्यांनी निर्माण केलेल्या वादंगामुळे, जनता पक्षाचे मर्मस्थान जसे दिसून आले तसेच त्याच्या बलस्थानाचेही दर्शन घडले. हा अनुभव जनता पक्षाला यापुढील वाटचालीमध्ये खूपच उपयोगी पडेल. □

# जनता पक्ष

## नुसते 'एकदल' नको 'एकदिल' हवे

वा. दा. रानडे

जनता पक्षांतील पेचप्रसंगावर हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत तोड निघाली असेल किंवा नसेल. पक्षातील सर्व घटकांनी एकदिलाने कार्य करण्यानेच मतदारांनी टाकलेली जबाबदारी पक्ष यशस्वीपणे व आत्मविश्वासाने पार पाडील. पेचप्रसंगावर तात्पुरती तोड न काढता अशी परिस्थिति पुन्हा उद्भवू नये यासाठी सरकारच्या आणि पक्षाच्या कार्यपद्धतीचे काही संकेत पाळले पाहिजेत. यापूर्वीच्या एका लेखात अशा काही संकेतांचा विचार मी केला होता. या पेचप्रसंगाच्या निमित्ताने त्यासंबंधी आणखी थोडे चिंतन.

पहिला प्रश्न सरकारी पातळीवरील प्रश्न आणि पक्षपातळीवरील प्रश्न असा काही वेगळा विचार करायला हवा का ? सध्याच्या पेचप्रसंगात तसा वेगळा विचार झालेला दिसतो. सरकारी पातळीवरील प्रधान आचार्य कृपलानी आणि जयप्रकाश यांनी मध्यस्थी करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. या दोन नेत्यांनाही तसे करणे आवडणार नाही, असे मत पंतप्रधान मोरारजीभाईंनी व्यक्त केले; पण कृपलानींनी याबाबत मोरारजींवर टीका केली आहे. चंद्रशेखर यांनीही मध्यस्थीस नकार दर्शविला. त्यांना तर पक्षपातळीवरील प्रश्नातसुद्धा या दोन नेत्यांची मध्यस्थी नको होती; पण त्यांचा जरूर वाटल्यास सल्ला घ्यावा, हे त्यांनी अखेर मान्य केले राज्यघटना आणि पक्षघटना यांच्या काटेकोर दृष्टिकोनातून मोरारजीभाई व चंद्रशेखर यांची भूमिका बरोबर असली तरी कृपलानी व जयप्रकाश यांच्या मध्यस्थीस त्यांनी नकार द्यावा ही गोष्ट अनेक कार्यकर्त्यांना खटकली. आपसातल्या वादात बाहेरचा लवाद नेमण्याचा हा प्रश्न नाही. हे दोन ज्येष्ठ नेते पक्षाच्या दैनंदिन राजकारणात लक्ष घालीत नसले तरी ते काही बाहेरचे लवाद नव्हेत. पक्षस्थापनेपासून ते पक्षाशी निगडित आहेत. पक्षातील कोणत्याही गटाशी ते बांधलेले नसल्याने गटाच्या संकुचित दृष्टिकोनाऐवजी व्यापक पक्षहिताच्या व राष्ट्रहिताच्या भूमिकेतूनच त्यांचा सल्ला राहील. असा सल्ला उपलब्ध असताना तो न घेणे योग्य नाही.

पक्ष आणि सरकार यांचे द्वैत आणि अद्वैत केव्हा, कसे आणि कोणत्या मर्यादेपर्यंत मानावयाचे याचाही सखोल विचार होणे आवश्यक आहे. कम्युनिस्टपद्धतीत पक्ष आणि सरकार यांचे अद्वैत असते. पक्ष हाच मुख्य; सरकार गौण. सर्व महत्त्वाचे निर्णय पक्षाने घ्यावयाचे. सरकारचे काम फक्त अंमलबजावणीचे. हुकूमशहांच्या राजवटीत हुकूमशहा हाच सर्वसत्ताधीश. पक्ष, सरकार सारे त्याच्या तंत्राने चालतात. आणीबाणीत हा अनुभव आपल्याला आलेलाच आहे. लोकशाहीत पक्ष आणि सरकार यांचे संबंध कसे असतात ? निवडणुकांत बहुमत मिळविणारा पक्ष सरकार बनवितो व पक्षाचे धोरण आणि कार्यक्रम अंमलात आणण्याचा प्रयत्न करतो. पक्षाची कार्यकारिणी ही दैनंदिन कार्याच्या दृष्टीने पक्षाची सर्वश्रेष्ठ संस्था. सत्तारूढ पक्षाच्या कार्यकारिणीचे निर्णय मंत्रिमंडळालाही मानावे लागतात; पण यापलीकडे दैनंदिन सरकारी कारभारात पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हस्तक्षेप करावयाचा नसतो. सरकारी यंत्रणा पक्षहितासाठी राबवावयाची नसते. पक्षाची कार्यकारिणी सर्वश्रेष्ठ असली तरी तिचे निर्णयही लोकशाही पद्धतीने घेतले जातात. एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नावर कार्यकारिणी पक्षशाखांकडून मते मागविते आणि या मतांचा विचार करून निर्णय घेते. कार्यकारिणीचा एखादा निर्णय पसंत नसल्यास सभासदांना मध्यवर्ती समितीच्या किंवा अखिल भारतीय समितीच्या बैठकीची मागणी करून त्याचा फेरविचार करता येतो, पण त्यासाठी सर्वसामान्य कार्यकर्ता जागरूक हवा. तो जेथे जागरूक असतो तेथे सहसा चुकीचे निर्णय घेतले जात नाहीत आणि क्वचित घेतले गेले तरी त्या चुका त्वरित दुरुस्त केल्या जातात.

सत्तारूढ पक्षाच्या धोरणानुसार सरकारचा कारभार सर्वसाधारणपणे चालतो हे खरे; पण पक्षाची सर्वच धोरणे व कार्यक्रम सरकारला अंमलात आणता येतीलच, असे नाही. कारण सरकारी कारभार व कार्यपद्धती घटनेनुसार आणि लोकशाही संकेतानुसार चालते. मंत्रिमंडळाच्या सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वाचा चरणसिंगांनी भंग केला म्हणूनच मोरारजीभाईंनी त्यांचा राजीनामा मागितला. सरकारी पातळीवर लोकशाहीच्या संकेतांचे आणि घटनेचे पालन करण्याची मुख्य जबाबदारी अर्थातच पंतप्रधानांची. ती सर्वांनी मान्य केली पाहिजे.

जनतामधील सध्याच्या पेचप्रसंगात पक्षाच्या कार्यकारिणीला गौण स्थान मिळालेले दिसते. कॉंग्रेस राजवटीत कॉंग्रेसचे अध्यक्ष आणि कार्यकारणीला पंतप्रधानांच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यापलीकडे महत्त्वाचे स्थान नव्हते. कारण ज्येष्ठ नेते मंत्रिमंडळात गेलेले होते. जनता पक्षाची कार्यकारिणी केवळ रबरी शिक्का होऊ नये, अशी दक्षता घ्यायला हवी. शिस्तपालनसमिती नेमली जाईपर्यंत शिस्तभंग प्रकरणांबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारही केंद्रीय संसदीय मंडळापेक्षा कार्यकारिणीला हवा. संसदीय पक्षाची कार्यकारिणीही या पेचप्रसंगात निष्क्रिय असल्याचे दिसते. संसदीय पक्षाबाबतच्या प्रश्नांवर तिचे मत महत्त्वाचे मानायला हवे. मंत्र्यांच्या राजिनाम्यासारखे महत्त्वाचे निर्णयही सभासदांना विशद करण्यासाठी संसदीय पक्षाची खास बैठकही बोलाविण्यात यावी.

आपले मंत्रिमंडळ बनविणे, तसेच पुढे त्यातील काही मंत्र्यांकडून आपणास पाहिजे तसे सहकार्य मिळत नाही असे आढळून आले तर त्यांना वगळून नवे मंत्री नेमण्याची पूर्ण मोकळीक पंतप्रधानांना असली पाहिजे. जनता पक्षाचे मंत्रिमंडळ मोरारजीभाईंनी पूर्णपणे आपल्या मताप्रमाणे बनविले असे म्हणता येईल का ? पक्षातील प्रतिनिधित्व देण्याचा विचार त्यांना करावा लागलाच. घटकांचे खऱ्या अर्थाने विसर्जन होत नाही तोपर्यंत पंतप्रधानांचे मंत्रिमंडळ बनविण्याचे स्वातंत्र्य काहीसे मर्यादितच राहते. ही परिस्थिति सुरुवातीच्या काळात अपरिहार्य असेल; पण आता तरी ती बदलायला हवी. घटकांनी वेगळेपणाने वागणे म्हणजे पक्षाला हळूहळू विघटनाकडे नेणे होय, तसे आम्ही होऊ देणार नाही असा निर्धार, हेच अशा पेचप्रसंगांना खरे उत्तर होय. □

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ आणि ती एक वेश्या झाली असती ....

आज तिची अवस्था अशी आहे की, तिला धड बोलवत नाही; चालवत नाही आणि सारा देह भोगलेल्या यातनांनी ठणकतो आहे. तिच्या नजरेत कोणताही भाव तरळत नाही. डोळे आहेत म्हणून ती बघते; पण त्या बघण्यात काही चैतन्य नाही. फसवून आणलेल्या एका सतरा वर्षांच्या मुलीवर रोज पाच मंडळींनी अत्याचार केले तर त्या मुलीची अवस्था यापेक्षा वेगळी काय होणार? ज्या मुलीच्या अवस्थेचा वर उल्लेख केला आहे तिचे नाव हसीना! शहरी जीवनात भल्याबुऱ्या मार्गाने पैसा कमावणाऱ्या वासनाधीन मंडळींचे चोचले पुरविण्यासाठी ग्रामीण भागातून ज्या हजारो मुली आणून शहरी भागात विकल्या जातात त्यांपैकीच ही एक हसीना. अत्याचार झाले आणि सारे शरीर नासून गेले तरी तिचे नशीब थोर म्हणूनच ती आता तरी अलग होऊ शकली; अन्यथा तीही बत्तीच्या भकभकीत प्रकाशात उदास चेहऱ्याने देहविक्रय करणारी वेश्याच झाली असती!

आपली कहाणी सांगताना हसीना म्हणते, मी जे भोगले त्याला बलात्कार म्हणता येणार नाही. कारण जे काही झाले ते माझ्या संमतीने झाले. अर्थात परिस्थितीच अशी होती की, माझा विरोध निकामी ठरला असता आणि कदाचित मला ठारही मारण्यात आले असते. पहिल्या दिवशी मी ज्याला माझा पती मानण्यास तयार झाले होते तो एकटाच होता; पण दुसऱ्या दिवसापासून त्याच्या मित्रांची वर्दळ सुरू झाली. ते सगळे दारू पीत असत आणि मलाही दारू पिण्याचा आग्रह करीत असत. माझ्या मताला–विरोधाला काही किंमतच नव्हती. पुरुष–स्त्रियांचे नग्नावस्थेतील फोटो मला दाखविण्यात येत असत. हे फोटो दाखविले जात असताना माझ्या देहाशी त्यांचे किसळवाणे चाळे चालू असत. तो ओंगळ प्रकार चालू देण्यापेक्षा कपडे उतरविणे बरे असे मला वाटू लागले. एकदा मी कपडे उतरविले की काय होत असे......सांगण्यासाठी या हसीनाजवळ शब्द नाहीत. तिची सारी वेदना तिच्या चेहऱ्यावर सुस्पष्ट उमटताना दिसते. तिला काय म्हणायचे आहे हे जर समजणाराला समजता आले तर ठीक, अन्यथा त्याला तिचा काही इलाज नाही.

### खेड्यातून–शहराकडे

खेड्यातून शहराकडे असा जो या हसीनाचा प्रवास आहे तो फारसा थरारक नाही. वेदनामय दारिद्र्यातून सुटका करून घेण्यासाठी लोभस शहरी जीवनाचे मधाचे बोट लावल्यावर जे खेड्यामधील संत्रस्त मुलगी करील तेच नेमके या हसीनाने केले. कथा–कादंबऱ्या, हिंदी सिनेमे यातून हा प्रकार अनेक वेळा आला असला तरी त्या कल्पनाचित्रापेक्षा हसीनाची ही हेलावणारी सत्यकथा जास्त अस्वस्थ करते. पश्चिम बंगालमधील मदिनापूर जिल्ह्यामधील एका खेड्यात रहाणारी ही मुलगी. दारिद्र्याच्या ओझ्याने घर पूर्ण दबलेले; पण तरी घरात माणसांची वानवा नाही. बाप शेतमजूर. घरात पाच बहिणी आणि दोन भाऊ. आता रोजंदारीने शेतमजुरी करणाऱ्याच्या घरात ही सात माणसे असताना चुलीला दोनदा धग लागण्याची मारमार! हसीना तर सांगते की, आम्हाला एक वेळ जेवण मिळण्याचीही भ्रांत होती. शहराशी संपर्क ठेवून असलेल्या अबदुलभाई नावाच्या आमच्या कुटुंबाशी घनिष्ट संबंध असलेल्या माणसाच्या दृष्टीने परिस्थिती मोठी नामी असावी असे आता मला वाटते. अब्दुलभाईने या हसीनाशी घसट वाढविली. तो छोट्या–मोठ्या वस्तू तिला भेट देत असे आणि शहरी जीवनाचे चविष्ट किस्से सुनवीत असे. हसीनाच्या नजरेसमोर शहराचे स्वप्न तरंगू लागल्याची त्याला खात्री पटताच अब्दुलभाईंनी पुढील बोलणे सुरू केले अग,तूही दिल्लीला चल. तुला चांगलीशी नोकरी बघून देतो. दोन वेळा भरपूर जेवायला मिळेल. हाती रोख पैसे खेळायला लागतील; इतकेच नाही तर मनासारखा जोडीदारही मिळवून देतो. हसीनाच्या अपेक्षा माफक होत्या. चांगला तरुण, धडधाकट नवरा असेल तर काम करण्याची तिची तयारी होती. अब्दुलभाईच्या साखरपेरणीचा तिच्या मनावर परिणाम होऊ लागला. अब्दुलभाईने अखेरचा कानमंत्र दिला. तुला शहरात यायचे असले तर ये; पण घरात कुणाला सांगू नको! घरच्या मंडळींनी कदाचित् परवानगी दिली असती, कदाचित नसतीही. काय करावे? दोन दिवस विचार करून हसीनाने ठरविले; इथे खेड्यात राहून झिजून जाण्यापेक्षा जर काही चांगले आयुष्य वाट्याला येत असेल तर आपण ते का नाकारावे? हसीनाने निश्चय केला, दिल्लीला जायचे. अब्दुलभाईवर सारा विश्वास टाकून तिने घर सोडले. या अब्दुलभाईचे खरे स्वरूप तिला समजायचे होते. दोन दिवसांच्या प्रवासानंतर हसीना दिल्लीला येऊन पोचली. सीमापुरी नावाच्या वस्तीमध्ये तिची राहण्याची व्यवस्था करण्यात आली. दुसऱ्या दिवशी अब्दुल आला तो तिच्यासाठी एक बऱ्यापैकी साडी घेऊन! कोरे वस्त्र तिच्या वाट्याला कित्येक वर्षात आले नव्हते. अब्दुलभाई आपली किती काळजी घेतो असे वाटून तिला फार बरे वाटले. आपण नोकरीचा तपास करीत असल्याचे; तसेच हसीनासाठी जोडीदार बघत असल्याचेही अब्दुलने सूचित केले. आपल्या आयुष्याची चांगली सुरुवात होणार, या कल्पनेने हसीना हरखून गेली. गाव सोडण्याचा आपला निर्णय धाडसी असला तरी शहाणपणाचा होता, असे तिला वाटू लागले. आपल्या

पृष्ठ २४ वर

# आनंदमार्ग : अनुयायांच्या नजरेतून !!

गेल्या वर्ष-दोन वर्षांत वारंवार होणाऱ्या घातपाती कृत्यांमुळे आणि खुनी हल्ल्यांमुळे सर्वत्र जगामध्ये एक प्रकारचे भीतीचे आणि घबराटीचे वातावरण पसरले आहे आणि हे वातावरण कमी होण्याऐवजी अधिकाधिक वाढतच आहे. याचे कारण या कृत्यांमागे नक्की कोण आहे, हे बऱ्याच प्रकरणांमध्ये पोलिसांना आणि गुप्तहेरखात्यांनाही समजू शकलेले नाही. अर्थात या संदर्भात प्रामुख्याने नाव घेतले जाते ते 'आनंदमार्ग' या संघटनेचे ! आत्तापर्यंत जी काही कृत्ये आणि घटना या संघटनेच्या नावावर जमा झाली आहेत ( किंवा जमा करण्यात आली आहेत ) त्यांवरून ही संघटना म्हणजे एक अतिरेकी हिंसक लोकांचा गट असावा, अशी कोणाचीही समजूत होणे स्वाभाविक आहे.

या संघटनेच्या वतीने पुणे विद्यार्थी गृहामध्ये दोन दिवसांची एक भाषणमाला आयोजित करण्यात आली होती. संघटनेचे अखिल भारतीय पातळीवरील दोन नेते या भाषणमालेत आनंदमार्गाचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करणार होते. त्यामुळे एक प्रकारचे निराळेच कुतूहल या ठिकाणी आलेल्या लोकांमध्ये होते.

आचार्य सुजितकुमार हे या आनंदमार्गाचे अखिल भारतीय पातळीवरील पूर्ण वेळ कार्यकर्ते आहेत. ते स्वत: तर या संघटनेचे नेते आहेतच; पण त्यांची पत्नीसुद्धा संघटनेच्या कार्यात सुजितकुमारजींच्या बरोबरीने भाग घेत आहे. रात्री कार्यक्रम संपल्यानंतर आम्ही दहाच्या सुमारास त्याच हॉलमध्ये गप्पा मारायला बसलो. आचार्य सुजितकुमार हे त्यांच्या चेहऱ्यावरून जरी थोडेसे कडक आणि रागीट स्वभावाचे असावेत असे वाटले तरी प्रत्यक्ष बोलताना मात्र निराळाच अनुभव आला. आपण स्वत: आनंदमार्गाकडे आकृष्ट कसे झालो याविषयी बोलताना आचार्य म्हणाले,

'मी मूळचा उत्तर बिहारचा. १९५७ साली मी गणित विषय घेऊन एम्. एस्सी. झालो; पण पहिल्यापासून मला -योगविद्येचे आकर्षण होते. मी त्यासाठी योग्य अशा गुरूच्या शोधात होतो. हळूहळू माझे हे योगविद्येचे आणि अध्यात्मिक जीवनाविषयीचे आकर्षण इतके वाढत गेले की, मी घर सोडून हिमालयात निघून गेलो. तिथे अनेक गुहा आणि गुंफा पालथ्या घातल्या. शेवटी काठमांडूजवळ अशाच एका गुहेमध्ये मला एक सत्पुरुष साधुमहाराज भेटले. त्यांच्याजवळ मी माझी इच्छा प्रकट करताच त्यांनी मला सांगितले, 'पण यासाठी तुला एवढ्या लांबवर येण्याची काहीच गरज नव्हती. थोड्याच कालानंतर तुला अनुरूप असा गुरु मिळेल आणि तोसुद्धा तुझ्या गावाजवळच !' मी परत घरी आलो. नंतर दोनच महिन्यांनी माझी दोन व्यक्तींशी ओळख झाली. त्यातील एक डॉक्टर होती आणि दुसरी वकील होती. त्यांच्याशी चर्चा करीत असता आनंदमार्ग नावाची एक संघटना योगाभ्यास आणि अध्यात्मिक उन्नतीचे कार्य करीत असल्याचे मला समजले. या दोनही व्यक्ती आनंदमार्गाच्या सभासद होत्या. मीही त्यांच्याबरोबर 'आनंदमार्ग'मध्ये सामील झालो. पुढे सहाच महिन्यांनी माझी आणि 'बाबा'ची पहिली भेट झाली.' ( आनंदमार्गीय मंडळी श्री. प्रभात रंजन सरकार या आनंदमार्गाच्या संस्थापकांना 'आनंदमूर्तीजी' किंवा 'बाबा' असे संबोधतात. नुकतीच त्यांची निर्दोष सुटका झाली आहे.)

'बरे. मग बाबांबरोबरच्या पहिल्या भेटीत तुम्हाला काय विशेष अनुभव आला ?'

'मी बाबांना भेटायला गेल्यावर त्यांनी मला जवळ बोलविले आणि माझ्या पोटाच्या डाव्या बाजूला स्पर्श केला. त्याबरोबर मला माझ्या शरीरामध्ये असंख्य लहरी निर्माण होत असल्याचे जाणवले. मी ओळखले की, ही व्यक्ती काही सामान्य नाही. बाबांची अनेक प्रवचनेही मी ऐकली. बाबा बोलता बोलता एका भाषेतून दुसऱ्या भाषेत बोलू लागत. काही वेळा ही भाषा तीन हजार वर्षांपूर्वीचीदेखील असे. हे सामर्थ्य सामान्य माणसामध्ये कसे असू शकेल ? तुम्ही गेल्या जन्मी कोण होता, काय करीत होता हेही बाबा अचूक सांगतात. आता आमचे कशाला, बाबा सध्या जेलमध्ये आहेत. त्या ठिकाणी त्यांची सेवा करण्यासाठी एक सेवक जेलअधिकाऱ्यांनी दिलेला आहे. अर्थात हा सेवक म्हणजे एक शिक्षा भोगीत असलेलाच कैदी आहे. त्याचाही अनुभव याहून काही वेगळा नाही. एक दिवस बाबा असेच भेटायला गेलेल्या आमच्या संघटनेच्या काही कार्यकर्त्यांशी बोलत होते. तेवढ्यात हा सेवक बाबांकडे गेला. बाबांनी त्याला जवळ बोलाविले आणि डोळे मिटून स्वस्थ बसायला सांगितले. थोड्या वेळात त्या कैदी-सेवकाला एक व्यक्ती दिसू लागली. त्या व्यक्तीने अंगाला भस्म लावले होते. हातात डमरू आणि त्रिशूळ होते. गळ्यात सर्पांच्या माळा होत्या. थोड्या वेळानंतर त्याला एक बासरी वाजवीत असलेली सावळ्या रंगाची व्यक्ती दिसू लागली. बाबांनी त्याला नंतर डोळे उघडायला सांगितले. तेव्हा त्यानेच हे वर्णन केले. बाबांनी त्याला साक्षात शिवाचे आणि कृष्णाचे दर्शन घडविले होते.'

'तुम्ही मूर्तिपूजा मानता ?'

'आम्ही मूर्तिपूजा मानीत नाही; पण शिव, कृष्ण किंवा साक्षात आमचे बाबा हे एकाच देवाची वेगवेगळी रूपे आहेत असे मानतो.'

'खरे, सध्या जगामध्ये अनेक ठिकाणी वकिलातीमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी जी घातपाती कृत्ये किंवा खुनी हल्ले होतायत त्यात 'आनंदमार्ग'चा सहभाग किती ?'

त्यामध्ये 'आनंदमार्ग'चा मुळीच सहभाग नाही. आमच्या संघटनेचे चारित्र्यहनन करण्यासाठी हा प्रचार केला जातोय. कारण बंगालमध्येसुद्धा असे दोन गट आहेत की, ज्यांना आमचे वर्चस्व सहन होत नाहीयय. यापैकी एक गट आहे धनिकांचा आणि दुसरा आहे कम्युनिस्टांचा. धनिकांना आमचे वर्चस्व सहन होत नाही. कारण आम्ही भांडवलशाहीच्या विरोधी आहोत आणि कम्युनिस्ट आम्हाला विरोध करतात, कारण आम्ही जर सामान्य जनतेमध्ये मिसळलो, तिला आपलेसे केले तर या कम्युनिस्टांची सत्ता संपुष्टात येईल. हे दोन्ही गट भोगवादी आहेत. आम्ही सेवामूलक आहोत !

'पण जेव्हा धमकीच्या पत्राखाली 'आनंदमार्गी' अशी सही असते तेव्हा काय ?'

'आता अशी सही काय, तुम्हीही ठोकू शकता, पण म्हणून काही तुम्ही खरंच आनंदमार्गी होता काय ? एक गोष्ट नक्की की, आनंदमार्गाच्या कोणत्याही निष्ठावान काय-

कर्त्यांचा हिसेवर विश्वास नाही. आमच्या बाबांनीसुद्धा हे जाहीर केलेय. आमच्या आश्रमात ज्या कवटया सापडल्या त्यांचेही फार मोठे भांडवल सध्या केले जातेय, पण त्यातही काही अर्थ नाहीयय. कारण अशा प्रकारच्या कवटया आम्हाला आमच्या साधनेसाठी लागतातच आणि त्या काय, मेडिकल कॉलेजात सुद्धा विकत मिळतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात जशा लाठ्या-काठ्या, जंबिये सापडल्यावर त्याचा विनाकारण गवगवा केला गेला तसेच आहे हे. आणखीही एक मुद्दा मी या ठिकाणी तुमच्या निदर्शनाला आणून देऊ इच्छितो की, या घातपात आणि खुनी हल्ल्याच्या ज्या बातम्या येतात त्यांपैकी बहुतेक बातम्यांमध्ये असा 'कयास' आहे, असे म्हटलेले असते. म्हणजे प्रत्यक्ष पुरावा सापडलेला नसतोच, पण पोलिसांनाही आपली असमर्थतता लपविण्यासाठी कोणावर तरी ठपका ठेवावा लागतोच की! सध्या तर काय चांगलेच निमित्त मिळालेय.

'आनंदमार्ग 'चे प्रमुख श्री. प्रभात रंजन सरकार यांच्या पत्नींना त्या जोपर्यंत आनंद-मार्गाचा प्रचार करीत होत्या तोपर्यंत 'मार्ग-माता' असे म्हटले जात असे; पण १९७१ साली त्यांनी जेव्हा एक पत्रकार परिषद घेऊन श्री. सरकारांवर कडक टीका केली, त्यानंतर त्या स्वत: तर बेपत्ताच झाल्या, पण तुम्हीही त्यांच्याबद्दल बरे शब्द बोलत नाही. असे का?'

'सगळे मोकळेपणाने आणि स्पष्टपणेच सांगायचे झाले तर त्याचे असे झाले की, १९७१ साली श्री. सरकार आणि माताजीं-मध्ये काही मतभेद झाले. आता हे मतभेद का झाले, याचे कारण देणे कठीण आहे; पण काही जण असेही म्हणतात की, बाबांच्या विरुद्ध असणाऱ्या गटाने माताजींचे 'ब्रेन वॉशिंग' केले आणि त्यानंतर माताजींनी एक स्वतंत्रच मिशन सुरू केले. स्वामींचा एक निकटवर्ती, सहकारी विशोकानंदही त्यांना सामील झाला. There were some relations between her and Vishokananda.' या दोघांनी मिळून आनंदमार्गच्या सर्व पातळ्यांवरील युनिटस्ना एक सर्क्युलर पाठविले. त्यात असे म्हटले होते– श्री. आनंदमूर्तीजींचे दैवीपण भोंदू ठरले आहे. अध्यात्मिक मार्ग-दर्शन करण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये नाही. तुम्हाला जर ते हवे असेल तर तुम्ही माझ्या-कडे या!' परंतु माताजींचे हे आवाहन अयशस्वी झाले. फारसे कोणीच त्यांच्या या प्रचाराला बळी पडले नाही. त्यामुळे मग शेवटी निराश होऊन त्यांनी अज्ञातवास पत्करला. थोडक्यात सांगायचे तर, 'She was an ambitious lady with a thirst for power.' आमचा असा विश्वास आहे की, माणसाचे चारित्र्य खराब झाले तर त्याची मानसिक आणि आध्यात्मिक शक्तीही खचल्याशिवाय राहात नाही. बाबांचे तसे काहीच झालेले नाही. अजूनही जेलमधून-देखील ते सबंध संघटना नियंत्रित करतात. संघटनेच्या कोणत्या युनिटमध्ये काय चाललेय याचा रिपोर्ट त्यांना कुणीही द्यावा लागत नाही. दैवी शक्तीच्या सहाय्याने तो त्यांना आपोआप कळतो. बाबा सर्वज्ञ आहेत. बाबांना ज्या तऱ्हेने खटल्यात गोवण्यात आले तो सर्व प्रकार द्वेषमूलक आहे It is not the trial of the accused It is a demolition of Anand Marg.

आनंदमार्गचे सर्व व्यवहार गुप्तपणे चालतात असा एक आरोप आनंदमार्गावर केला जातो.

'आमचा कोणताही व्यवहार गुप्तपणे चालत नाही. आनंदमार्गचे सर्व व्यवहार कोणीही केव्हाही पाहू शकतो, तपासू शकतो. आमच्यामध्ये एकाच व्यवहाराबाबत गुप्तता पाळण्यात येते. ती म्हणजे साधना. सर्वांना एकच साधना सरसकटपणे लागू पडेल, यावर आमचा विश्वास नाही. प्रत्येक व्यक्तीला तिच्या गुणधर्मानुसार स्वतंत्र अशी साधना करावी लागते. या साधनेच्या बाबतीत मात्र आम्ही अत्यंत गुप्तता पाळतो आणि तशी ती पाळणे आवश्यक आहे, असे आम्हाला वाटते.'

'आनंदमार्गाला मिळणारा पैसा हेही एक कोडेच आहे, अशी सर्वसामान्य माणसाची प्रतिक्रिया असते.'

'अहो, त्यात कोडे काय आहे? आमचे सर्व हिशेब स्वच्छ आहेत. कोणीही येऊन ते पाहू शकते. आमच्या हिशेबाच्या सर्व फायली दरवर्षी ऑडिटर्सकडून तपासून घेतल्या जातात. अर्थात संघटनेचे कार्य म्हटल्यावर पैसा लागतोच. त्याकरिता आमची अशी योजना आहे की, आनंदमार्गाचा प्रत्येक सभासद त्याच्या मासिक उत्पन्नाच्या दोन टक्के उत्पन्न दर महिन्याला आनंदमार्गाचा फंडात टाकतो. या फंडामधूनच बराचसा खर्च भागविला जातो. काही वेळा खर्च वाढतो. आता बाबांच्या खटल्याकरिता आमचा बराच खर्च झाला. पुढेही होणार आहे. वेळेला आम्ही सभासदच नियमित दोन टक्क्यांव्यतिरिक्त अधिक भर घालतो आणि खर्च भरून काढतो. आनंदमार्गची भारता-बाहेरील जी युनिटस् आहेत त्यांच्याकडे बऱ्यापैकी पैसा आहे. कारण ते देशच श्रीमंत आहेत. त्यामुळे तिथल्या भक्तांकडे जास्त पैसे असणे स्वाभाविक आहे; पण पैशापैकी कोणताही भाग भारतात आणला जात नाही. आणीबाणीच्या काळातच जेव्हा बाबांवरील खटल्याचा खर्च भागविण्यासाठी आम्हाला पैसा हवा होता तेव्हा ही बाहेरची युनिटस् पैसे पाठवायला तयार होती; पण त्याच वेळी त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी असा एक कायदा केला की, कोणत्याही व्यक्तीला अगर संस्थेला परकीय चलन स्वीकारता येणार नाही. ब्रिटनचे त्या वेळचे पंतप्रधान श्री. हॅरॉल्ड विल्सन यांनी स्वत: आमच्या वतीने इंदिराजींना अशी विनंती केली की, 'तुम्हाला या लोकांबद्दल विश्वास नसेल तर तुम्ही एक ट्रस्ट बनवा. आनंद-मार्गाला येणारी परदेशी मदत या ट्रस्टमध्ये जमा करा आणि त्यातूनच तुमच्या देखरेखी-खाली खर्च करू द्या;' पण इंदिराजींनी तेही ऐकले नाही. आम्हाला आमचा बचावदेखील धडपणे करू दिला गेला नाही. राजकीय आकसानेच आनंदमूर्तीजींना शिक्षा ठोठा-वण्यात आली. तर सांगायचा मुद्दा असा की, आमचे सर्व आर्थिक व्यवहार चोख आहेत. किंबहुना आम्हाला आर्थिक चणचणच काही वेळा भासते.'

रात्रीचे १०॥–११ वाजून गेले होते. आचार्यांनी मला आनंदमार्गावरील काही साहित्य वाचायला दिले. –'What is Anand Marg? Why Anand Marg? एका पुस्तकाचे नाव होते; पण ते वाचण्या-पूर्वीच माझे या आनंदमार्गीयांविषयी मत बनले ते असे–

सर्वच आनंदमार्गी हिंसक वृत्तीचे नसावेत. पुण्यामध्येच आनंदमार्गाची शाळा चालविणारे आचार्य धर्ममित्र ब्रह्मचारी यांच्याशी बोल-तानाही हे जाणवत होते की, ही माणसे सुशिक्षित आहेत, विचार करणारी आहेत; पण यांच्यातच एक गट असा असावा की, जे हिंसाचाराने आपले अस्तित्व दाखवू इच्छितात. आपल्या संघटनेविषयी जरब बसवू इच्छितात आणि या गटावर मात्र या विचारी लोकांना ताबा ठेवता येत नसावा. त्यामुळे मग अशांना 'disown' करण्या-पलीकडे ते काहीच करू शकत नाहीत. एक मात्र नक्की, हे दोन्ही गट आनंदमूर्तीजींच्या सामर्थ्यावर अढळ श्रद्धा ठेवून आहेत आणि त्यामुळेच त्यांच्यासाठी प्राणसुद्धा द्यायला तयार आहेत.

–सतीश कामत

# येमेन :
## मध्यपूर्वेत रशियाचा चंचुप्रवेश

चंद्रशेखर पुरंदरे

तांबडया समुद्राच्या किनारी दक्षिण येमेन आणि उत्तर येमेन हे दोन देश आहेत. वस्तुतः त्यांचे अस्तित्व जाणवण्यासारखे वैशिष्ट्य परवापर्यंत उजेडात आले नव्हते. मध्यपूर्वेतील अनेक अरब राष्ट्रांतील एक इतपतच त्यांची ओळख; परंतु २४ जून आणि २६ जूनला अनुक्रमे उत्तर येमेन आणि दक्षिण येमेनच्या अध्यक्षांचे खून पडले आणि मध्यपूर्व हादरले !

दिनांक २४ जूनला उत्तर येमेनचा अध्यक्ष अहमद अल् घशमी याचा खून झाला. दक्षिण येमेनचा अध्यक्ष सलीम रुबाया अली याच्यातर्फे एक खास दूत अल् घशमीला भेटायला आलेला होता. ही भेट सलीम रुबाया अलीच्या एडनमधल्या ( दक्षिण येमेनची राजधानी ) राजवाड्यातून एका गुप्त आणि उच्चस्तरीय फोनवरून ठरविण्यात आलेली होती. त्यानुसार त्या दूताला सकाळी घशमीकडे नेण्यात आले. या दूताने हातातील ब्रीफकेस कागदपत्रे काढण्यासाठी उघडली आणि त्यातील पार्सल बाँबचा स्फोट होऊन तो दूत आणि अध्यक्ष जागच्या जागी ठार झाले! या मृत्यूची जबाबदारी दक्षिण येमेनवर ढकलणारे व पर्यायाने दक्षिण येमेनचा अध्यक्ष सलीम रुबाया अली याला दोषी धरणारे पत्रक तत्काळ उत्तर येमेनतर्फे प्रसृत करण्यात आले. हा आरोप चांगलाच गंभीर होता. रुबाया अलीने ताबडतोब त्याचा इन्कार केला आणि पाठोपाठ २६ जूनला सोमवारी दक्षिण येमेनच्या या अध्यक्षाचाही मिलिटरीच्या पथकाने गोळ्या घालून खून केला !

या दोन खुनांची संगती लावणे अनाकलनीय गूढ होऊन बसले. त्यासाठी दोन्ही देशांची पार्श्वभूमी समजून घेणे उचित ठरेल.

दक्षिण येमेन किंवा परवापर्यंत एडन या त्याच्या राजधानीच्याच नावाने ओळखले जाणारे राष्ट्र हे १९६७ सालापर्यंत ब्रिटिश वसाहत होते. नोव्हेंबर १९६७ला ब्रिटिशांनी काढता पाय घेतला आणि नॅशनल लिबरेशन फ्रंट ( NLF ) या मुक्तिसंघटनेच्या हातात सत्ता गेली. ती आजतागायत त्यांच्याच हातात आहे. या NLF ने एकाच वेळी ब्रिटिश लष्कर आणि FLOSY या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका पुराणमतवादी राष्ट्रवाद्यांशी चार वर्षे लढाई देऊन देश १९६७ ला मुक्त केलेला होता. नासरच्या अरब सोशॅलिझमपासून ( म्हणजे काय ते नासरलाही शेवटपर्यंत कळले नाही ! ) सुरुवात करून आज मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्यापर्यंत या NLF ची वाटचाल झालेली आहे.

दक्षिण येमेनमध्ये सहकारी संस्था, राज्याची शेती अशा प्रकारात सगळी जमीन सरकारच्या मालकीची आहे. कारखानदारी, व्यापार, गृहनिर्माण वगैरेही सरकारच्याच नियंत्रणाखाली येतात. लाचलुचपत पूर्णपणे नष्ट करण्यात आल्याचा सरकारचा दावा आहे. सगळी सत्ता NLF च्याच हाती एकवटली आहे. या NLF चे २६,००० सभासद आहेत. स्थानिक शाखांतर्फे NLF देशाच्या घडामोडींवर बारीक लक्ष ठेवते.

४४ वर्षांचा सलीम रुबाया अली, जो सोमवार २६ जूनपर्यंत दक्षिण येमेनचा अध्यक्ष होता, त्याचे व्यक्तिमत्त्व आणि विचारसरणीच त्याच्या विनाशाला कारणीभूत ठरली. याचा जन्म झांजीबारमध्ये झाला. रॅडसन पर्वतराजीतून ब्रिटिशांशी लढणाऱ्या पथकाचा हा नेता. NLF अधिकाधिक डावीकडे झुकत असल्याने दिवसेंदिवस काळाच्या उलट दिशेने जोरात प्रवास करू इच्छिणाऱ्या उर्वरित अरब जगताशी त्याचे संबंध दुरावणे साहजिकच होते. येमेनचा लगतचा शेजारी सौदी अरेबिया तर कट्टर मुस्लीम देश आणि दक्षिण येमेन कम्युनिझमचा पुरस्कर्ता. त्यामुळे सीमेवर वातावरण तंग होणे स्वाभाविक होते. त्यातून दक्षिण येमेनच्या लष्कराला प्रशिक्षण देण्यासाठी क्युबाचे लष्करी अधिकारी येमेनमध्ये मोठ्या संख्येने दाखल झालेले आहेत. शासकीय यंत्रणा कम्युनिस्ट राजवटीप्रमाणे चालावी यासाठी शासकीय तज्ज्ञांची पूर्व जर्मनी या आणखी एका कम्युनिस्ट देशातून मोठ्या प्रमाणात आयात करण्यात आली आहे. दिवसेंदिवस दक्षिण येमेन अधिकाधिक रशियाकडे झुकत असल्याचे स्पष्ट होते; पण या वाममार्गापासून देशाला एक स्वतंत्र प्रतिमा देण्याचे आणि स्वतःचे धोरण [ इतर कम्युनिस्ट देशांहून निराळे ] अवलंबिण्याचा प्रयत्न रुबाया अलीने केला आणि तोच त्याच्या अंगाशी आला. येमेनच्या जवळचा दुसरा देश ओमान. त्यातही डाव्या क्रांतिकारकांची गडबड प्रस्थापित राजवटीविरुद्ध चालू आहे. यांना गुप्तपणे पाठिंबा देण्याचेही काम कम्युनिस्टांच्या तत्त्वप्रणालीप्रमाणे दक्षिण येमेनने अव्याहत चालविलेले आहे. ओमानचे राजकीय अस्थैर्य हीही सौदी अरेबियाला सीमेवरचा देश असल्याने कायमची डोकेदुखी होती. अशा रीतीने दक्षिण येमेन उत्तरोत्तर कम्युनिस्ट आधिपत्याखाली येत असलेला पाहून सौदी अरेबियाने प्रथम उत्तर येमेनवर लक्ष केन्द्रित केले आणि मग दक्षिण येमेनमध्येही पैसा ओतायला सुरुवात केली.

१९७६ च्या नोव्हेंबरमध्ये दक्षिण येमेन आणि सौदी अरेबिया यांच्यात राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. तेव्हापासून क्युबन, रशियन शक्ती दक्षिण येमेनमधून हद्दपार करण्यासाठी सौदी तिथे पेट्रोडॉलर्स ओतीत आहेत. दक्षिण येमेनमध्ये पेट्रोलच्या नावानेही बोंब असल्याने आणि इतर कम्युनिस्ट राजवटीच्या मानाने शेजारचा सौदी अरेबिया कित्येक पट अधिक मदत करायला तयार असल्याने सौदी अरेबियाशी सोडवतही नाही आणि धरवतही नाही, असे नाते प्रस्थापित होणे अपरिहार्य होते. उत्तर येमेन त्यामानाने

चांगलाच सौदी अरेबियाच्या दडपणाला बळी पडलेला आहे.

रुबाया अली हा परवा खून झालेला दक्षिण येमेनचा अध्यक्ष त्याच्यापरीने या दोन्ही सौदी आणि कम्युनिस्ट-शक्तींचे संतुलन राखण्याचा प्रयत्न करीत होता; परंतु NLF चा जनरल सेक्रेटरी अब्दुल फताह इस्माइल हा सौदी अरेबियाशी कोणत्याही प्रकारे आर्थिक संबंध चालू ठेवण्याच्या पूर्ण विरुद्ध होता. रुबाया अलीचे उत्तर येमेनेशी मैत्रीचे संबंध स्थापन करण्याचे प्रयत्नही त्याला पूर्णतः नामंजूर होते. हा अब्दुल इस्माइल क्रेमलिनचा एडनमधला हस्तकच समजला जातो, इतका तो कट्टर रशियावादी आहे. हाच आज दक्षिण येमेनचा खरा सूत्रधार झालेला आहे आणि दोन्ही अध्यक्षांच्या खुनामागे त्याचा हात असण्याची शक्यताच सगळ्यात प्रबळ दिसते.

मागच्या ऑक्टोबरमध्ये उत्तर येमेनचा अध्यक्ष जनरल इब्राहिम हम्दी याचा खून झाला. तो, त्याचा भाऊ आणि दोन फ्रेंच मुली हे मोटारीतून जात असता मारले गेले. या अध्यक्षाशी अलीने चांगले संबंध ठेवले होते. अलीने ओमानच्या 'धोफरी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या डाव्या क्रान्तिकारकांना मदत देणेही हळू हळू बंद करीत आणले होते आणि तो रशियनांना सोमालीतून हकालपट्टी झाल्यानंतर एडन हा लष्करी तळ करू देण्याच्याही विरुद्ध होता.

या प्रमुख तीन कारणांमुळे अब्दुल इस्माइल त्याच्या विरुद्ध होता. एकूण परिस्थिती पहाता अलीला उत्तर येमेनचा मागच्या ऑक्टोबरपासूनचा अध्यक्ष घशमी याला शनिवारी ठार मारण्याचे काहीच कारण नव्हते. त्या अर्थी त्या खास दूताला फसवून बॅगेची अदलाबदल करून इस्माइलतर्फेच पाठविण्यात आले असावे.

कारण जेव्हा त्या मृत्यूनंतर अलीवर हा खुनाचा आरोप उत्तर येमेनतर्फे करण्यात आला, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी NLF ने एडनमध्ये एक तातडीची बैठक बोलाविली. तिला हजर रहाण्यास अलीने नकार दिला आणि या प्रकरणावरून राजीनामा देतो, असे सांगून वेळकाढूपणा केला. इतके करून तो थांबला नाही, तर त्याचा पूर्वापार राजकीय प्रतिस्पर्धी अब्दुल इस्माइल याच्या NLF मधल्या अतिडाव्या गटाला संपूर्ण राजकीय पटावरून अदृश्य करण्यासाठी त्याने एक उठावाचा अयशस्वी प्रयत्नही केला; पण अब्दुल इस्माइल त्याच्यापेक्षा कित्येक पटींनी हुषार निघाला आणि त्याने अलीचाच डाव त्याच्यावर उलटविला. त्यामुळे सध्या अब्दुल इस्माइल हाच दक्षिण येमेनचा सर्वेसर्वा झालेला आहे. त्याने सध्या त्याच्याच मुठीतला अली नासर मुहम्मद हा बाहुला दक्षिण येमेनच्या अध्यक्षपदावर बसविलेला आहे. एक पाचजणांची प्रेसिडेन्शियल कमिटी तात्पुरती बनविण्यात आलेली आहे. तिचे अली नासर सोडला इतर चार सभासद असत. अब्दुल फताह इस्माइल हा NLF चा जनरल सेक्रेटरी आणि कटाचा सूत्रधार, मुहम्मद सालेह मुतेआ हा परराष्ट्रमंत्री, अली नासर अन्ताल हा संरक्षणमंत्री आणि अबुल रझाक हा संस्कृति आणि पर्यटनमंत्री.

तिकडे उत्तर येमेनमध्ये अल् घशमीच्या खुनानंतर हाहा:कार उडाला. उत्तर येमेनचा नवा अध्यक्ष म्हणून अब्दुल करीम अल् अराशी याची नेमणूक झाली. उर्वरित अरब राष्ट्रांचा पाठिंबा मिळविण्यासाठी आणि दक्षिण येमेनविरुद्ध मत निर्माण करण्यासाठी ताबडतोब या नव्या अध्यक्षाचे खास दूत रवाना झाले. दक्षिण येमेनचेही दोन दूत याच कामगिरीवर रवाना झाले.

पण उत्तर येमेन एवढ्यावर स्वस्थ बसले नाही. अरबलीग नावाची अरब राष्ट्रांची संघटना १९४५ साली अस्तित्वात आली आहे. ही अरब लीग जवळ जवळ सगळे सभासद अरबराष्ट्रे असल्याने बरीच ताकद बाळगून आहे. या अरब लीगकडे उत्तर येमेनने धाव घेतली. तिची कैरोला तातडीची बैठक झाली. ७६ च्या रियाधच्या शिखर परिषदेनंतर प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने सभासदराष्ट्रांचे प्रतिनिधी (त्यातील ९ राष्ट्रांचे परराष्ट्रमंत्री) या परिषदेला हजर होते. सर्वांनी एकमताने दक्षिण येमेनशी आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय वगैरे सर्व संबंध तोडण्याचा निर्णय घेतला. ह्या बैठकीला पाच राष्ट्रे वगळता (इराक, लीबिया, सीरिया, अल्जीरिया आणि जिबौती) बाकी हजर होती. यांतील चार राष्ट्रांनी (जिबौती वगळून) सादातविरोधी आघाडी उभारलेली होती हे लक्षणीय.

परिणाम – १. अरब लीगच्या या निर्णयामुळे येमेन रशियाच्या कंपूत जाण्याची शक्यता वाढली. COMECON या कम्युनिस्ट राष्ट्रांच्या संघटनेचे सभासदत्व देण्यासाठी दक्षिण येमेनने तातडीने अर्ज केला. (मध्यपूर्वेतील असे हे पहिलेच राष्ट्र)

२. तांबड्या समुद्रात एडन हे रशियाला लष्करी तळ म्हणून उत्कृष्ट स्थान मिळणार, त्याच्या बदल्यात येमेनला मिग विमाने मिळतील आणि येमेन अरब राष्ट्रात न बसण्याइतपत लाल होईल.

३. सौदी अरेबियाला तांबड्या समुद्रातील सुरक्षिततेसाठी हवा असणारा पाठिंबा, इजिप्तच्या मध्यपूर्वेतील शांतताप्रयत्नासाठी पाठिंबा आणि ओमानच्या क्रांतिकारकांचा विरोध या येमेनकडून हव्या असणाऱ्या गोष्टी खड्डयात गेल्या.

४. सादातने प्रतिक्रिया व्यक्त केल्याप्रमाणे सुदानमध्ये आणि इजिप्तमध्ये प्रवेश करण्याचे रशियाचे प्रयत्न उघळले गेल्यानंतर रशियाला येमेनचा मिळालेला घास हेच घवघवीत यश आहे.

५. इस्माइलने सरळच सांगितल्याप्रमाणे क्रांतीची ज्योत धगधगती ठेवण्यासाठी क्युबाही या बाजूने शिरकाव करू पहात आहे.

तात्पर्य, अफगाणिस्तानातील परवाच्या क्रांतीने या हिरव्या झेंड्याला ईशान्येकडून लाल किनार लागली होतीच, ती आता वायव्येपर्यंत पसरून मूळ अरेबियाच लाल करील काय अशी रास्त शंका उत्पन्न झाली आहे. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ

पुणे ४११ ०३०

# परराष्ट्रमंत्री वाजपेयी यांच्याकडून अपेक्षा

राजन दातार, नासिक

जनता पक्ष सत्तेवर आल्यापासून परराष्ट्रधोरणात बदल झाल्याची बरीच टीका झाली आहे. परराष्ट्रमंत्री श्री. वाजपेयी हे पूर्वाश्रमीचे जनसंघाचे, त्यामुळे तर इंदिराबाईंनी अशी घोषणा करून टाकली की, देशाचा लिलाव केला जात आहे; परंतु निःपक्ष दृष्टीने पाहिले असता आपल्या परराष्ट्रधोरणात बराच समतोल आलेला आढळतो. श्री. वाजपेयी आपले खाते खूपच मुत्सद्देगिरीने चालविताना दिसतात. असे जरी असले तरी पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी कोणत्या ना कोणत्या महाशक्तींकडे झुकण्याचे जे धोरण स्वीकारले होते ते सुधारले पाहिजे व ही चूक पुन्हा होऊ न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

## रशिया, मध्यपूर्व व आपण

गेल्या तीस वर्षांतील आपल्या परराष्ट्रधोरणाची पहाणी केली असता असे ठळकपणे दिसते की, जवाहरलाल नेहरूंच्या कारकीर्दीत अमेरिकेकडे आपण झुकलो. लालबहादूर शास्त्री ह्यांच्या आगमनाने हा झुकाव नाहीसा होतो न होतो तोपर्यंत ते निवर्तले. श्रीमती गांधी सत्तास्थानावर येताक्षणी हा झुकाव रशिया-प्रणीत कम्युनिष्ट राष्ट्राकडे मर्यादेपेक्षा अधिक वाढला.

रशियाचा सर्वसाधारणपणे आपल्याला कधीच वाईट अनुभव नाही; परंतु रशियावर पूर्ण भरवसा टाकणे धोक्याचे ठरेल. रशियन राज्यकर्त्यांनी इतर देशांच्या कारभारात मोकाटपणे हस्तक्षेप केलेला आहे. झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी ह्या देशांमधील रशियन कारवाया सर्वपरिचित आहेत. अलीकडे अफगाणिस्थान व दक्षिण येमेनमधल्या राज्यक्रांत्या रशियाच्या आशीर्वादानेच झाल्याचा आरोप होत आहे. ते अशक्य नाही. रशिया पूर्वयुरोपातील देशांकडून, जर्मनीच्या तावडीतून त्यांची सुटका केल्याचा खर्च भरून काढण्यासाठी खंडणी वसूल करीत आहे. अर्थातच हे आपले वर्चस्व टिकविण्यासाठीच आहे. इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत रशियन नेते भारताच्या अंतर्गत कारभारात स्वच्छंदपणे हस्तक्षेप करीत होते. भारताच्या दौऱ्यावर असताना रशियाचे अध्यक्ष श्री. ब्रेझनेव्ह ह्यांनी तर मधु लिमये यांना सरळ सरळ प्रश्न केला होता, तुम्हाला येथे विरोधी पक्ष हवेतच कशाला? श्रीमती गांधींना तुम्ही पाठिंबा द्यावयास हवा! रशियन दूरचित्रवाणी व रेडिओवरून सध्याच्या जनता-नेत्यावर देशद्रोहाचे आरोप केले जातात. मार्च १९७७ मध्ये जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर क्रेमलिनमध्ये अस्वस्थता पसरली. ह्या सत्तान्तरामुळे रशियाचे दक्षिण आशियात राजनैतिक पानिपत व्हायची वेळ आली. अर्थात जनता पक्षाच्या सौम्य धोरणामळे रशियावर ती पाळी आली नाही.

आपले मध्यपूर्वेतले धोरण हे अजूनसुद्धा रशियन धोरणावरच आखलेले आहे. पूर्वग्रहविरहित दृष्टीने जर आपण पाहिले, तर ह्या धोरणात बऱ्याच उणीवा आढळतात. इस्रायलशी आपण राजनैतिक संबंध न ठेवणे, ही त्यातील सर्वांत महत्त्वाची उणीव ठरते. इस्रायलने व्याप्त अरब प्रदेश सोडला पाहिजे हे जरी खरे असले, तरी ते राजनैतिक संबंध न ठेवण्याचे पुरेसे कारण होऊ शकत नाही. चीननेसुद्धा आपला किती तरी अधिक प्रदेश व्याप्त केलेला नाही काय? तिबेटी लोकांचे अधिकार नष्ट केलेले नाहीत काय? असे असूनसुद्धा आपले चीनशी संपूर्ण राजनैतिक संबंध आहेतच. कारण नसताना शत्रू निर्माण करण्याचा हा उद्योग आता बंद केला पाहिजे. ह्या बाबतीत आणखी एक गोष्ट खटकते. १९७३ साली इजिप्तने भारताकडे मिग–२१ विमानांचे सुटे भाग मागितले. ह्यावर भारत सरकारने कळविले की, तसे करणे शक्य नाही. ह्याचा अर्थ असा की, आपल्यावर अरबांचे असलेले प्रेम हे जबरदस्तीने आणलेले होते. शिवाय अरब राष्ट्रांकडून आपणास काहीच प्रत्यक्ष फायदा झालेला नाही. उलट पाकिस्तान ह्या अरब देशांकडून मातीमोल किंमतीत तेल खरेदी करीत आहे. आर्थिक सहाय्याविषयी गणित न केलेलेच बरे! म्हणूनच काही बदल आता करण्याची वेळ आली आहे. हे बदल अरबांच्या विरुद्ध नसले तरी इस्रायलच्या विरुद्धचा सूर बदलणारे असावेत.

## शेजारी राष्ट्रांशी संबंध

आपले नजीकचे भौगोलिक शेजारी म्हणजे पाकिस्तान, अफगाणिस्तान, चीन, नेपाळ, बांगला देश, ब्रह्मदेश व श्रीलंका. पाकिस्तानशी तीन वेळा व चीनशी एकदा आपले युद्ध झाले आहे. अजून संबंध मैत्रीचे झालेले नाहीत. ह्या वर्षी पाकिस्तानने आपल्या सैनिकी खर्चात जवळजवळ ८ टक्क्यांनी वाढ केली आहे. शिवाय काराकोरम हमरस्त्याचे बांधकाम पूर्ण झाल्यामुळे पाक–चीनचे रेशमी संबंध अधिक दृढ झाले आहेत. चीनकडे आता मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे आहेत. म्हणजेच, उत्तर प्रदेशाचा सुपीक भाग अण्वस्त्रांच्या माऱ्यात येतो.

दरम्यान पंतप्रधान श्री. देसाईंनी एकतर्फी घोषणा केलेली आहे की, भारत शांततामय कारणांसाठीसुद्धा अणुचाचणी करणार नाही. असा त्याग जरी व्यक्तीच्या बाबतीत उत्तम असला, तरी राष्ट्राला हा त्याग नक्कीच परवडणारा नाही. एक दुर्बल राष्ट्र दोन बलवान राष्ट्रांमधले तंटे कधीच मिटवू शकत नाही. अर्थात भारताला

अण्वस्त्रांच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी पुढाकार घेता येईल. अणुचाचण्या बंद करण्याचा एकतर्फी निर्णय म्हणूनच आत्मघातकी आहे.

अफगाणिस्तानशी आपले संबंध सलोख्याचे आहेत. पंतप्रधानांनी इराणच्या शहांच्या दडपणाखाली येऊन काही तरी अफगाणविरोधी वक्तव्ये करण्याचे टाळले ते बरे झाले. अफगाणिस्तानमध्ये जी क्रान्ती झाली ती त्या देशाची अन्तर्गत बाब आहे, त्यात आपल्याला पडण्याचे कारण नाही, हा श्री. देसाईंचा पवित्रा चांगला आहे. नेपाळशी आपले संबंध चांगले आहेत. काही दिवसांपूर्वी नेपाळचे माजी पंतप्रधान श्री. कोईराला ह्यांच्या अटकेने दोन्ही देशांमध्ये वाद निर्माण झाला होता; परंतु तो आता मिटला आहे.

बांगला देशाच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा होता. तेथे सत्तांतर करण्यात श्रीमती गांधींनी फार घाई केली, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. कमीत कमी तेथे आपली फौज दहाएक वर्षे ठेवावयास हवी होती, म्हणजे आपोआपच स्थैर्य आले असते. फराक्काबांधावरून जो वाद झाला तो मिटला असला तरी बांगला राज्यकर्त्यांच्या मनात भारताविषयी असलेला संशय स्पष्ट होतो. आता बांगला देशात नागरी शासन आले आहे. त्या देशाशी मैत्री वाढविण्याचे प्रयत्न जरा सावधानतेनेच करावयास हवेत.

श्रीलंकेत आपल्या देशाच्या पाठोपाठच मानवाधिकारांची पुनर्स्थापना झाली आहे. त्यामुळे त्या देशाशी संबंध अधिक जिव्हाळ्याचे झाले. उभय देशांमध्ये तामीळ भाषिकांचा वाद सोडला तर कोणताच मोठा वाद नाही. श्री. वाजपेयी २९ जून रोजी कोलंबोस जाणार होते पण जनता पक्षातील अंतर्गत वादामुळे त्यांना आपला दौरा रद्द करावा लागला आहे. ह्यामुळे कोलंबोमध्ये निराशा व्यक्त करण्यात आली.

## अमेरिकेचा अनुभव

श्रीमती गांधींनी सत्ता हाती घेतल्यापासून आपले व अमेरिकेचे संबंध कधीच सुरळीत नव्हते. पंतप्रधान श्री. देसाईंनी नंदादेवीवरील उपकरणांचे जरी समर्थन केले असले तरी ते फारच लंगडे ठरते. श्री. देसाईंनी, लोकसभेतील आपल्या उत्तरात काही मुद्द्यांना हात घालण्याचे कटाक्षाने टाळले आहे. उदाहरणार्थ, त्यांनी हे स्पष्ट केलेले नाही की, त्या उपकरणाचे संदेश कोठे मॉनिटर केले जात, ते कोण मॉनिटर करीत असे आणि त्यांचा अर्थ कोठे लावला जात असे ? अमेरिकेने ह्या सर्व प्रकाराकडे सोयिस्करपणे डोळेझाक केली आहे. श्री. देसाईंनी हा मुद्दा त्यांच्या अमेरिकाभेटीच्या वेळी उपस्थित करावयास हवा होता. त्यांनी श्री. कार्टर ह्यांना स्पष्ट शब्दांत सांगायला हवे होते की, अमेरिकेकडून ते उपकरण शोधण्यासाठी सर्व मदत मिळाली पाहिजे; पण दुर्दैवाने पंतप्रधानांनी ते धाडस दाखविले नाही.

पी. एल ४८० च्या मदतीची आता आपणास गरज राहिलेली नाही. आपल्याकडील धान्यांचे प्रचंड साठे लक्षात घेता आपणास अमेरिकेकडे झोळी पसरण्याचे नजीकच्या काळात कारण नाही. अशा मदती न स्वीकारणेच शहाणपणाचे ठरेल. आय. बी. एम. व कोकाकोला ह्यांना हाकलून जनता पक्षाने आपले बळ प्रकट केलेच आहे. त्याबाबतीत आता माघार होऊ नये.

## अलिप्तता वाद

अलिप्ततावादाविषयी अलीकडे खूपच ऐकायला मिळते. अलिप्ततावादाची स्पष्ट अशी व्याख्या अजून कोणीच दिलेली नाही. खरे तर अलिप्त राष्ट्रांचा महाशक्तींनी सोयिस्कर उपयोग करून घेतला आहे. हा दोष अर्थातच रशियाकडे अधिक जातो. अलिप्ततावादाचा पाया म्हणजे कोणत्याही सैनिकी गटात सामील न होणे. अलिप्त राष्ट्रांपैकी बहुसंख्य राष्ट्रे असे करू शकत नाहीत. कारण ह्यांपैकी बरीचशी आर्थिक, सैनिकी व सांस्कृतिक दृष्ट्या कोणत्या ना कोणत्या महाशक्तीवर अवलंबून आहेत.

भारताची भूमिकासुद्धा खूपच अस्पष्ट आहे. ह्या गटाचा सदस्य असताना भारताने रशियाबरोबर मैत्री-करार करावयास नको होता. कारण त्यामध्ये मर्यादित का होईना, परंतु सैनिकी कलम आहेच. १९६२ साली जेव्हा भारतीय राजनीतीचा प्रचंड पराभव झाला तेव्हा जवाहरलाल नेहरू म्हणाले, 'जोपर्यंत चीनशी झालेल्या युद्धाचा निकाल लागत नाही, तोपर्यंत भारत अलिप्ततावादाला बांधलेला नाही.' ह्यानंतर लगेचच भारताने अमेरिका व ब्रिटन ह्यांच्याबरोबर हवाई प्रात्यक्षिके केली. नंदादेवीची घटना ह्यानंतर लगेचच घडली.

म्हणूनच आपल्या परराष्ट्रधोरणात जे काही किरकोळ बदल झाले आहेत ते समर्थनीय ठरतात. अर्थात त्यात खूप सुधारणा करण्यासारख्या आहेत. श्री. वाजपेयी हे जनता पक्षाच्या मंत्रिमंडळातील एक कार्यक्षम मंत्री म्हणून उदयास आले आहेत, म्हणून त्यांच्याकडून ह्या अपेक्षा. □


आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा वेगळा शोध
स्पष्ट, परखड आणि प्रामाणिक

**जनांचा प्रवाहो चालिला**

लेखक : विनय हर्डीकर । किंमत वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

# सुखानाना टिपणीस

## दोन मुलाखती

झुंबरलाल कांबळे

नानासाहेब टिपणीस एक जबरदस्त व्यक्तिमत्त्व होते. तासन् तास आपल्या ज्ञानाच्या व वाणीच्या जोरावर बैठक रंगतदार करण्याचे कसब त्यांना अवगत होते. डॉ. बाबासाहेबांसारख्या महापुरुषाच्या सहवासात आपल्या उमेदीची अनेक वर्षे घालविण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्यामुळे त्यांचे ज्ञान चौफेर झालेले होते. त्यांची आकलनशक्ती आणि स्मरण असे जबरदस्त की, एकदा कधी तरी ऐकलली, वाचलेली, पाहिलेली किंवा अनुभविलेली घटना कालच त्यांच्या जीवनात घडून गेल्याप्रमाणे बैठकीवरच्या लोकांना ते ऐकवीत. चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचा इतिहास तर बारीक-सारीक तपशिलासह ते पुरवीत.

नानासाहेबांच्या घराण्यास इ. स. १४४२ सालापूर्वीपासून खोती चालत आली होती. म्हणजे पाचशे ते साडेपाचशे वर्षांपूर्वी त्यांच्या पूर्वजांनी मलिकंबरकडून घेतल्याचे नानासाहेब सांगत. पुढे त्यांनी खोतीविरुद्ध म्हणजे स्वतःच्या वाडवडिलांविरुद्धच बंड पुकारले !

नानासाहेबांच्या वेगवेगळ्या विषयांवर मुलाखती घेणे हा छंद मला गेल्या चार-पाच वर्षांपासून लागला होता. खोतीच्या संदर्भात अगदी अलीकडे म्हणजे २० एप्रिल १९७८ ला मी त्यांची एक मुलाखत घेतली व त्यांनी खोतीविरुद्ध चळवळ का केली ते जाणून घ्यायचा प्रयत्न केला. मी विचारले—

' नानासाहेब, ही खोती सिस्टिम कधी व कुणी रूढ केली ? '

' १४–१५ व्या शतकाच्या सुमारास खोतीसिस्टिम सुरू झाली असावी. कोकणच्या बहुसंख्य भागावर त्या वेळी मुसलमानी अंमल होता. कोकणातील जमीन ही जंगल-जमीन होती. तुफान पावसामुळे जंगलच सगळीकडे पसरलेले होते. शेती विरळ होती व वस्तीही विरळ होती. समृद्ध जंगल हे या भागाचे वैशिष्टय होते. विजापूरच्या आदिलशाहीतर्फे अंमलदार म्हणून मुरूड जंजिऱ्याच्या हबशीची नेमणूक झाली. तेव्हापासूनच कोकणातील वसतीची म्हणजेच गावांची व शेतीची व्यवस्था सुरू झाली असली पाहिजे. त्यातूनच खोती सिस्टिम सुरू झाली असली पाहिजे. '

' ज्यांनी जमीन कसायची जबाबदारी घेतली तेच पुढे खोत झाले. हे खोत त्यांच्या ऐपतीप्रमाणे हवी तेवढी पडिक किंवा जंगल असलेली जमीन शेतीसाठी तयार करून घेत असत. त्यासाठी गावे वसवीत असत. गावगाडा तयार करीत असत. '

' पण गावगाडा म्हणजे काय ? '

' म्हणजे गाव वसविला की त्याचा कारभार चालविण्यास सुतार, लोहार, न्हावी परीट, बुरुड, चांभार, महार, मांग, ब्राह्मण हे लोक लागत. त्यांना आपल्या गावात आणून खोत वसती करायला लावीत असे आणि गावगाडा सुरू होत असे. '

' त्यांना खोत शेती देत असे ? '

' सांगतो ना ! ऐका. खोत त्यांची सर्व जबाबदारी घेत असे. त्यांना घरे, रोजगार; त्यांच्या पोटा-पाण्याची व्यवस्था करण्याचे काम खोताचे. खोताची गावात शेकडो एकर शेती असे. त्या शेतीचे तीन प्रकार असत. '

' कोणते तीन प्रकार ? '

' गाव वसविलेल्या खोताने स्वतःसाठी मजूर लावून जमीन तयार करून घेतली. तीच पुढे खुद्द धाऱ्याची जमीन समजण्यात आली. हा पहिला प्रकार. खोतफायद्याची शेती हा दुसरा प्रकार. वसति करण्यास आणलेल्या लोकांना स्वतःचा काही हक्क देऊन जमिनी शेतीखाली आणण्याचा प्रयत्न केला. या प्रकारात मालकी खोताची, म्हणून उत्पन्नाचा काही भाग सरकारसारा आणि खोतफायदा घेऊन कुळांना जमीन कसण्यास देण्यात येत असे. कुळांच्या धाऱ्याची जमीन, हा शेतीचा तिसरा प्रकार. या प्रकारात शेतीचे स्वामित्व कुळाकडे असे. अशा शेतीचा कारभार चालत असे. '

### गावचा राजा

' गावगाड्यात एकूण १८ कोंब असत. देशपांडे, देशमुख, जोशी, सुतार, तांबट, कासार, वाणी, शिंपी, तेली, सोनार, जंगम, कुणबी, कुलकर्णी, न्हावी, धोबी, बुरुड, चांभार, महार या जातींना कोंब म्हणत. जो तो आपापली कामे करी. खोत हाच गावाचा राजा असे. म्हणून तो संपूर्ण गाव, तेथील जमीन, डोंगर, झाडझाडोरा त्याच्याच मालकीचा असे. गाव वसवितांना खोताने स्वतःचे काही अधिकार निर्माण केले. त्यांच्या परवानगीशिवाय बाहेरगावच्या लोकांना गावात प्रवेश नसे. खुद्द गावातील लोकांना त्याच्या परवानगीशिवाय स्वतःचे घरही बांधता येत नसे. गावठाणाची जागा त्याच्या मालकीची असल्याने त्याला वाटले तरच खोत घर बांधण्यासाठी जागा देत असे. त्याच्या विचाराशिवाय कुळांना स्वतःची घरेही शाकारता येत नसत. कुळाला काहीही करता येत नसे. एवढेच नव्हे तर आपल्या मुली-बाळींची लग्नेही जमविता येत नसत. कुणी कोणत्या गावात नवीन सोयरिक करावी हेही खोतच ठरवून देत असे ! '

' नानासाहेब, ही गुलामगिरीच झाली एक प्रकारची ! ! '

' अहो, खोत आपल्या गावावर कसे अधिकार गाजवीत असत तो प्रकार तर पुढेच आहे.

' वर्षातील बरेच दिवस गावातील लोकांना विनामूल्य त्याच्याकडे वेठबिगार करावी लागे. खोतच्या शेतीला कुपण घालावे लागे. त्याच्या घराच्या गोठ्याच्या जमिनी करून द्याव्या लागत. खोताच्या धाऱ्याच्या शेतीत मोबदला न घेता शेतीची सर्व कामे करावी लागत. एखादा खोत मांसाहारी असेल तर त्याला कोंबड्या, अंडी फुकट

पुरवावी लागत. खोतांची एक खास युक्ती होती, कुळवर्गीयांना आपल्या शेतीत राबवून घेण्याची. त्यांनी असे नियम केलेले असत की, लोकांनी आपल्या घरावर कौले घालू नयेत. भाताचा पेंढाच घालावा. तो प्रत्येक वर्षी बदलावा लागतो. त्यासाठी शेती करावी लागते. कमीत कमी स्वतःचे घर शाकारण्यासाठी तरी कुळवर्गीयांना खोताची शेती करावी लागे.

'आपल्या गावातील कुळांनी गाव सोडून जाऊ नये, म्हणून खोताने अनेक युक्त्या योजलेल्या असत. लोकांना वेगवेगळी कामे वाटून दिलेली असत. खोताची दुभती व भाकड जनावरे असत ती ठाकूर, कातकरी या लोकांना सांभाळावी लागत. मेलेली जनावरे त्या गावातील महाराने ओढायची. त्यांची चामडी काढून चांभाराला द्यायची. चांभाराने खोताच्या कुटुंबाला वहाणा पुरवायच्या. खोताला दूधदुभते पुरविण्याचे काम कुळवर्गीयाकडे असे. रानातच खोताचा वाडा असे. त्यात खोताची गुरे असत. त्यांचे दूध काढून ते मालकाच्या घरी नेऊन द्यावे लागे. हे काम करण्याची सक्ती कुळांवर केलेली असे. गावातील प्रत्येक घराची रोज आलटूनपालटून दूध पोचवायची जबाबदारी असे. त्यासाठी पाळी असलेल्या घराच्या दारात खोताचा सोटा पडे. म्हणजे उद्या आपण खोताकडे दूध पोहचते करायचे आहे, हे घरवाल्याच्या लक्षात यावे म्हणून आज ज्याची पाळी असेल तो दूध पोहोचवून झाल्यावर त्याच्या दारात पडलेली एक काठी उचलून शेजाऱ्याच्या दारात टाकी. ही काठी म्हणजेच खोताचा सोटा! काम झाल्यावर हा सोटा नंतर दुसऱ्याच्या, तिसऱ्याच्या दारात जो तो टाकी.

कुळांना राबासाठी पालापाचोळा लागे. तो ते खोताच्या जंगलातून जमा करीत व त्याच्या बदल्यात खोताच्या सरपणाची व्यवस्था कुळांना करावी लागे.'

'या खोताच्या गावगाड्यात महाराचे स्थान काय होते?'

'मी तर तुम्हाला सांगितले आहेच की, महार हेच कोकणचे मूळ रहिवाशी असले पाहिजेत, असे माझे ठाम मत आहे. या महाराकडे महारकीशिवाय इतर अत्यंत महत्त्वाची कामे असत. शेती हाच खोताचा मुख्य व्यवसाय. शेतीची मोजणी करण्याचे काम महाराकडे असे. महार स्वतःकडे अकरा फूट लांबीची काठी बाळगीत असे. या काठीने तो शेतीची मोजणी करी. म्हणजे महाराने केलेली शेतीची मोजणी खोत प्रमाण मानी. शेतावर गेल्यास महार बांधावर उभा राही. कोपऱ्यात तीन दगड मांडी. त्याला ऐरण म्हणत. तिथून तो शेत मोजी. महाराचे हे महत्त्व असल्याने त्याला गावचा रखवालदार नेमलेले असे. गावाची प्रमुख वेस असे. त्या वेशीत पहारा करण्याचे काम महाराचे असे. त्यालाच वेसकर म्हणत. गावात नवीन येणारा माणूस व गावातून बाहेर जाणारा माणूस याची नोंद वेसकर ठेवीत असे. म्हणजेच आजच्या गुप्तहेराचे काम तो करीत असे.'

'म्हणजे नानासाहेब, वेगवेगळी गावे खोतांनी रूढ केलेल्या प्रथांप्रमाणेच अगदी अलीकडेपर्यंत चालत असत, असेच ना?'

'हो. अगदी तसेच म्हणा; पण खोतीची वेठबिगार, गुलामगिरी खोती नष्ट झाल्यावर आपोआपच हळूहळू नष्ट होण्याच्या मार्गाला लागली.'

नानासाहेबांनी अलीकडे निरवानिरवीची भाषा सुरू केली होती. आमचा त्यावर विश्वासही नव्हता. कारण अगदी शेवटच्या प्रवासाला महाडहून निघेपर्यंत त्यांची प्रकृती ८१ वे वर्ष लागलेले असूनही ठणठणीत होती.

## शेवटची मुलाखत

आठ जूनला रात्री ११ वाजता ते पुण्याला गेले. त्या दिवशी दुपारी दोन–तीन तास मी त्यांची मुलाखत घेतली. या वेळी त्यांनी वेगवेगळी माहिती दिली. डॉ. बाबासाहेबांच्या संदर्भात मी त्यांना अधिक प्रश्न विचारले.

त्यांपैकी एक प्रश्न होता–

'बाबासाहेबांची दिनचर्या काय होती?'

'त्यांच्या दिनचर्येचा विचार आपण थोडा उलटा केला पाहिजे. रात्री दोन–तीन वाजेपर्यंत वाचीत किंवा लिहीत बसत. सकाळी झोपेतून उठायला आठ–साडेआठ वाजत; पण उठल्याबरोबर आळसात वेळ न घालवता ते सकाळचे स्नान वगैरे आटोपून कपडे घालून बैठकीवर येत. तिथे वर्तमानपत्राचे मथळे चाळीत. याच वेळी नाष्टा सुरू होई.'

'नाष्टा कसा असे?'

'ब्रेड, ऑम्लेट व भरपूर चहा त्यांना लागे. म्हणजे दोन–तीन कप तरी चहा लागे. नंतर कोर्टात किंवा ऑफिसात जात. संध्याकाळी कोर्टातून परत येताना 'विविध वृत्त-कार' तटणीस यांच्या ठाकूरद्वार (गिरगाव) येथील ऑफिसात जात. तिथे मामा पोरमकर, दळवी, तटणीस, वावडेकर ही मंडळी असत. शेव–चिवडा– खाता खाता त्यांच्या गप्पा सुरू होत.'

'गप्पांचे विषय काय असत?'

'मुंबईतले राजकारण, सामाजकारण हा विषय बहुधा असे. 'विविधवृत्त' साप्ताहिकात बावडेकर 'अलमगीर' हे सदर चालवीत. त्यात अशाच प्रकारची चर्चा खुसखुशीत व उपरोधिक भाषेत केलेली असे. या सदराला लागणारा मालमसाला ह्या बैठकीच्या गप्पांतच तयार होत असे. 'अलमगीर' हे सदर त्या वेळी खूपच गाजलेले होते. सात–साडेसातपर्यंत ते घरी येत. या वेळी त्यांना घरी भेटायला काही लोक आलेले असत. त्यांच्याशी ते बोलत. या लोकांत देवराव नाईक, बी. व्ही. प्रधान, कद्रेकर वगैरे मंडळी असत. त्यांच्याशी मग त्यांच्या गप्पा सुरू होत. रात्री दहा–साडेदहा वाजता जेवण उरकीत. त्यानंतर लगेच महत्त्वाचे वाचन, अभ्यास, लिखाण सुरू होई. ते रात्री कधी कधी दोन–वाजेपर्यंत चाले.

'कोर्टाला सुट्टी असल्यावर ते मित्रांसह फिरायला जात. अशा वेळी मित्रांसोबत त्यांचा 'लाइट टॉक' होई.'

'लाइट टॉक म्हणजे? उदाहरण सांगा नानासाहेब!'

'असे बघा. ते कोणत्याही विषयावर बोलत असत. एखाद्या वर्तमानपत्रातला अग्रलेख त्यांनी वाचला असेल व तो त्यांना आवडला नसेल तर म्हणत, संपादक फडतूस आहे. टीचभर लिहितो. त्याला अभ्यास करायला नको!'

## ब्रिटीश म्युझियममध्ये

'बाबासाहेबांना वेगवेगळ्या विषयांची आवड होती. एकदा त्यांना वाटले संगीत शिकावे. त्यासाठी त्यांनी एक व्हायोलिन वादक उस्ताद ठेवला; पण त्यांना ते शिकण्यास फारसा वेळ मिळाला नाही. ते पूर्णपणे निर्व्यसनी होते. दारू–सिगारेट यांना ते

स्पर्शही करीत नसत.

' इंग्लंडमध्ये असताना अत्यंत काटकसरीने राहात. सार्वजनिक बाथरूमवर जाऊन स्नान करीत. कारण तिथे खर्च कमी येई. तसेच त्यांना खायला लागणारा पाव हॉटेलात न घेता बेकरीत जाऊन विकत आणीत.'

' ब्रिटीश म्युझियममध्ये त्यांनी वेगवेगळया विषयांचा अभ्यास केला. मिलिटरीवरील ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. अभ्यास करताना ग्रंथांतून त्यांनी खुणेसाठी कागदी स्लिपा ठेवलेल्या होत्या. त्या संदर्भात एकदा ते म्हणाले होते–' मी अभ्यासासाठी वाचलेली पुस्तके कुणी उघडूनही पाहात नाही. ज्या ज्या वेळी मी इंग्लंडला जातो व मी अभ्यासलेली पुस्तके चाळतो त्या त्या वेळी मी ठेवलेल्या खुणा पुस्तकात जागच्या जागी असतात. त्यामुळे माझा फायदाच होतो. मला झटकन संदर्भ काढता येतो. असा त्यांचा अभ्यास व एखाद्या विषयाचा व्यासंग जबरदस्त असे.'

अशी अत्यंत दुर्मिळ माहिती नानासाहेब सांगत असत. कळत–न कळत माझी पावले त्यांच्या गोविंदनिवासाकडे वळतात आणि त्यांची सुनी–सुनी भासणारी बैठक पाहून मन सुन्न होते. खोतीविरुद्ध बंड करणारा खोत–एक आंबेडकरी भक्त पुन्हा आपणाला भेटणार नाही, ही जाणीव मनाला बेचैन करते. □

# मॉनिटर ते कॉर्पोरेटर

## ' नेतृत्ववर्धिनी 'चे शिबिर

शाळांमध्ये प्रत्येक वर्गात, वर्गाचे कुठलेही काम, मग ते फळा पुसण्याचे असो वा त्याच फळयावर बोलणाऱ्या मुलांची नावे लिहिण्याचे असो, आपुलकीने, तळमळीने आणि उत्साहाने करणारा एखादुसरा मुलगा आपल्याला हमखासच सापडतो; पण ही त्याची नेतृत्वाची वृत्ती अगर धडपड टिकते जेमतेम कॉलेजपर्यंत. कॉलेजचा जनरल सेक्रेटरी अथवा सी. आर. इथपर्यंतच ह्याची मजल मोठ्या मेटाकुटीने जाते. समजा, इतके होऊनही जर त्याच्यातील धडपड थोडया फार प्रमाणात तग धरून असेल तर गणेशोत्सवमंडळाचे सेक्रेटरी इतपतच त्याचे मर्यादित कर्तृत्व. मग पुढे नगरसेवक, आमदार, खासदार तर दूरच...

तर अशा ह्या धडपडया, कुठलेही काम जबाबदारीने स्वीकारणाऱ्या तीसएक मुलांना जमवून त्यांचे एक अभिनव शिबिर योजले होते श्री. म. गं. पटवर्धन ह्यांनी! शिबिराची वेळ होती सुट्टी अगदी ऐन रंगात येते तेव्हाची, म्हणजे २७ मे १९७८ ते ११ जून १९७८. दहावीत गेलेल्यांपासून कायद्याचा अभ्यास करणाऱ्यांपर्यंत विविध मुलांनी हजेरी लावली होती. एकूण ४२ असे अभ्यासपूर्ण कार्यक्रम झाले.

अभ्यास करताना मुख्य तीन भाग पाडण्यात आले होते. शहराचा अभ्यास, महानगरपालिकेचा अभ्यास आणि नगरसेवकांशी संपर्क. पुन्हा शहर आणि महानगरपालिकेचा अभ्यास करताना दोन उपविभाग पाडले होते. ते म्हणजे चर्चात्मक भेटी आणि त्यावर आधारित विविध स्थळांना भेटी. त्यामुळे प्रत्येक स्थळाबद्दल पूर्वपीठिका तयारच असायची आणि म्हणूनच जो जो म्हणून अभ्यास केला तो पक्काच झाला. शंका, मग ती कुठल्याही प्रकारची असो, विचारायला पूर्ण मुभा होती. त्यामुळे नवीन माहिती मिळाली आहे, पण मनात मात्र शंकांचे मोहोळ उठलेय, हा सर्वसाधारणपणे होणारा प्रकार येथे टाळला गेला होता. वक्त्याला दिलेल्या विषयाकडे तो एखाद्याच दृष्टिकोनातून पहाण्याची शक्यता असते. त्यामुळे विषय काहीसा एकांगी हाताळला जाण्याचा संभव असतो; पण चर्चेच्या वेळी तीस जणांची डोकी तीस तऱ्हांनी आणि दिशांनी चालणार त्यामुळे अक्षरशः भसाभसा शंका ओतल्या जायच्या आणि तो विषय चौफेर अभ्यासला जायचा.

शिबिराचा नारळ फोडला गेला पर्वतीवर! शहराचा अभ्यास करायचा म्हणजे नेमके काय करायचे, यावर चर्चा होऊन शास्त्रशुद्ध अभ्यासाला एकदाची सुरुवात झाली. भौगोलिक गोष्टी आणि आजूबाजूचा परिसर लक्षात घेऊन पुण्याचे पृथ्वीगोलावरील स्थान निश्चित झाले. नुसता भौगोलिकच नाही तर शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, व्यापारी, करमणूक, संरक्षण ह्या सर्वच दृष्टींनी पुण्याचा अभ्यास झाला आणि आमच्यासमोर साकार झाले पुण्याचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व!

माणूस हा समूहप्रिय प्राणी आहे, असे नेहमीच म्हटले जाते. त्यातूनच निर्मिती होते वसाहतींची; पण हा समूह नेहमीच विस्कळित असतो. त्यामुळे कुठलेही काम करण्याची पात्रता, कुवत असूनही योजकाअभावी अथवा नेत्याअभावी हा समुदाय निष्क्रिय असतो. थोडेसे पुढे जाऊन मी म्हणेन की, माणूस हा 'नेताप्रिय' प्राणी आहे. शाळेतील वर्गामध्येसुद्धा थोड्याफार प्रमाणात अशीच स्थिती असते. वर्गशिक्षकांना ऊठसूट विद्यार्थ्यांमधील भांडणे सोडवायला अगर त्यांचे प्रश्न जाणून घ्यायला वेळच नसतो. अशा वेळी त्यांच्यातलाच कुणी तरी एक मुलगा उठतो, जो हे प्रश्न जवळून बघत असतो, अनुभवीत असतो. तो उठतो आणि छोट्या पातळीवर त्यावर उपाययोजना करतो. थोडक्यात म्हणजे मॉनिटर ही कार्पोरेटरची एक छोटी प्रतिकृतीच असते, ज्या लोकांच्या समस्या सोडवयाच्या आहेत त्यांच्यातच राहून समस्या सोडविणारी!

तर अशा ह्या निरनिराळ्या जबाबदाऱ्या घेणाऱ्या मॉनिटर्सना प्रशिक्षण देऊन त्यांना त्या पुढच्या पायरीपर्यंतच्या प्रवासाचे मार्गदर्शन करणे, हा शिबिराचा मुख्य हेतू. 'फ्रॉम मॉनिटर्स टू कार्पोरेटर्स' हे उद्दिष्ट ऐकायला जरी सुटसुटीत वाटले तरी प्रत्यक्षात लांब पल्ल्याचे आहे.

अभ्यासक्रमाविषयी मला मुद्दाम एक गोष्ट नमूद करावीशी वाटते आणि ती म्हणजे आपले रहाते घर आणि त्याच्या आसपासचा

परिसर ह्यापलीकडेही पुणे पसरले आहे, ह्याची झालेली जाणीव. सुमारे दोन लाख लोक अतिशय वाईट स्थितीत आणि जीवनावश्यक मूलभूत तिन्ही गरजा अपूर्ण आहेत अशा अवस्थेत रहाणारे ह्याच पुण्यात आहेत महिला सेवाग्रामसारख्या ठिकाणी आई-वडिलांशिवाय खेळण्या-बागडण्याच्या वयात स्वावलंबी बनून अतिशय माफक गरजा असणाऱ्या मुली पाहिल्या की, आपल्याच भाग्याचा हेवा वाटू लागतो.

कृत्रिम अवयव-केन्द्रातील हजारो अपंग आणि त्यांची अपंगत्वावर मात करण्याची जिद्द पाहिली आणि माझी मलाच लाज वाटू लागली. मी चांगली धडधाकट आहे. दोन हात, पाय, नाक, डोळे इ. अवयव जागच्या जागी आहेत आणि तरीही मी किती निष्क्रिय आहे; ऐदी आहे आणि मग प्रत्येकाच्या मनाला टोचणी लागली. झोपडपट्टीतील ह्या उघड्या वाघड्या मुलांसाठी मी नाही तर कुणी काम करायचे? समाजात अशीही माणसे पसरली आहेत. आपण समाजाचे देणे लागतो ह्या जाणिवेतच उद्याचे समाजकार्यकर्ते निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. आपल्या सुरक्षित घरापलीकडील विश्व दाखविण्याचे काम त्या शिबिराने यशस्वीपणे केले आहे; त्याचबरोबर कुठलेही दिखाऊ काम करणे अशक्य असलेल्या कसबा पेठेत अॅड. नंदू घाटे ह्यांनी त्यातल्या त्यात अनेक सोयी केल्या आहेत. त्यामुळे प्राप्त परिस्थितीवर तोडगा काढून मात करता येते, ह्याचे कळत नकळत संस्कार मनावर होत होते.

पुणे शहराची संभाव्य वाढ, घरांचा प्रश्न ड्रेनेज-व्यवस्था, बस-वाहतूक, महानगरपालिकेला दिलेली भेट ह्यामुळे ह्या प्रचंड शहराची धुरा वाहाण्याचे काम किती तापदायक आहे, हे जाणवले. शहराच्या विकासासाठी राबविलेल्या योजना, त्यात आलेल्या अडचणी, लागलेले भांडवल आणि फसलेल्या योजना ह्यांची आतापासूनच तोंडओळख झाली. लोकप्रतिनिधींना आवश्यक ती दूरदृष्टी पण पाहिजे, ह्याचे चांगलेच महत्त्व पटले. आदर्श नगरसेवकाची लक्षणे ह्यावर चर्चा झाली. त्यामुळे साहजिकच कार्पोरेटर झाल्यावर पहिली काही वर्षे चाचपडत घालविण्यात, बजेट आणि कामकाजासंबंधी ग म भ न शिकून मग कार्याला सुरुवात करणे, ह्यात किती तरी वेळ नाहक वाया जाणार आहे. त्यापेक्षा हे पूर्वशिक्षण नक्कीच फायद्याचे आहे.

शिबिराचा दुसरा उद्देश होता समान आवडीची मुले गोळा करून त्यांची मैत्री वाढविणे. आवडीनिवडी मिळत्याजुळत्या असल्याने अगदी थोडक्या काळात आमची मैत्री झाली, वाढली आणि अजूनही टिकली. कितीही बडबडा स्वभाव असला तरी घरबसल्या एकदम तीसएक जणांशी ओळख होणे केवळ अशक्य आहे. साहजिकच शाळा-कॉलेजमधील मित्र-मैत्रिणींच्या वर्तुळातून आम्ही बाहेर पडलो. शिवाय जाता-जाता सुट्टीचा सदुपयोगही झालाच. मुख्य म्हणजे आपण कुठले तरी शैक्षणिक शिबिर आयोजित करतो आहोत, असा साधा आभासही न करता हे शहराबद्दलचे शिक्षण सायकलवरून भटकता भटकता आमच्या गळी नकळत उतरविले गेले.

कार्पोरेशनमधल्या काही अधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रात उद्भवणाऱ्या अडचणी सांगितल्या. सध्या तरी पर्यायी उपाययोजना डोळ्यांसमोर नाहीत. आता उदाहरणच घ्यायचे झाले तर कमिशनर श्री. पु. स. पाळंदे ह्यांनी उपस्थित केलेला मुद्दा. सकाळी सहा ते आठ ह्या वेळात कामगारवर्ग रस्ते साफसूफ करतात आणि आठनंतर दुकाने उघडली की, प्रथम झाडू हातात घेऊन आपले दुकान साफ करण्यामागे मालकलोक लागतात. राजरोसपणे दुकानातील कचरा रस्त्यावर ढकलण्यात येतो. आता अशासारख्या अनेक समस्या अनुत्तरितच आहेत. ह्यावर तोडगा कोण काढणार? आणि कधी काढणार? माझा विश्वास आहे आज ना उद्या ह्या समस्या सुटतील.

तीस जणांनी शिबिरात भाग घेतला होता, तरीही आम्हा सर्वांच्या डोळ्यांसमोर चित्र स्पष्ट आहे. आमच्यापैकी केवळ दोन ते तीन व्यक्ती कार्पोरेटर व्हायला लायक आहेत; पण म्हणून इतरांवर घेतलेले परिश्रम वाया गेले असे म्हणणे मूर्खपणाचेच ठरेल. पुण्याच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करणारे जागरूक नागरिक निर्माण करणे आणि मुलांना विचाराची वेगळी दिशा दाखविणे, ह्याचे केवढे तरी मोठे समाधान आहे.

अशी शिबिरे फक्त पुण्यातच भरावीत असे नव्हे. सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, नागपूर अशा ठिकाणच्या स्थानिक लोकांनी वेळोवेळी अशी शिबिरे भरवली तर भावी कार्पोरेटर्सची एक प्रशिक्षित पिढीच तयार होईल. सध्या पुण्याने केलेली सुरुवात तरी जोरकस आहे.

—कादंबरी दांडेकर

[ शिबिरसंयोजक श्री. म. गं. पटवर्धन हे फर्ग्युसन महाविद्यालयात शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक आहेत. आपल्या फावल्या वेळात असे विविध प्रकारचे उपक्रम ते चालवितात. शिबिरासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास कामाच्या वेळात ते फर्ग्युसन महाविद्यालयात भेटतील. ]

कथा

# प्राक्तन!

गिरीश शरद भिडे

शहराच्या मध्यवस्तीतला मेनरोड. दाटीने उभ्या असणाऱ्या छोट्या-मोठ्या घरां मधून वाहनांनी आणि माणसांनी वाहणारा काळा डांबरी रस्ता. रस्त्याच्या दोन्ही तीरांना गच्च भरलेली दुकाने. एप्रिलचे दिवस संपणाऱ्या वर्षाबरोबर हळू हळू तापणारं वातावरण. सकाळची वेळ होती. रस्ता ओलांडून स्वतःच्याच तंद्रीत सिगारेटचे झुरके घेत 'तो' चालला होता. एकदम समोर कुणी तरी येऊन थांबल्यासारखं त्याला वाटलं. थोडक्यात चुकलं, नाही तर धडकच बसली असती.

'सॉरी,' तो अस्पष्टसं पुटपुटला आणि पुढे जायला निघाला.

'जस्ट ए मिनिट, प्लीज!'

'तो' थबकला. त्याने समोरच्या व्यक्तीकडे नीट पाहिलं. काळसर तपकिरी रंगाची पँट, पांढरा साधाच शर्ट, खोचलेला; उंची—त्याच्यापेक्षा थोडीशी कमीच, म्हणजे काहीसा बुटकाच, अरुंद काचांचा आणि जाड भिंगांचा चष्मा!

'येस?'

'तुम्ही...म्हणजे आय मीन...माझं थोडं काम होतं तुमच्याकडे.'

त्याने नीट पाहिले. छे, हा चेहेरा ओळखीचा नव्हता! अगदी डोळ्यांमधल्या आर्जवी भावांसकट हा चेहेरा पूर्ण अनोळखी होता.

'माझ्याकडे?'

'अं...हो...'

निष्काळजी सायकलस्वाराचा एक पुसटसा धक्का त्याच्या हाताला लागला आणि अभावितपणे तो रस्त्याच्या आणखी कडेला सरकला.

'माझं नाव व्ही. बी. कानेटकर. मला आपली थोडीशी मदत हवीय...आय मीन पैशाची...'

छपरावरून अचानक, टपकन् एखादी लिबलिबीत पाल अगदी आपल्या पायाशेजारी पडावी तसा त्याचा चेहेरा झाला. झुरळ झटकावं अशा लगबगीने 'तो' जायला निघाला. त्याच्या चेहेऱ्यात सरासर झालेले बदल कानेटकरने बरोबर टिपले. अजीजीने त्याचा हात घट्ट पकडून तो म्हणाला, 'बरोबर आहे; असं रस्त्यावर थांबवून मी तुम्हाला मदत मागतोय, याचा अर्थ तुम्ही असाच घ्याल; पण फॉर गॉडस् सेक, माझ्यावर विश्वास ठेवा. प्लीज, तुम्ही माझ्याबाबत काही गैरसमज करून घेऊ नका!'

नाईलाज झाल्यासारखा 'तो' थांबला.

'काल संध्याकाळी आलो मी—औरंगाबादहून! आता मला कोल्हापूरला जायचंय. सकाळपर्यंत सुटेबल गाडीच नव्हती आणि शिवाय या शहरात माझं कुणी ओळखीचंही नाही... वेळ घालवायचा म्हणून रात्री सर्कसच्या शेवटच्या शो ला गेलो आणि... खरोखर विश्वास ठेवा, माझी पैसे ठेवलेली बॅग चोरीला गेली. रात्र कशी तरी दुकानाच्या फळीवर काढली. आज मात्र...'

त्याचा निर्णय थोडासा बदलल्यासारखा वाटला; कानेटकरच्या बोलण्याचा तो थोडासा सीरीयसली विचार करतोय, असं वाटलं. पण नसत्या उपकारांच्या लफड्यात स्वतःला गुंतवून उगाच घाट्यात यायचीही बहुधा त्याची तयारी नव्हती.

कानेटकरने आपल्या तपकिरी पँटच्या खिशातून चुरगळलेली दोन-तीन तिकिटे काढली. एक होतं सर्कसचं आणि बाकी दोन बसची होती.

'मुद्दाम तुम्हाला दाखवतोय, तुमचा विश्वास बसावा म्हणून; पण आता या चिठोऱ्यांशिवाय माझ्या खिशात या घडीला काही नाही हो!' कानेटकरने त्या तिकिटांचे तुकडे केले आणि ते लाल-पांढरे कपटे हताशपणे त्याच्या पायाशी येऊन विसावले.

मनात चाललेली चलबिचल त्याच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होती. आपल्यावर असा काही प्रसंग ओढवला तर, या जाणीवेनं तो दचकत होता; पण या कानेटकर नामक माणसावर सहजी विश्वास टाकायलाही त्याची तयारी होत नव्हती.

'...तुम्ही कोल्हापूर नाही पण निदान साताऱ्यापर्यंतच तरी भाडं देऊ शकाल का?' कानेटकर अजीजीने म्हणाला. 'साताऱ्याला माझे नातेवाईक आहेत एक, त्यांच्याकडून घेईन मी बाकीची मदत...'

त्याचा काही निर्णय पक्का होतोयसं वाटलं. जगात अजून माणुसकी शिल्लक असावी, अशी त्याची मनोमन श्रद्धा होती. त्याला माणूस म्हणून जगायचं होतं. तरीही त्याने थोडा विचार केला. दहा रुपये त्याच्या दृष्टीने तशी फार मोठी रक्कम नव्हती...पण फार छोटीही नव्हती. हा कानेटकरही कदाचित माणूस असेल, खरंच अडचणीत सापडला असेल, असं त्याला मनापासून वाटायला लागलं.

'डोंट वरी अबाउट मनी, मी कोल्हापूरला पोचलो की अगदी लगोलग M. O. करून टाकीन.' कानेटकर मनातले विचार वाचावेत तसा उद्गारला. 'एक माणूस म्हणून विचार करा. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवा. दुर्दैव असं की, माझी विश्वासार्हता माझी मलाच केवळ शब्दांनी पटवून द्यायला लागतेय.'

त्याने कानेटकरकडे पुन्हा एकदा नीट पाहिलं. कानेटकर शिकलेला वाटत होता. सुसंस्कृत दिसत होता. पोषाखावरून बेताच्या परिस्थितीचा वाटत होता. असेल...खरंच असेल. अशा परिस्थितीमुळे फक्त भाडेखर्चाचे पैसे त्याने खिशात ठेवले असतील...नाही बॅगेत...पण बॅगेत का?

'आता मला वाटतंय, कुठून दुर्बुद्धी झाली न् पैशाचं पाकीट काल रात्री बॅगेत टाकलं,' कानेटकर अर्धवट स्वताशी व अर्धवट त्याच्याशी पुटपुटला.

त्याने निर्णय घेतल्यासारखा दिसला. त्याने खिशातून पाकीट काढलं. दहा रुपयांची एक नवी नोट झटकन् कानेटकरच्या हातात ठेवली. त्या पैशांसकट कानेटकरने त्याचा

हात आवेगाने धरला.

'खरं सांगतो तुमच्यासारखा माणूस हल्ली मिळणं फार मुष्कील झालंय्. खरे-खुरे...निदान मला भेटलेले तरी देवमाणूस आहात तुम्ही, देवमाणूस !'

त्याच्यातला माणूस थोडासा सुखावला.

'आपली ओळख काहीही नाही आणि मी एखाद्या लफंग्यासारखा आपल्याला भेटून पैशाची मदत मागितली तरी तुम्ही माझ्या-वर विश्वास टाकून मला मदत केलीत ! खरोखर तुमचे आभार मानावेत तितके थोडे आहेत. माणसाची चांगली पारख आहे तुम्हाला !'

त्याच्यातला माणूस काहीसा निर्विकार बनला.

'तुम्ही जेवढा आपलेपणा दाखवलात तो मी खरोखरीच कधी विसरणार नाही ! तुम्ही भेटला नसतात तर आज माझी काय स्थिती झाली असती, याची मला अगदी कल्पनाही करवत नाही हो !'

त्याच्यातला माणूस आता मात्र कंटाळला.

'तुमचा मला पत्ता देता नं, म्हणजे तिकडे पोचल्यावर मी M. O. करून टाकीन !'

त्याने एका कागदावर पत्ता लिहायला सुरुवात केली.तेवढ्यात शेजारी उभा असलेला, एकटक सर्व पाहणारा एकजण पुढे आला. 'ह्या'ला पाहिल्यावर कानेटकर एकदम दचकला. कानेटकरच्या चष्माळल्या डोळ्यां-पुढे कानेटकरला स्वतःला तीन दिवसांपूर्वीचा प्रसंग आठवला. असाच एक गर्दीने वाहणारा रस्ता होता...पण त्या रस्त्याचं नाव वेगळं होतं...तो रस्ता शहराच्या दुसऱ्या, लांबच्या भागात होता. अशीच दुकानं होती; पण त्यांच्या पाट्या वेगळ्या होत्या. कानेटकर तेव्हाही तोच होता, पण तेव्हा 'त्याच्या' जागी 'हा' होता. कानेटकरला सारं आठ-वलं. 'ह्या'ने दिलेले पंधरा रुपयेही आठवले आणि कानेटकरच्या डोळ्यांपुढे अंधारी आली. दोन क्षुब्ध आवाज त्याच्या कानांशी घणघणू लागले.

'कानेटकर...फसवा...लुटारू...बदमाश ...लफंगा !'

कानेटकरने न बोलताच 'त्या'ला ती दहा रुपयांची नोट परत केली नि खालच्या मानेने व भीतीभरल्या डोळ्यांनी तो जायला निघाला; पण मग दचकून थांबला. 'त्या'ची आणि 'ह्या'ची अशी आणखीन काही रूपे तयार झाली होती. कानेटकरने दयेच्या अपेक्षेने त्याच्याकडे पाहिले.

त्याच्यातला माणूस संपला होता.

त्याच्यातलाच नाही तर कानेटकरच्या आजूबाजूला जमलेल्या सगळ्यांच्यातला माणूस पाऽऽर खलास झालेला कानेटकरला दिसला. फसविले गेलेले, चिडलेले, अपमानित झालेले, सारे क्षुब्ध... ! माणसांची विनवणी करायची, माणसाला फसवायची कानेटकरला सवय होती. या सगळ्यांशी काय बोलावे, कुणाशी बोलावे ते कानेटकरला समजेना; पण त्याला बोलायला लागलेच नाही. त्याच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले. नाका-वर घसरलेला चष्मा सावरीत कानेटकर मागे हेलपाटला. धडपडून उभे रहायचा प्रयत्न करू लागला. त्याच्यापैकी कुणी तरी – बहुधा 'त्याने'च कानेटकरचा चष्मा खाली पाडला आणि लाथेने ठोकरून त्याचे पार तुकडे तुकडे करून टाकले. चष्मा गेल्यामुळे कानेट-करला सारेच अस्पष्ट, धूसर झाले. अगतिक-पणे मारापासून तोंड चुकवीत डोक्यावर हात धरून तो खाली बसला...शरण आल्या-सारखा.

कानेटकरकडून काहीच प्रतिकार होत नाही, असे दिसल्यावर 'त्या' सर्वांची मनुष्यशून्यता हळू हळू विरघळली. प्रत्येक-जण हळू हळू स्वतःच्या उद्योगाला निघून गेला.

'ते' सर्व निघून गेल्यासारखे वाटल्यावर कानेटकरने सावकाश मान वर उचलली. समोरचे सारेच त्याला अस्पष्ट धुक्यातल्या-सारखे दिसत होते. शरीराबरोबर मनही बधीर झाले होते. फूटपाथवरून जाणाऱ्या येणाऱ्या आकृत्या त्याला जाणवत होत्या. हळू हळू काय घडलेय, याचा त्याला अंदाज येत होता. फुटपाथवर पडलेल्या त्याच्या चष्म्याच्या काचेने परावर्तित केलेली एक तिरीप त्याचे डोळे भेदून जात होती. त्या काचेला त्याने चिडून ठोकरले; पण त्याची लाथ त्या काचेला लागलीच नाही. तिरीप येतच राहिली.

रागाने, अपमानाने, चिडीने, द्वेषाने त्याच्या डोळ्यात पाणी गोळा झाले. समोरचे आधीचेच धूसर दृश्य आणखीनच अंधुक झाले. त्या धूसर पडद्यावर त्याला स्वतःचे चार जुनाट भिंतींचे एक दरिद्री घर दिसले. घराच्या आजूबाजूची बजबजपुरी दिसली. त्या चार भिंताडांच्या घरात दारू पिऊन धिंगाणा घालणारे आणि एक दिवस खोकत खोकत कुजकी काडी मोडावी तसे मरून गेलेले त्याचे वडील दिसले; स्वतःचे अपुरे शिक्षण दिसले; स्वतःचे वेगळेपण टिक-विण्याची त्याची स्वतःची धडपड दिसली; उंच उभा केलेला मनोराज्यातला स्वप्नांचा किरमिजी डोलारा आपोआपच कोसळताना दिसला...त्या मनोऱ्याच्या दगड-विटांखाली सापडलेली आपली आजारी जन्मदात्री आई त्याला दिसली...मृत्युशय्येवरची त्याची आई...!

...मग असाच एक लांबलचक पसरलेला निर्दय, काळाशार, फत्तरी, स्थितप्रज्ञ रस्ता त्याला दिसला. त्या रस्त्याच्या दोन्ही तीरांना मग आपोआप घरांची दाटी झाली, दुकानांची धंदेवाईक गर्दी झाली. माणसे आणि वाहने त्या रस्त्यावरून वाहू लागली...धरणातून मोजकेच सोडलेल्या पाण्यासारखी...त्या रस्त्यावर मग तो स्वतः त्याला दिसला. एखादा सज्जन 'माणूस' हेरून बॅग हर-वल्याची बतावणी करीत पैसे मिळवायच्या चिंतेत असलेला तो स्वतः त्याला दिसला. रस्ते बदलत राहिले, दुकाने बदलली, माणसेही बदलली; पण कानेटकरमध्ये काही बदल झाला नाही. परिस्थितीच्या रागाने, स्वतःच्याच वाटणाऱ्या तुच्छतेने तो थुंकला आणि विचारांची गर्दी, वास्तव परिस्थि-तीची भीषण मालिका न साहवून त्याने डोळे मिटले. त्याच्या डोळ्यांतून घळकन् पाणी ओघळले. सारी दृश्ये अदृश्य झाली. पुन्हा एकदा त्याला लगबगीने जाणारी वाहने, फूटपाथवरून जाणाऱ्या माणसांच्या आकृत्या जाणवू लागल्या.

छापखान्यातली पार्ट-टाइम नोकरी करूनही आईच्या औषधाला पैसे पुरत नाहीत, म्हणून माणसांना फसविणारा तो आज सुन्न होऊन बसला होता. चष्मा फुटला होता. त्याचे चाळीस-पन्नास रुपये मिळविणे ही पहिलीच गरज होती. आईच्या वाढत चाललेल्या दुखण्यावर आणखी औष-धोपचार आवश्यक आहे, ही त्याआधीची गरज होती आणि कदाचित कसेही करून जगणे, ही त्याही आधीची गरज होती.

इतका वेळ चष्म्याशिवाय पाहिल्याने असेल, पण त्याचे डोळे दुखायला लागले. वेदना असह्य झाल्यावर त्याने दोन्ही हातांनी डोळे झाकून घेतले आणि मिळालेल्या तात्पुरत्या अंधारावर समाधान मानून, गुडघ्यात डोके खुपसून तो तसाच एका पायरीवर बसून राहिला... □

# ढासळत्या हिमालयाची हाक

इंदू टिकेकर, उत्तर काशी

तामीळनाडूचे जगन्नाथन्जी २५ वर्षांनंतर पुन्हा हिमालयाच्या देवभूमीत पदार्पण करीत होते. 'त्या वेळच्या नि आताच्या हिमालयात काय फरक जाणवतो ?' त्यांना विचारले. गंभीरपणे ते उद्‌गारले—'आजच्या हिमालयाला टक्कल पडलें आहे !' वनस्पतिविहीन, खडकाळ नि रुक्ष पहाड केवळ नजरेलाच निराश करणारे असते तर फारसा प्रश्न नव्हता. अलीकडील काही वर्षात 'स्थावराणां हिमालयः' आपली इतिहास-पुराणप्रसिद्ध स्थिरता हरवून टाकू लागला की काय, असे वाटू लागले आहे. हजारो वर्गमैल पसरलेल्या हिमालयाच्या क्षेत्रात दरवर्षी असंख्य ठिकाणी तो ढासळत चालला आहे आणि त्यामुळे समस्यांची आणि संकटांची परंपराच निर्माण झाली आहे. याचा परिणाम केवळ भारतालाच नव्हे तर हिमालयाच्या परिसरात येणाऱ्या सर्व राष्ट्रांना ( अफगाणिस्तानापासून ब्रह्मदेशापर्यंत ) भोगावा लागतो आहे. यामुळेच केवळ येथील केन्द्र व राज्यसरकारे, समाजसेवी संस्था व व्यक्ती आणि वैज्ञानिक यांना खडबडून जागे व्हावे लागले आहे असे नव्हे तर, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील यूनोसारख्या मानवकल्याणकारी संस्थेला व सहानुभूतिशील परिस्थितिवैज्ञानिकांनाही कार्यतत्पर व्हावे लागले आहे. 'खल्वाटो निर्धनः क्वचित्' हे मनुष्याच्या बाबतीतही वैज्ञानिक सत्य नव्हेच, पहाडांच्या बाबतीत तर हे सरळ सरळ विपरीत वचन आहे ! मानवी इतिहास सांगतो की, पहाडांचे निर्वनीकरण होणे म्हणजे त्या भागातील मानवी संस्कृतीच्या विनाशाला निमंत्रण देणेच ठरते !

मग हा असा आत्मघाती खेळ कोणी आणि केव्हा सुरू केला ? भारतीय संस्कृती वनसंस्कृती म्हणून प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. येथील साहित्यकला व अध्यात्म जंगलांच्या सान्निध्यात फुलली आणि फळली. एक वृक्ष वाढविणे म्हणजे दहा पुत्रांना वाढविण्याइतके पुण्यकारक आहे, असे येथे मानले गेले. इतर अनेक संस्कृत्यांचे विलयन झाले; पण येथे साम्राज्ये अनेक मावळली तरी संस्कृतीचा गुणात्मक गाभा तग धरून राहिला, याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे माणसाशी आणि वृक्षांशी असलेला मित्रत्वाचा, जिव्हाळ्याचा संबंध. तेव्हा निर्वनीकरणाचा अभिशाप हा आधुनिक आत्मकेंद्री माणसाच्या उपभोगप्रवण दृष्टीचा परिणाम आहे, हे लक्षात यायला वेळ लागत नाही. शंभर वर्षांपूर्वीचे हिमालयातील सरकारी गॅझेटियर सांगते की, हिमालयात दुष्काळ पडू शकत नाही, कारण येथे जंगली फळे-फुल व सुकेमेवे वनवासींचे पोषण करायला समर्थ आहेत. ब्रिटिशांना देश लुटायचा होता. त्यांनी येथील मिश्रत जंगले पद्धतशीरपणे निकालात काढली व व्यापारी दृष्टीने उपयुक्त ठरतील अशी देवदार व मुख्यतः चीडची जंगले—अगदी महासागरच—निर्माण केले.

या व्यापारी वननीतीचे दुष्परिणाम अलीकडील काही वर्षांपर्यंत प्रकट झाले नव्हते. कारण हिमालयाचा व विशेषतः उत्तराखंडाचा भाग इतका अविकसित होता की, या प्रदेशाची लूट करण्याला आवश्यक अशी आवागमनाची साधने दुर्लभ होती. संकटामुळे जाग येते व विकासाची दृष्टी लाभते. चीनच्या आक्रमणाला इकडील भागात यामुळेच 'कृपा' मानले जाते. कारण देशभक्तीत व बलिदानाच्या शक्तीत गढ़वाली व कुमाऊ लोक कुठेही कमी पडले नसूनही स्वातंत्र्यानंतर चीनच्या लढाईपर्यंत हें क्षेत्र—इतर सीमावर्ती प्रदेशांप्रमाणेच दुर्लक्षित राहिले. १९६० च्या आसपास रस्ते शाळा—कॉलेजेस्, हॉस्पिटलस्, सिंचाई-व्यवस्था, बांध, धरणे या विकासकार्यक्रमांनी जगजीवन व हिमालयाचे वातावरणही बदलू लागले; परंतु विकास-योजनांना जर स्थानीय लोक-जीवनांच्या कल्याणाची दूरदर्शी दृष्टी लाभली नाही तर लोकांचे हित व वातावरणाचे संतुलन साधण्याऐवजी संकटपरंपराही कोसळू लागते, याचा अनुभव येथे व साऱ्या उत्तर भारतालाच यायचा होता. परकीयांचा वसाहत वाद आटोपला तरी स्वदेशी वसाहतवादी वृत्ती पालटली, असे घडले नाही. त्यामुळे हिमालयासारख्या निसर्गविज्ञानाच्या दृष्टीने अग्रीम महत्त्वाच्या पर्वतीय क्षेत्रात सरकार व व्यापारीवर्ग यांच्याकडून घोडचुका घडू शकल्या. मोटार-रस्त्यांची अविवेकी वाढ वनविनाशाला व भूस्खलनाला एका बाजूने कारणीभूत तर झालीच; पण वनसंपदेची लूट करायलाही तिने मुख्यतः हातभार लावला. ही लूट अर्थातच व्यापारी वननीतीचा परिणाम आहे. कागदाच्या, इमारती लाकडाच्या व खेळांचे सामान बनविणाऱ्या कारखान्यांना लिलावाने जंगले द्यायची व पुनर्वनीकरणाची गंभीरपणे योजना स्वीकारायची नाही, ही प्रमुख चूक झाली. शिवाय रेझिन व टर्पेंटाइन इत्यादी तयार करणाऱ्या प्रचंड केंद्रीय कारखान्यांसाठी चीडपासून लीसादोहन करण्याचे ठेके व्यापाऱ्यांना दिले गेल्याने या जंगलांची जी अपरिमित हानी झाली ती तर अगदीच नामुष्कीची गोष्ट. गेल्या आठ-दहा वर्षांत दुबळे झालेले हजारो चीडचे वृक्ष सोसाटयाच्या वाऱ्याने उन्मळून पडले आहेत. जर्मनीचे विश्वविख्यात परिस्थितिवैज्ञानिक डॉ. रीजरनी म्हटले आहे—In India it is the commercial over utilization of the forests that is creating havoc !

व्यापारी वननीतीप्रमाणेच वाढत्या लोकसंख्येची व ट्रान्झिस्टर लटकावून येणाऱ्या प्रवाशांची वृक्षांकडे वक्रदृष्टी राहिलीच. पहाडांच्या शेवटच्या टोकापर्यंत शेती करणे, चाऱ्यासाठी, जळणासाठी व नव्या नव्या इमारतींसाठी झाडांवर कुऱ्हाड चालविणे, या प्रकारामुळे जंगलांचा काळ ओढवला.

वैज्ञानिकांचे म्हणणे आहे की, हिमालय हा तुलनेने तरुण पर्वत असल्यामुळे तो ठिसूळ आहे आणि पर्वतांमुळे वनराजीला आधार मिळतो हे जितके खरे आहे त्याइतकेच हेही खरे आहे की, वनराजीमुळे पर्वताला बळ-

कटी येते. वनविनाशामुळे आधीचाच ठिसूळ हिमालय ढासळू लागला तर ते स्वाभाविकच आहे. प्रचंड प्रमाणावरील भूस्खलन, भूक्षरण, वाढते रुक्ष, वालुकामय प्रदेशनिर्मिती, जलस्रोताचे सुकणे, माती वाहून गेल्यामुळे शेतीचे उत्पादन घटणे इत्यादी उत्पात अलीकडील वर्षांतील हिमालयनिवासींच्या जीवनाचे अभिन्न अंग बनून गेले आहेत. १९७० साली बदरीनाथजवळ गोहनाताल फुटल्यामुळे जो प्रचंड हाहाकार चमोली जिल्ह्यात झाला त्यामुळे हिमालय ढासळू लागल्याची वार्ता लक्ष्यवेधी स्वरूपात सर्वत्र प्रसृत झाली. आज चमोली जिल्ह्यात १३८ गावे भूस्खलनाची शिकार आहेत. गेल्या वर्षी भारत–नेपाळ–तिबेट सरहद्दीजवळ पिथौगगढ जिल्ह्यात तवाघाटजवळ शेकडो टन वजनाच्या शिला खचल्यामुळे खेला व जवळची काही खेडी उद्ध्वस्त झाली. मिलिटरीच्या गस्तींसह एकूण ४४ लोक प्राणाला मुकले. जोराच्या पावसामुळे व नाल्यातून अचानक पाणी आल्याने उत्तरखंडांतील प्रत्येक जिल्ह्यात असंख्य खेडी दबली गेली किंवा वाहून गेली.

एका बाजूने जलस्रोत सुकल्यामुळे पहाडी स्त्रियांना रात्रंरात्र जागून दूरवरून पाणी आणावे लागते, तर दुसऱ्या बाजूने हिमालयात उगम पावणाऱ्या व पंजाब ते आसामपर्यंतचा उत्तरपूर्वभारत सुपीक बनविणाऱ्या नद्यांच्या पुरामुळे दरवर्षी प्रचंड जीवितवित्ताची हानी होत आहे. या परस्पर विरोधी संकटांचे कारणही नद्या व जलस्रोतांच्या उगमस्थानाजवळच्या जंगलांचा विनाशच आहे! Losing Ground चे लेखक एरिक एकहोम व Doomsday Bookचे लेखक टेलर यांनी भारतासारख्या देशाला धोक्याचा इशारा दिला आहे व विनवून बजाविले आहे की, Spare that tree!

परंतु पुरांची जन्मभूमी व भूस्खलनाची लीलाभूमी असलेल्या हिमालयातील लोक व लोकसेवकही झोपलेले नाहीत. सहा वर्षांपूर्वी उत्तरखण्डात जनजागृती व कृतीसाठी आणि व्यापारी वननीतीचा, ठेकेदारीपद्धतीचा विरोध करण्यासाठी 'चिपको' आंदोलन सुरू झाले आहे. जवळच्या जंगलात लिलाव होणार हे कळल्यावर खेड्यापाड्यांतील स्त्री–पुरुष, पोलीस व अधिकारी व्यापारी मंडळींना सामोरे जाऊन बजावीत –

'आप इन वृक्षोंपर कुल्हाडी चलायेंगे तो हम इनपर चिपक जायेंगे। पहले आप हमें काटेंगे फिर इनको!' चिपको आंदोलनाचे गढवालीगीत सांगते – नि काटो, नि काटो हमारा जंगल।

ये छन हमारा परान हो! आमचे जंगल नका कापू, हे तर आमचा प्राण आहे! चमोली जिल्ह्यात रेणी गावाजवळ- पुरुषवर्गाला चकवून दूर पाठविले गेले तर केवळ स्त्रियांनीच 'चिपशे' यशस्वी केले. उत्तर काशी, टिहरी, नैनीताल अशा कित्येक जिल्ह्यात लिलावांच्या कार्यक्रमांना 'चिपको' सत्याग्रहींनी माघार घ्यायला लावली. आंदोलनकारींचे म्हणणे असे की, व्यापारासाठी लीसादोहन करण्यासाठी जंगलांचे ठेके देऊ नका! आवश्यक असे वृक्ष कापण्याचे काम वन-मजुरीच्या सहकारी सोसायटयांना द्या, मजुरी वाढवून द्या. वन-निवासींना खेड्यांजवळ जंगलात कामे द्या आणि नवी वन-नीती अमलात येईपर्यंत सारेच लिलाव व लीसा-दोहन बंद ठेवा. आंदोलनाचा अभूतपूर्व परिणाम झाला. लोकजागृती, वैज्ञानिक भूमिका व लोककल्याणाची वस्तुनिष्ठ दृष्टी, ही या मुख्यतः सर्वोदय कार्यकर्त्यांनी चालविलेल्या आंदोलनाची वैशिष्टये होती. वैज्ञानिक रीजर या आंदोलनाने इतके प्रभावित झाले की, नेपाळच्या वन-विनाशविरोधी जन-जागृती करणारे असे आंदोलन नेपाळात चालायला हवे, असे त्यांनी म्हटले आहे.

उत्तरप्रदेशात हेमवतीनंदन बहुगुणांचे मंत्रिमंडळ असताना या आंदोलनाच्या मागण्यांप्रमाणे नवी वन-नीती बनू लागली. मजुरांचे शोषण व जंगलांचा विनाश घडविणारी ठेकेदारीपद्धती बंद होण्याच्या मार्गाला लागली. स्लीपर बनविण्याचे व वाहून नेण्याचे दर वाढवून मिळाले. शाळाकॉलेजेसमधून वन-विज्ञान येऊ घातले नि पुनर्वनीकरणाला प्रोत्साहन मिळू लागले. इतक्यात राजकीय वातावरण पालटू लागले. आणीबाणीत सारीच जन-आंदोलने व अन्यायविरोध चूप केले गेले; परंतु नवीन लोकशाहीनिष्ठ राजवटीत वनांचे व वनवासीयांचे गाऱ्हाणे ऐकून घेतले जाईल व पुरोगामी धोरणे स्वीकारले जाईल, या आशेला मात्र आश्चर्यकारक व दुःखद टोला बसला आहे. केंद्राची, प्रमुख राजकीय व समाजसेवी व्यक्तींची कितीही सहानुभूती या प्रश्नाच्या बाबतीत बनवासीयांच्या बाजूने व नव्या जीवननिष्ठ वननीतीला असली तरी प्रत्यक्षात मात्र जंगलांचे ठेके देणे चालू आहे. रोजगाराच्या व क्षेत्रीय संकुचित हिताच्या नावाने लीसादोहन पूर्ववत अनेक भागांत चालू आहेच आणि मुख्य म्हणजे लिलावांच्या वेळी सत्याग्रह करणाऱ्या स्त्री-पुरुष-विद्यार्थी व कार्यकर्त्यांना अटक करण्याचे सत्रही चाललेच आहे. टिहरीजवळ हेंवलघाटीच्या जंगलात स्त्री-पुरुष व लहान मुलेसुद्धा झाडांना वाचविण्यासाठी पहारे देत असतात. १९७७ च्या आक्टोबरात नरेंद्रनगरच्या लिलावाच्या वेळी झालेल्या सत्याग्रहात २३ सत्याग्रही स्त्रिया व तरुण कार्यकर्ते तुरुंगात पाठविले गेले. कोटद्वारे, नैनीताल येथे विद्यार्थीवर्गाचा विरोध न जुमानता लिलाव पार पडले. वस्तुतः आंदोलनकारींचे दहा वर्षे जंगलकापणी बंद व्हावी, हे म्हणजे अगदी वैज्ञानिक आहे.

यामुळे अलमोडा, पिथारागाठ टिहरी, चमोली या जिल्ह्यांत 'चिपको' अधिकच प्रखर झाले आहे. हेंवलघाटीच्या स्त्रियांनी नवीन घोषवाक्यांतून विज्ञानाधारित सत्य गाण्याला सुरुवात केली आहे. ठेकेदार व अधिकारी यांचे म्हणणे आहे की, जंगलांपासून 'लीसा-लकडी और व्यापार' हे फायदे आहेत. या स्त्रिया सांगतात 'मिट्टी, पानी और बयार, ये है जंगलके उपकार, जिन्दा रहनेके आधार! माती, पाणी आणि गवत हेच पहाडी जीवनात आधार आहेत! यांची लूट थांबली तरच हिमालयाचा प्रदेश व पायथ्याचा भूभाग सुरक्षित राहील! यामुळेच या आंदोलनाच्या समयोचित उठावाला जयप्रकाश, सरलाबहनजी, दादा धर्माधिकारी, स्वामी चिदानन्द आदि व्यक्तींनी गौरविले आहे. या मंडळींनी 'अपील' काढून वन-क्षेत्र व परिस्थिति संतुलन यांचे रक्षण करण्याचे आवाहन केले आहे.

□

पुस्तके

# जन्मदा

## 'भारतीय माते'चे यथार्थ दर्शन

मातुःश्री माईसाहेब पारखे मेमोरियल ट्रस्टच्या वतीने जन्मदा खंड एक व दोन प्रकाशित करण्यात आले. पहिल्या खंडात उद्योगपती श्री. बाबुराव पारखे यांनी आपल्या मातुःश्री माईसाहेब पारखे यांचं चरित्र लिहिलं असून दुसऱ्या खंडात 'माते'-विषयीच्या विविध लेखांचा समावेश आहे. त्याचं संपादन कै. ग. दि. माडगूळकर व श्री. राजा मंगळवेढेकर यांनी केलं आहे.

श्री. बाबुराव पारखे यांनी आपल्या स्वर्गस्थ माता माईसाहेब पारखे यांच्या स्मृतीसाठी एक न्यास निर्माण केला. या न्यासातर्फे मातेविषयी सर्व काही जिच्यात असेल अशी एक ग्रंथमाला सुरू करण्यात आली. भारतीय संस्कृतीत मातेला असलेले स्थान पुनःपुन्हा समाजाला सांगत राहणे हा हेतु या मालेमागे आहे.

आपल्या जन्मदात्रीचं पुण्यस्मरण चिरस्मरणीय व्हावं या दृष्टीनं बाबुरावजींचा हा ग्रंथ महत्त्वाचा मानला पाहिजे. ग्रंथाची सुरुवात गदिमांच्या मातृवंदनेने होते. मनुष्याच्या जीवनाच्या जडणघडणीतील आईचं-महत्त्व हे असामान्यच आहे, निदान भारतीय संस्कृतीपुरते तरी ते आहेच आहे. लौकिक अर्थानं लोकमान्यता प्राप्त झालेल्या व्यक्तींच्या आयुष्यातील घडामोडींवर, एकंदर जीवनावर त्यांच्या मातांच्या संस्कारांचाच प्रभाव असतो, असं दिसून येतं. ग. दि. मा. लिहितात...

> तुझे थोर संस्कार आचार झाले
> तुझे यत्नप्रामाण्य सिद्धीस गेले
> तुझ्या चिंतने, लोप पावे निरास
> तुझ्या वंदितो माउली पाउलांस ।

या पार्श्वभूमीवर माईसाहेब पारख्यांचं जीवन चिंतनीय आहे. जीवनामध्ये येणाऱ्या अनेक प्रसंगांना माईसाहेबांनी कसं धीरानं तोंड दिलं, याचं सम्यक् दर्शन म्हणजे 'जन्मदा!'

श्री. बाबुरावजी आपल्या आईला 'माईसाहेब' या नावानं संबोधीत. संपूर्ण लेखनातही या नावाचा उल्लेख आहे. मला वाटतं की, याचा परिणाम लेखनातील अलिप्तपणाकडे झुकला असावा.

पुस्तकाची सुरुवात एखाद्या 'ललितका'-सारखी आहे. पुढं पुढं निरनिराळ्या प्रकरणांमधून माईसाहेबांच्या विविध पैलूंचं दर्शन बाबुरावजींनी घडविलं आहे. ते लिहितात, 'माईसाहेब माझ्या जन्मदात्या आहेत, त्यांनीच मला घडविलं आहे. अशा विशाल व्यक्तिमत्त्वाकडे पाहताना माझ्याठायी जर आदरभाव हवा असेल तर त्यांच्या जीवनातून प्रकाशमान होणारे पैलूच मी शोधावयाला हवेत.'

श्री. बाबुराव पारखे हे रसिक असले तरी ललितलेखक नव्हेत. तरीही माईसाहेबांची जीवनगाथा लिहिताना त्यांनी आपल्या भाषेला कुठल्याही एका बंधनात अडकवून न घेता जे घडलं ते सरळ सरळ सांगितलं आहे. माईसाहेबांचं जीवनच इतक्या विविध अनुभवांनी संपृक्त आहे की, बाबुरावजींच्या साध्या-सोप्या शैलीतूनही ते तितक्याच उत्कटपणे, सहजपणे प्रकट झालं आहे.

'मोठ्या' व्यक्तींच्या बाबत एक गोष्ट नेहमी घडते. अशा व्यक्तीची माता ही लौकिकार्थाने 'तेवढी' मोठी नसतेही; परंतु माईसाहेब पारखे यांना स्वतःचं असं खास व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळं अशा या व्यक्तीची जीवनगाथा विचारप्रवर्तक म्हणावी लागेल. एखादी व्यक्ती खूप मोठी झाली की, तिच्या पूर्वायुष्यातील अनेक छोट्या–मोठ्या प्रसंगांना एक वेगळाच अर्थ प्राप्त होतो. अर्थात तसा अर्थ प्राप्त होण्यासाठी कर्तृत्वाची अपेक्षा असते, तीही या ठिकाणी पुरी झाल्याशिवाय राहात नाही.

माईसाहेब स्वतः कवयित्री होत्या. पतीच्या निधनानंतर स्वतःच्या हिंमतीवर त्यांनी व्यवसाय सुरू केला. व्यवहारी जीवनातही त्या पुढंच होत्या. अशा अनेकविध पैलूंचे दर्शन या ग्रंथातून होते.

अशा व्यक्तींच्या जीवनगाथा घराघरात पोहोचल्या पाहिजेत. यासाठी ट्रस्टच्या वतीनं काही करता येण्यासारखं आहे, असं वाटतं. निदान पुस्तकाचं मूल्य तरी कमी करणं शक्य व्हावं.

जन्मदेच्या दुसऱ्या खंडात वैचारिक लेख व निरनिराळ्या व्यक्तींनी आपापल्या मातांची केलेली व्यक्तिचित्रणं आहेत.

भारतीय संस्कृतीमध्ये 'स्त्री'चं महत्त्व वादातीत आहे. आपल्या सांस्कृतिक जडणघडणीत, संस्कारांमध्ये, आचारविचारांमध्ये 'स्त्री' हा महत्त्वाचा घटक आहे. पूर्वीच्या काळी चूल आणि मूल एवढेच तिचे कार्य असले तरी आपल्या पुत्रांकडून एक आदर्श समाज घडविण्याचा प्रयत्न ती करीत होती म्हणूनच भारतीय संस्कृतीनं या जन्मदात्रीला देवत्व बहाल करून टाकलं आहे. आपल्या जीवनातील अनेक बऱ्यावाईट प्रसंगांमध्ये आपल्याला मातेची कूस हेच समाधानाचं स्थान असतं. म्हणूनच स्त्रीच्या अनेकविध भूमिकांमध्ये तिचं मातृत्व हेच उदात्ततेचा उच्च आदर्श बनतं.

'आई' हा मराठी साहित्याचा वीक पॉइंट. आजवर 'आई'वर अनेक कथा, कविता, कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत; पण अशा व्यक्तींच्या खऱ्याखुऱ्या आईचं दर्शन हाही साहित्यानंदाचाच एक भाग असतो. जन्मदेचा दुसरा खंड हा त्या दृष्टीने लक्षणीय म्हणावा लागेल.

श्री. शंतनुराव किर्लोस्कर, एस्. एम्. जोशी, बाबा आमटे, बा. भ. बोरकर, शंकरराव खरात, शांता शेळके, राम शेवाळकर, गदिमा, विजय मर्चंट, डॉ. वसंतराव पटवर्धन आदि विविध क्षेत्रांतील नामवंत, कीर्तिवंतांनी आपल्या आईची व्यक्तिचित्रं रेखाटली आहेत.

पहिल्या भागात डॉ. गो. के. भट, डॉ. दे. रा. बेंद्रे, डॉ. इ. डी. कुलकर्णी, डॉ. एस्. के. लाल, डॉ. प्र. न. जोशी आदि विद्वानांनी वैचारिक लेख लिहिले आहेत.

'ऋग्वेदातील माता'– डॉ. गो. के. भट, पुराणप्रतिपादित मातृ-भावना–एस् के. लाल, मातृदेवो भव–ज. सी. पेंडसे आणि ज्ञानेश्वरांची माउली–प्र. न. जोशी हे वैचारिक भागातील विशेष उल्लेखनीय लेख म्हणावे लागतील.

या खंडातला ललितभाग हा मराठी

साहित्यातील 'एक अमोल ठेवा' या सदराखाली गणला जायला हवा.

यातल्या व्यक्तिचित्रांतून मातेची विविध दर्शनं होतात आणि त्यामुळं मन खरोखरच स्तिमित होतं.

समाजसेवक बाबा आमटेंनी सुरुवातच केलीय– 'मी एका वेड्या आईचा मुलगा !' आमटेंचे सारं लिखाणच मुळी एक काव्यात्मकता घेऊन येतं. त्यामुळं त्याचा मनावरील ठसा कायमचा असतो. त्यांची आई वेडी. त्यांचे वडील गेल्यानंतर कित्येक दिवस ती अबोलच होती. आमटे लिहितात, 'बापूजींबरोबर तिचं वेडही गेलं. डोहासारखं तिचं वागणं आता परत वाहतं झालं. जणू एका जबरदस्त भोवऱ्यानं तिला खोलखोल मनाच्या अखेरच्या तळापर्यंत नेलं आणि परत आणलं. हा तळ एकदा गाठून येणंही भाग्याचंच. कारण त्यानंतर माणूस केवळ प्रेमच करू शकतो.'

शंतनुराव किर्लोस्करांसारख्या उद्योगपतीनेही आपल्या मातेचे चित्र अगदी खास शैलीत रेखाटले आहे.

शंकरराव खरातांच्या मातेच्या दर्शनाबरोबरच दलितांची दुःखेही बोलकी होतात.

संतुमाधवराव पगडी, वामन चोरघडे, विजय मर्चंट, शांता शेळके, राजाभाऊ सदावर्ते, वसंत पटवर्धन, एस्. एम्. जोशी, राम शेवाळकर, चंद्रशेखर धर्माधिकारी या सर्वांच्याच लिखाणातून स्त्रीच्या 'माता' या जगण्याचा अर्थ उलगडू लागतो. ही व्यक्तिचित्रं म्हणजे आपल्या संस्कृतीची निदर्शकचिन्हेच. कारण अशा लिखाणात बेगडीपणाचा लवलेशही दिसत नाही. हे लिखाण म्हणजे अंतर्मनाचा एक हुंकार! त्याला योग्य ते स्थान या ग्रंथामुळे मिळालं. मातेची महती ही ओरडून सांगण्याची गोष्ट नव्हे. आपल्या अनुभवाचा तो एक भाग असतो आणि असा अनुभव शब्दबद्ध झाल्याने त्याला एक वेगळंच डायमेन्शन प्राप्त होतं.

हे दोन्ही खंड म्हणजे आपल्या संस्कृतीचा सांस्कृतिक इतिहास आहेत. माईसाहेब पारख्यांचं जीवनचरित्र म्हणजे ज्या समाजधारणेत त्या वाढल्या त्याचं चित्रण. साहित्यिक मूल्यं जोखून सुद्धा यांचं महत्त्व अबाधित रहातं.

ग्रंथांच्या मुखपृष्ठांपासून (रवींद्र मेस्त्री, डॉ. कानिटकर) ते छपाई, संपादनापर्यंत प्रत्येक बाबतीत चढती पायरी आहे. कै. ग. दि. माडगूळकर आणि राजा मंगळवेढेकर यांनी संपादिलेला जन्मदेचा दुसरा खंड हा मराठी साहित्यातील विशेष ग्रंथ म्हणून नोंदवावा लागेल.

(१) जन्मदा खंड १ ला– लेखक– श्री. बाबुराव पारखे, पृष्ठे– २६९, मूल्य– २५ रुपये. प्रकाशक– मातुःश्री माईसाहेब पारखे मेमोरियल ट्रस्ट, पुणे ५.

(२) जन्मदा खंड २ रा. संपादक– ग. दि. माडगूळकर, राजा मंगळवेढेकर, पृष्ठे– २३२, मूल्य– २५ रुपये. प्रकाशक– मातुःश्री माईसाहेब पारखे मेमोरियल ट्रस्ट. पुणे ५.

–मुकुंद संगोराम

---

# आमचे ग्रंथालय

# मार्गारेट मीड

---

'बुक डायजेस्ट'चे संपादक मार्टीन ग्रॉस यांनी एकदा मार्गारेट मीड यांची मुलाखत घेतली होती. मार्गारेट मीड ही विश्वविख्यात Anthropologist आहे हे सर्वांना माहीत आहेच. ही मुलाखत बुक डायजेस्टच्या मार्च १९७८ च्या अंकात आली आहे.

मार्गरेट मीड या नोव्हेंबर १९७३ मध्ये भारतात आल्या होत्या. त्या वेळेला त्यांना (LL·D) डॉक्टर ऑफ लॉजची ऑनररी पदवी मुंबई विद्यापीठातर्फे मिळाली होती. पॅसिफिक महासागरातील बेटात त्यांनी मागासलेल्या जातींचे संशोधन केले होते. त्या वेळेला त्या फक्त तेवीस वर्षांच्या होत्या.

मार्गारेट मीड या दिसायला एखाद्या पारशी बाईसारख्या आहेत. ठेंगण्या-ठुसक्या, लठ्ठ. बाटलेल्या ख्रिश्चन बाईसारख्यासुद्धा त्या कधी कधी वाटतात. या 'अग्ली डकलिंग'ने जगातील प्रथम क्रमांकाचे मनुष्यशास्त्रवेत्ता व्हावे म्हणजे न्यूनगंडाला भरपूर नुकसानभरपाई मिळावी याचे एक उत्तम उदाहरण होय.

दुसरा एक विरोधाभास म्हणजे या बाईंचे खाजगी जीवन म्हणजे अवकळा आलेले घर! त्यांचे तीनदा लग्न झाले होते. वडील अगदीच संवेदनाशून्य व नतद्रष्ट. गबाळा झगा घालून एका पार्टीला मीडबाई गेल्या असता सर्व लोकांनी त्यांना वाळीत टाकले. असले वाळीत टाकणे लहानपणी कैक वेळा झाले. म्हणूनच 'Mulberry Winter' या त्यांच्या आत्मचरित्रात त्या म्हणतात की, वाळीत टाकलेला व वाळीत टाकणारा या दोघांच्या चारित्र्याला ओरखडे पडतात. तरी मानवजातीविषयी या बाईंना दांडगा आत्मविश्वास!

त्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी Anthropology च्या कक्षा रुंदावल्या. त्यांनी संस्कृतीचा संबंध व्यक्तिमत्त्वाशी लावला. उदाहरणार्थ त्यांचे म्हणणे असे आहे की, जगात एस्किमो हा बहुतेक सर्वांत प्रतिकूल परिस्थितीत जगत असतो; परंतु जगात सर्वात कमी चिंता असेल तर ती एस्किमोला! अती थंडीमुळे हे असे होत असेल का, हा एक संशोधनाचा विषय ठरू शकेल. कारण थंडीमुळे शरीराच्या बायोकेमिस्ट्रीत बदल घडून येतो. बायोकेमिस्ट्रीमुळे स्वभावाच्या जडणघडणीत बऱ्याच प्रमाणात बदल घडू शकतो; परंतु इतर मागासलेले लोक चिंता करीत नाहीत, हे म्हणणे चुकीचे होईल. या मागासलेल्या लोकांना भानामतीची व भुताटकीची फार भीती व चिंता वाटते.

माणूस हा किती Plastic (लवचिक) असतो या बाबतीत बोलताना त्या म्हणतात की, काही काही जमाती २०,००० वर्षांपूर्वी रहात होत्या तशाच अजून रहातात आणि मग एकदम त्यांचा संपर्क विसाव्या शतकाशी येतो. तरी त्या जमाती जुळवाजुळवी करून घेतात. या संदर्भात अलीकडे टासाडे नावाच्या जमातीची आठवण येते. या जमातीला आत्ता–आत्तापर्यंत संस्कृतीचा स्पर्शही झाला नव्हता. मार्गारेट मीडनी नरभक्षक पाहिले आहेत व त्याच नरभक्षकांची मुले, जी डॉक्टर होण्याची स्वप्ने पहात आहेत ती सुद्धा पाहिली आहेत!

इंडोनेशियातील बाली बेट येथील संस्कृतीबद्दल बोलताना मार्गारेट मीड म्हणतात की, त्या बेटावलीत लोकांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या आहेत. (बाली बेटावर हिंदू धर्माचा पुष्कळ परिणाम झाला होता). बालींची संस्कृती

गुंतागुंतीची व कलेने समृद्ध आहे. ही संस्कृति इतकी वाढली असून अपेक्षा पूर्ण होणे हे एक कठीण काम आहे. बाली बेटावर लहान मुलांना मुद्दाम इतके सतावण्यात येते की, दुसऱ्या देशातील मुलांचे डोके फिरून जाईल. एखाद्या लहान मुलाची आई दुसऱ्या एखाद्या लहान मुलाला घरी आणून तिच्याच पोरात मत्सराची भावना निर्माण करील. मोठी माणसे पोरासमोर असा काही आविर्भाव करतील की आत्ताच त्यांना Climax येते आहे; पण त्याच क्षणी ते दुसरीकडे शून्य दृष्टीने बघत रहातील.

वेगवेगळ्या संस्कृतींच्या गाढ अभ्यासात मार्गारेट मीडना कोणत्या समान गोष्टी आढळल्या? कोणाचाही खून करू नये (पण सामूहिकरीत्या जीव घेण्यास हरकत नाही). गोत्रगमन किंवा अगम्यागमन (Incest) करू नये. या काही त्याज्य गोष्टींपैकी थोड्या. हे असे का, असे त्यांना विचारण्यात आले असता त्यांनी उत्तर दिले, 'अन्यथा कौटुंबिक जीवन धोक्यात आले असते. कौटुंबिक जीवनासाठी मुलांना मोठ्यांपासून लैंगिक संरक्षण आवश्यक आहे. आणखीन एक समान गोष्ट म्हणजे माणसाचा एकांत, विविक्तता (Privacy). काही जमातीत तर तुमचे नावसुद्धा घेता येत नाही. तुमचे नाव उच्चारले की, तो एक विविक्ततेवर हल्ला (Invasion of Privacy) समजला जातो!

सर्व संस्कृतीतले आणखी एक समान लक्षण (trait) म्हणजे प्रदेशाची वखवख (territorial Craving). ज्या वाचकांनी रॉबर्ट आड्रेचे Territorial Imperative हे पुस्तक वाचले आहे त्यांना हे सहज पटेल. तुमच्या टेरीटरीमध्ये, तुमच्या प्रदेशामधे, तुमच्या घरी, तुमच्या ऑफिसात तुम्ही जेवढे धीट होता, resourceful (युक्तिबाज) होता, तेवढे बहुतेक इतर ठिकाणी होत नाही. सर्वांना आपला स्वतःचा असा प्रदेश (टेरीटरी) पाहिजे असतो. हे एक वडिलोपार्जित विशेष लक्षणच (atavistic trait) समजले जाते. ज्यांची मोठी मोठी घरे, प्लॉटस् व शेती आहे त्यांना किती समाधान मिळत असेल त्याची कल्पना यावरून येईल.

या प्रादेशिक वखवखीच्या संदर्भात मार्गारेट मिडनी मार्च १९७८ च्या बुक डायजेस्टमध्ये एका जमातीविषयी एक मजेदार माहिती सांगितली आहे. एका भटक्या जमातीत रात्र पडली की, आई आपल्या मुलाला शेजारी झोपवते. राहुटी वगैरे काही नसते. भिंती नसतात. दार मात्र असते; पण हे दार म्हणजे दोन उभ्या व एक आडवी फांदी! लोक येणार–जाणार तेही आडवी फांदी वर करून! म्हणजे भटक्या जमातीतले ते कुटुंब ज्या प्रदेशावर झोपले असेल त्या प्रदेशाच्या विविक्ततेवर हल्ला नको!

मार्गारेट मीड या अमेरिकन म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी येथील enthnology (मानवजातिशास्त्र, नृवंशविद्या) या विषयाच्या क्युरेटर आहेत. त्यांच्या हाताखाली पंधरा मदतनीस कामाला आहेत. पंधराच्या पंधराही जणांना त्या सतत कार्यमग्न ठेवतात. दुसऱ्या विश्वयुद्धाच्या दरम्यान त्यांनी कोणते पुस्तक लिहिले हे माहीत आहे का? ब्रिटिश मुलीशी यशस्वीरीत्या प्रेम करण्यासाठी अमेरिकन सैनिकांनी कसे वागावे,' या विषयावर ते पुस्तक होते. या पुस्तकात त्यांचे असे म्हणणे होते की, ब्रिटिश व अमेरिकन संस्कृतीमधील फरकामुळे अमेरिकन सैनिकांच्या खेळकर आगाऊपणाबद्दल ब्रिटिश मुलींच्यात गैरसमज होण्याची शक्यता आहे!

'कमिंग ऑफ अॅज इन सामोआ' हे तर जवळजवळ काव्यात्मच लिहिले आहे. सामोआचे व्यक्तिमत्त्व, विधिपद्धती त्याज्य गोष्टी व बंधुप्रेम यांच्या गोफाने तयार झाले आहे. सामोआमध्ये मुलांनी मोठे होणे अगदी साधे व सोपे आहे. सामोआमधे जुगार कोणीच खेळत नाही. स्वतःच्या convictions साठी कुणी मरत नाही आणि मृत्यू येईपर्यंत कुणी युद्ध करीत नाही. अर्थात् या दृष्टिकोनात तसे काही नवीन नाही; पण इतर संस्कृतीत मुली वयात येतात त्या वेळचा trauma तेथे नसतो. 'कमिंग ऑफ अॅज इन सामोआ' हे नाव यावरूनच दिले आहे.

या ठेंगण्या–ठुसक्या (अमेरिकेच्या मानाने) बाई एकदा काय म्हणाल्या होत्या? (त्या आता म्हाताऱ्या झाल्या आहेत): "I fully intend to die, but I have no plause to retire"

— जे. एन्. पोंडा

दि फिनिक्स लायब्ररी


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | |
|---|---|
| १. उंटावरचा प्रवास – (आत्मचरित्र) – दि. प. दांडेकर | रु. २०–०० |
| २. गाये चला जा – (संगीततपस्वींचे चित्रण) – शिरीष कणेकर | ,, १५–०० |
| ३. मातृका – (कादंबरी) – पु. शि. रेगे | ,, १३–५० |
| ४. जननी युगायुगांची – (कादंबरी) – प्रा. विमल लेले | ,, १८–०० |
| ५. स्रोत – (लेखसंग्रह) – रावसाहेब कसबे | ,, ५–०० |
| ६. सेतु – (कादंबरी) – द्विवेदुल विशालाक्षी | ,, ६–७५ |
| ७. चरस – जयंत रानडे | ,, १४–०० |

**ENGLISH**

| | |
|---|---|
| 1. Second Deadly Sin—(Best seller-Thriller) – Lawrence Sanders | Rs. 20·25 |
| The Blue Hammer—(Best seller–A Lew Archer Mystery)–Ross Macdonald | ,, 09·00 |

□ 'फिनिक्स' – सामान्यांचा उपहास! बुद्धिमंतांचा मुखवास!!

**दि फिनिक्स लायब्ररी,**

**७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०**

# सप्रेम नमस्कार...

मुखपृष्ठ २ वरून

the taste, rathe rthan to cultivate it हा धंदेवाइकांचा संप्रदाय बोकाळला आहे. वास्तविक पाहता राजकपूरसारख्या Established लोकांना calculated risk घेऊन प्रयोग करायला हरकत नाही. शिवाय आपल्याकडील फिल्म इंडस्ट्री History, Science, Fiction, Mythology किंवा Crime वगैरेवर सरस Pictures देत नाही किंवा देऊ शकत नाही. याची कारणे काय ? किंवा राजकपूरने असे प्रयत्न केले का ? केले असल्यास कुठे व कसे ? याची माहिती मिळणे आवश्यक होते.

'जोकर' का पडला ? त्याबद्दल राजची कारणमीमांसा विस्तृतपणे यायला हवी होती. This personality should have been thoroughly probed & explored. दुर्दैवाने तसा प्रयत्न दिसला नाही.

फिल्म इन्स्टिटयूट बहादुरांची मुलाखत म्हणजे गूढ-गुंजनच आहे. राजकपूरला ते अभिनेता म्हणून चक्क नाकारतात. Majority can not be criteria of quality neither it can establish truth, but at the same time it is a reality आणि म्हणूनच राजकपूर हा अभिनेता आहे. 'जोकर'मधील 'जाने कहा गये वो दिन'चा Shot आणि चष्मा काढून त्यानं दिलेलं rueful smile हे उत्कृष्ट अभिनेताच करू जाणे. चार भिंतींबाहेरही न जाणाऱ्या निकषांवर आपले निष्कर्ष घासून पाहण्याची एवढी घाई कशाला ? जगातल्या बऱ्याचशा विद्वानांनी तात्त्विक की तांत्रिक मुद्द्यांचा कीस पाडून कलाकृती व कलावंत यांच्याकडे दुर्लक्ष केले आहे व महत्त्वाचे, ते स्वतः त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला पारखे झाले आहेत.

राजकपूर व शांतारामची तुलना करण्याचा मोह का व कुणाला झाला ते समजलेच नाही. मग देवआनंदशी तुलना का नको ? तो अधिक जवळचा.

शेवटी, काही गोष्टींवर प्रेम करतो त्यातली 'माणूस' ही एक. कृपया 'माणूस'ची लय बिघडवू नका हेच सांगणे.

५ जुलै किशोर दीक्षित, ठाणे

◻ राजकपूरची बरीचशी मौलिक माहिती असलेला 'बरसात' विशेषांक काढण्याबद्दल विशेष अभिनंदन !

याच अंकात असलेला शरद गोखले ह्यांचा लेख वाचला आणि माझ्यासारख्या आर. के. चित्रपटरसिकाला खरोखरच सखेदाश्चर्य वाटले. या लेखात श्री. शरद गोखले ह्यांनी अशी विधाने केली आहेत की, राजकपूर उत्तम संगीत-रसिक आहे. तसेच त्याला सर्व वाद्ये वाजविता येतात. या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे, परंतु शंकर जयकिशन या प्रख्यात संगीतकारद्वयाने त्याच्या चित्रपट-संदर्भात जी कामगिरी बजावली आहे ती खरोखरच उत्कृष्ट प्रतीची आहे. राजकपूरचा तुम्ही कोणताही जुना चित्रपट घ्या. प्रत्येक चित्रपट 'म्युझिकल हिट' ठरला आहे. तो केवळ राजकपूरमुळे खचित नव्हे. त्याच्या मदतीला स्व. मुकेश, लता मंगेशकर, शंकर-जयकिशन अशी जी मंडळी आली आहेत त्यांचे महत्व आहे. ह्या महत्त्वाच्या अंगाकडे डोळेझाक करून अजिबात चालणार नाही. कोणत्याही चित्रपटाचा संगीत हा 'आत्मा' असतो. 'बरसात' पासून 'शंकर-जयकिशन' या जोडीने राजपूरला सहकार्य दिले ते अगदी 'चोरी-चोरी' पर्यंत. त्यांची जवळजवळ सर्वच गाणी 'हिट' ठरली आहेत. 'आवारा हूँ' किंवा 'सब कुछ सिखा हमने...' किंवा 'राजाकी आयेगी बारात...' ही गीते ऐकताना मन नुसते मोहरून जाते ते राजकपूरमुळे मुळीच नव्हे. ह्यात शंकर-जयकिशन ह्यांचा सिंहाचा वाटा आहे. स्व. शैलेन्द्र, स्व. मुकेश, लताबाई जोडीला आहेतच. इतका प्रतिभावंत संगीतकार मिळाल्यावर मग कोणता चित्रपट 'हिट' ठरणार नाही ?

बरं शंकर-जयकिशनला कमी लेखावं तर मग त्यांचे इतर चित्रपट (आर. के. सोडून) का 'म्युझिकल हिट' ठरले ? तिथे काय राजकपूर होता ?

राजकपूर उत्तम संगीत जाणकार आहे म्हणावं तर 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' या संगीतकार द्वयाने 'आर. के.' चित्रपटांना दिलेले संगीत हिट का नाही ? त्यात 'आवारा' 'आह' अशा चित्रपटांची मजा का येत नाही ?

भले आज राजकपूर विसरला असेल 'शंकर-जयकिशनना', पण आपल्यासारख्या रसिकांनी मुळीच विसरायला नको आहे !

माझ्या मते राजकपूरच्या चित्रपटांतल्या यशामध्ये जवळजवळ पन्नास टक्के वाटा शंकर-जयकिशनचा आहे !

लेख वाचल्यावर कुठेही शंकर-जयकिशनचे नाव नाही हे पाहिल्यावर आम्हाला फारच खेद वाटला. म्हणून हा प्रपंच !

५ जुलै एस्. बी. कऱ्हाडे, ठाणे

# मोर्चा....

◻ 'राजकपूर'च्या 'सत्यं-शिवम्-सुंदरम्' या नव्या चित्रपटाने सध्या तरी धमाल उडविली आहे. गेल्या महिना-पंधरवडयात अनेक वृत्तपत्र-नियतकालिकांतून प्रचंड टीका सुरू आहे. कुणा टीकाकाराला या चित्रपटाची कथा वास्तवतेपासून दूर वाटली, तर कुणाला गेल्या पिढीतली. कुणाला काही, कुणाला काही. मलाही खरोखर काही तरी वाटत होते; पण वेगळ्या अर्थाने. पुण्यातील पुरोगामी महिलांनी मात्र 'स्त्री-नग्नतेचे प्रदर्शन नको' या कारणासाठी टीका करण्याऐवजी चक्क मोर्चा काढला आणि आपली तीव्र प्रतिक्रिया 'डेक्कन'च्या फाटकावर मांडली. (या थिएटरात तो चित्रपट चालू आहे.)

पुरोगामी स्त्री-संघटनेतर्फे वृत्तपत्रातून या चित्रपटातील 'कलेच्या व करमणुकीच्या नावाखाली स्त्रीचे बीभत्स प्रदर्शन झाले', म्हणून मोर्चा काढण्याचे ठरले, म्हणून वाचले आणि मोर्चातील संकेतस्थळ म्हणून टिळक-पुतळ्याजवळ बरोबर ३ वा. गेलो; परंतु मोर्चेवाल्यांचा पत्ताच नाही ! म्हटलं, मंडळी यायचीत अजून. थांबलो. ३॥ चे पुढे एकेक स्त्रियांचा ग्रुप दाखल झाला अन् जवळपास ४०-५० स्त्रिया-मुली 'स्त्री मुक्ती झिंदाबाद'चे नारे लावात उभ्या ठाकल्या.

पुण्याचे पब्लिकच ते ! अचानक या पांढरपेशा बाया असे का ओरडतात, म्हणून गपागपा गोळा झाल्या. तर मोर्चातून 'बघता काय आवाज उठवा'ची पांप्लेटस् वाटली गेली. एका स्वयंसेविकेने मेगॅफोनद्वारा मॉबपुढे भाषणच सुरू केले. 'हे चित्रपटवाले कलेच्या नावावर स्त्रीदेहाचे प्रदर्शन करतात व गल्ला गोळा करतात. बघा ना एखादी वडारी स्त्री असते. बिचारी पहाटे ४ वा. उठते. भाकऱ्या बडविते आणि दिवसभर कामावर जाते. किती गरीब ती ! पण चोळी घालीत नाही. हीच चित्रपटात दाखविलेली फॅशन. याबद्दल

आपण निषेध करणार की नाही? सत्यं-शिवम्-सुंदरम् ही बेशरमपणाची परमावधी आहे! लोक मला बघत होते अन् 'मला द्या-मला द्या' अशी मागणी करीत ती हस्तपत्रके घेत होते. गर्दीला शिस्त नसते म्हणून थोडी रेटारेटी.

मग काही तरुण आले आणि स्त्रियांच्या दोनाच्या रांगा लागल्या. त्यामागे ते तरुण. हस्तपत्रिकेवरून जवळपास २० विविध संस्थांतील स्त्री-पुरुष मोर्चात होते. जवळपास शे-दीडशे सारी मंडळीच मोर्चातली फलक उभारून उभी.

'स्त्री-देहाचे प्रदर्शन नको', 'स्त्री-भोग्यवस्तु' 'स्त्री-वेश्या', 'स्त्री-माता' 'स्त्री-मुक्तीकी ये ललकार, बंद करो ये खुला बलात्कार!' आदी फलकांवरील घोषणा आकर्षक होत्या.

शनीचे पाराकडून चाललेला मोर्चा 'हल्ला बोल'च्या घोषणात पुढे सरकत असतानाच एक हातगाडीवाला मोर्चाला पाहून म्हणाला, 'यांना हे पिक्चर 'यु' करून पाहिजे असल!' ध्यानीमनी नसता आलेली कॉमेंट वेगळच काही सांगून गेली.

आता मोर्चाला रंग आला होता. मोर्चातील तरुणी बेभानपणे 'बोल किसाना हल्ला बोल, स्त्री-दर्शनपे हल्ला बोल' या घोषणा देतानाच स्वतःचे 'बॉब' केलेले केस चक्क तरुणाप्रमाणे कुरवाळीत होत्या, तर जीन्स घातलेल्या तरुणी ठेक्यावर पाय टाकीत होत्या.

मॅक्रोफोनवरून घोषणा देण्यासाठी प्रत्येकजण उतावीळ; पण तो जिचे हातात ती तरुणी सोडीनाच. तेव्हा मध्येच एका तरुणाने पुढे येऊन घोषणांना प्रारंभ केल्याने साहजिकच तिचा आवाज बसला. मग मात्र तरुणांचे आवाज तापले. एक तर हे तरुण कामगार चळवळीतले. तशात निदर्शनेमोर्चाचा सराव त्यांना. मग खरा मोर्चा वाटू लागला. लक्ष्मीरोडला मोर्चा आला तेव्हा पोलिसांनी ट्रॅफिक एका बाजूला केला. तेव्हा फियाट कारमधील चालक पुरंध्रीने 'हूं' करून गाडीतील आपल्या सहेलीला म्हटले, 'मुफ्त देखनेका और एक तरीका.'

मोर्चा पुढेच चालला. गोखले हॉलमध्ये कपडे विक्रीचा सेल लागला. जवळपास ३००।४००लोक अगदी लायनीत उभे. त्यांची लाइन पार सोटच्या म्हसोबापर्यंत. म्हटलं, मोर्चा नेमका लायनीजवळ आल्यावर फोटो घेतला तर मोर्चा मोठा वाटेल. पण 'सेलवाल्याने ती सगळी लाइन लगेच आत घेतली. मोर्चा पुढे.

मोर्चाचे खरे दृश्य दिसले ते संभाजी पुलावर. पावसाचे चार थेंब चौकातील गवळणीवर पडत होते आणि मोर्चातील स्लिव्हलेस् तरुणी आणि बें. खा. सा. धारी स्त्रिया घोषणा देत होत्या. 'स्त्रीदेहाचे प्रदर्शन करणाऱ्याचा धिःक्कार असो!' झकास गवळण खुदखुद हसत होती. ती मोठ्याने हसताना उगाचच दिसली. पोलिसांनी व्यवस्थित मार्गदर्शन करून मोर्चा शेवटी 'डेक्कन'च्या फाटकापाशी आणला. तेथे ५-१० मिनिटे घोषणा झाल्या. गर्दीही बरीच झालेली. तरुणांचा भरणा जास्त. ६ च्या पिक्चरची तिकिटविक्री झाली होती. मोर्चा तेथून 'नटराज'कडे निघाला आणि त्याच वेळी थिएटरवर बोर्ड लागला. 'हाउस फुल्ल!'

आता मोर्चातील शेवटचे पर्व होते. भाषणे सुरू झाली. स्त्रीदेहाचे प्रदर्शन नको, यावर बऱ्याच वक्त्या बोलल्या. त्या वेळी गर्दीत काही चर्चा चालली होती. 'राजकपूरनी तर ह्या मोर्चाला सहाय्य केले नाही ना?' 'म्हणून तर रशियाधार्जिण्या स्त्रिया मोर्चात आल्या.' 'अरे, चित्रपटांत दाखविले ते काहीच नाही; पण मोर्चातल्या मुली बघा!'

– खरं तर मोर्चा सेन्सॉरबोर्डावर हवा.

– कां कलेक्टर मेला व्हय?

– सभेनंतर 'सत्यं'च्या लायनीत ना?

– हृश! तिकडे सभेत टाळचा.


शेवटी स्त्रीला गुलामीचे जीवन देणाऱ्या समाजव्यवस्थेचे प्रतीक म्हणून पेंढा भरलेली प्रतिमा जाळावयाची म्हणून एक तरुण पेट्रोलची बाटली आणतो. ती त्या प्रतिकात ओतली जाते. कुणी तरी काडी ओढते. प्रतीक धडधडा पेटते. पावसाला सुरुवात होते. काही तरुण चक्क शंखध्वनी करतात. तर ती नेती तरुणी एकाला म्हणते, 'कैसा लाजवाब बना प्रोग्रॅम!'

१० जुलै चंद्रकांत दीक्षित, पुणे

---


# सिंदिया

## श्रीक्षेत्र पंढरपूरच्या अश्वमुखी नौका



श्रीक्षेत्र पंढरपूर. महाराष्ट्रात चंद्रभागेच्या (भीमेच्या) तीरावर वसलेले लाखो भाविकांचे श्रद्धास्थान. भगवान विष्णूचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे सुंदर देवालय. दरवर्षी लाखो यात्रेकरूंना तिथे आकर्षित करते. चंद्रभागेच्या काठावर अकरा घाट आहेत. विस्तृत पसरलेली चंद्रभागा, तिच्यामध्ये तुरुतुरु चाललेल्या नौका, नदीतीरावरील झाडी, अधूनमधून डोकावणारे निरनिराळ्या मंदिरांचे कळस हे सारेच दृश्य मनोहर व वेधक आहे.

चंद्रभागेतल्या अश्वमुखी नौका हजारो भाविकांना काठावरील निरनिराळ्या मंदिरांची तीर्थयात्रा घडवितात.

भारतीय जहाजवाहतूक उद्योगाची ही अभिमानास्पद परंपरा सिंदियाची जहाजे पुढे चालवीत आहेत व जगाच्या कानाकोपऱ्यात निरनिराळ्या प्रकारच्या मालाची ने-आण करीत आहेत.

दि सिंदिया स्टीम
नॅव्हिगेशन कंपनी लिमिटेड
सिंदिया हाऊस, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८

सिंदिया वर्कशॉप लि.
(जहाज दुरुस्त करणारे, मरीन इंजिनियर्स, भारतात ...)

सिंदिया

AS-81

# अवती-भवती : पृष्ठ ४ वरून

जोडीदाराला घेऊन आपण आपल्या भावंडांना भेटायला जाऊ तेव्हा ती कशी आश्चर्यचकित होतील, याचे कल्पनाचित्र तिच्या नजरेसमोर तरंगू लागले.

दुसऱ्या दिवशी अब्दुल परत आला; पण आज तो एकटा नव्हता. त्याच्याबरोबर त्याचे आणखी दोन दोस्त होते. अब्दुलने त्यांपैकी एकाकडे बोट दाखवून सांगितले की, मी याच्याबरोबर तुझे लग्न लावून देणार आहे. मी जात्याच मवाळवृत्तीची असल्याने बावरून गेले. लग्नाच्या गोड स्वप्नात हसीनाला तरंगत ठेवून अब्दुल निष्ठुरपणे आपला व्यवहार करीत होता. गिऱ्हाईकाला मुलगी दाखवून झाली होती. त्याला ती पसंत पडली होती. आता अब्दुलच्या दृष्टीने पुढील व्यवहार लांबविणे धोक्याचे होते. त्याने हसीनाला सांगितले की, त्या मुलाला तू फार आवडली आहेस आणि लवकरच मी तुझे लग्न लावून देईन. एवढे आश्वासनही त्या मुलीला पुरेसे वाटले. सीमापुरीमधून हसीनाला हलविण्यात आले. एका अनोळखी घरात तिला नेऊन अब्दुल म्हणाला, 'हसीना, तुम यही ठैरो, मैं अभी जाके आता हूँ!' अब्दुलची आणि तिची ही शेवटची भेट! यानंतर त्याला हसीनाला भेटण्याची जरूरच नव्हती. त्याचे काम झाले होते. आता गावाकडे जाऊन दुसरी हसीना आणण्यास तो मोकळा होता.

## हादरवून टाकणारा अनुभव

अब्दुल गेला खरा; पण हसीनासाठी नको त्या जीवनाचे दार मोकळे करण्याची त्याने पुरेपूर व्यवस्था केली होती. आपण नेमके कोठे होतो हे हसीनाला आज आठवत नाही. तिला आज आठवते ते इतकेच की, अब्दुल एका स्कूटर-रिक्षामधून आपल्याला त्या विशिष्ट घरामध्ये घेऊन गेला. चार–पाच तास कोणी न आल्याने हसीना काहीशी अस्वस्थ होती. अंधारून आल्यावर एक मनुष्य आला. मी त्याला धड ओळखले देखील नाही. मी काही खाणार का असे त्याने विचारले मात्र, मी लगेच होकार भरला. कारण मला खरोखरच कडकडून भूक लागली होती. त्याने भात, करी आणि अन्य काही पदार्थ आणले. मी जेवण केले. थोड्या वेळाने त्याने मला शेजारच्या शय्यागृहात नेले आणि माझ्या वस्त्रांना हात घातला. माझी कल्पना अशी होती की, अब्दुलने याच माणसाची ओळख माझा भावी पती अशा शब्दात करून दिली होती. तरीही त्याने इतक्या निलाजरेपणाने माझ्याशी जवळीक करावी या गोष्टीचा मला राग आला; पण यातून माझी सुटका होणार नाही हे मी ओळखले. तरीही धीर धरून मी म्हणाले, 'हे पहा, आपले अजून लग्न झालेले नाही!' आणि अंग चोरून मी बाजूला झाले. माझ्या बोलण्याचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही. तो शांतपणे इतकेच म्हणाला, 'इतकेच ना. अग, आपण उद्या लग्न करणारच आहोत. मी काझीला बोलावूनही ठेवले आहे.' त्याच्या बोलण्याची विश्वासार्हता वाटत नसूनही तो जे म्हणत होता ते खरे आहे, असे समजून चालण्याखेरीज माझ्यासमोर पर्यायच नव्हता.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो निघून गेला. जाताना काहीशा करड्या आवाजात त्याने बजावले, घराबाहेर पडायचे नाही. त्याची आज्ञा मानणे भाग असल्यासारखी परिस्थिती आधीच निर्माण झाली होती. मी त्याचे म्हणणे मानले. आपले लग्न होणार आणि ते याच्याशीच होणार, अशी मी मनाची समजूत करून घेतली. तो गेल्यावर मी आंघोळ केली आणि त्याची वाट बघत बसले. मन धास्तावलेले होते. अनेक शंका मनात होत्या, तरीही तो काझीला घेऊन येईल असे वाटले होते; पण कोणीच फिरकले नाही. दुपारी तीनच्या सुमारास तो आला– त्याने खाण्यासाठी काही पदार्थ आणले होते. जेवण झाल्यावर पुन्हा कालच्याच प्रकाराची पुनरावृत्ती झाली. मी पुन्हा काझीबद्दल विचारले. त्याने उत्तर दिले, काळजी करू नकोस, मी लवकरच तुझ्याशी लग्न करणार आहे. हे काही खरे नाही असे मला वाटू लागले होते. काय करावे या विवंचनेमध्ये मी असतानाच संध्याकाळी आणखी चार पुरुष आले. त्यांच्या हातात दारूच्या बाटल्या होत्या. माझी चांगलीच घाबरगुंडी उडाली. आपण चुकीच्या लोकांच्या हातात पडलो आहोत, हे माझ्या लक्षात आले. आपल्या नशिबी काय वाढून ठेवले आहे या विवंचनेमध्ये मी असतानाच तो आत आला. त्याचे मित्र जिथे दारू पीत बसले होते तेथे त्याने मला ओढीत नेले. त्यांनी मला दारू देऊ केली; परंतु ती मी स्वीकारली नाही. माझ्या भावी पतीने मी दारू घ्यावी असा आग्रह केला. त्याला बरे वाटावे म्हणून मी दारू घेतली. मला गुंगी आल्यासारखे वाटू लागले. त्या तशा अवस्थेमध्ये ते सगळेजण माझ्याभोवती जमा झाले. त्यांच्यात्यांच्यात काही चर्चा झाली. चौघेजण बाहेर निघून गेले. जो आत होता त्याने प्रथम गोडीगुलाबीने आणि नंतर दमदाटी करून मला कपडे उतरवायला लावले. माझ्याशी लग्न करणार असे म्हणणाऱ्या गृहस्थाने जे आदल्या दिवशी रात्री केले आणि दुसऱ्या दिवशी दुपारी जो प्रकार त्याने पुन्हा केला तोच सारा प्रकार पुढे वाढून ठेवला होता. माणूस बदलला होता; परंतु वासनेने बरबटलेली त्याची नजर मला सारे काही सांगत होती. माझ्या प्रतिकाराशिवाय परंतु माझ्या इच्छेविरुद्ध त्या साऱ्या प्रकारातून मला जावे लागले. जाताना तो तसेच गोड बोलत होता. मी तुला साडी आणीन असे म्हणत होता. अंगावर असलेली साडी उतरवून नवीन साडीची आश्वासने देणाऱ्या त्याला मी ओळखले; पण आता उशीर झाला होता; पण एवढ्याने माझे दुर्दैव संपणार नव्हते. नशेच्या पुरेपूर अंमलाखाली असलेली आणखी तीन मंडळी बाहेर होती. त्या प्रत्येकाने केलेल्या अत्याचाराला मला तोंड द्यावे लागले. मी अगदी टेकीला आले. मनाला तर हा कोणताही प्रकार नकोच होता; पण आता शरीरही बोलू लागले होते. डोळ्यात प्राण आणून मी सांगितले, मला आता हे सोसवत नाही. वेदनांनी देह ठणकत होता, पण ते मानण्यास राजी नव्हते. एखाद्या श्वापदासारखे ते माझ्यावर तुटून पडले. माझे दुर्दैव तेवढ्याने संपण्यासारखे नव्हते. हा प्रकार मग नियमितपणे सुरू झाला. हेच भोग आपल्या नशिबी आहेत, असे मला वाटू लागले. माझ्या नकळत माझ्या वृत्तीत बदल होत होता. मी त्यांच्याबरोबर दारू घेऊ लागले. त्यांच्यासाठी कपडे उतरवू लागले.

त्यांच्यामधील एकजण केवळ तेवढ्याने समाधानी नव्हता. त्याच्याबरोबर माझा झगडा सुरू झाला. शेवटी त्याने सांगितले, हे पहा पैसे मोजून आम्ही तुला विकत घेतली आहे आणि आम्ही जे जे सांगू ते ते सारे तुला केलेच पाहिजे !

हे असेच चालू राहिले असते तर या मंडळींना हसीनाचा कंटाळा आल्यावर वेश्यांच्या भरलेल्या वस्तीत आणखी एकीची भर पडली असती आणि हसीनाची ही कथा कदाचित कधीच प्रकाशात आली नसती; पण तसे झाले नाही. या चांडाळचौकडीच्या हातून स्वतःची सुटका करून घेण्यात हसीना यशस्वी ठरली. या चौकडीचे अत्याचार ही रोजचीच गोष्ट झाल्यावर हसीना त्या जीवनाला रुळली आणि त्यांनाही तिच्याबद्दल विश्वास वाटू लागला. तिच्यावर पहिल्याइतकी कठोर बंधने राहिली नाहीत. ज्या माणसाने आपण तुझ्याबरोबर लग्न करू असे सांगितले होते त्याला हसीना आता आपल्या पूर्ण कह्यात आली असे वाटू लागले. जी हसीना बारा-पंधरा दिवस अगदी कडी-कुलपामध्ये बंदिस्त होती त्याच हसीनाला काही सवलती मिळू लागल्या. आपल्या आत्ताच्या आयुष्याला तर काही अर्थ नाहीच; पण आपण जर याच मार्गाने जात राहिलो तर आपली अखेर काय होणार ते हसीनाने ओळखले आणि म्हणूनच ती या चांडाळ-चौकडीच्या कचाट्यातून सुटण्याचा मार्ग शोधू लागली. एकदा तिच्या घराजवळून जाणाऱ्या एका माणसाला तिने हाकारले. तो बंगाली असावा असे तिला वाटले. तिचा अंदाज बरोबर होता. तो केवळ बंगाली नव्हता तर हसीना ज्या मदिनापूर जिल्ह्यातून आली होती त्याच मदिनापूर जिल्ह्याचा रहिवासी होता तो आणि सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो खरोखरच सज्जन गृहस्थ होता. इतके भोग भोगल्यानंतर का होईना, पण हसीनाचे नशीब उघडले होते. आपली सारी कथा हसीनाने त्याला ऐकविली. आपण काही तरी करू असे आश्वासन देऊन तो गेला आणि तासाभरातच आणखी काही मंडळींना घेऊन परत आला आणि हसीनाची सुटका झाली. ज्यांनी तिची सुटका केली त्या भल्या माणसांनी हसीनाला प्रश्न विचारला-'आम्ही तुला तुझ्या गावी पाठवू का?' आणि हसीनाला रडू कोसळले. आपल्या पतीबरोबर गावी जाऊन आपल्या भावंडांना धक्का देण्याचा तिचा विचार होता. ते सारे कल्पनाचित्र विरून गेले होते. एक कोवळी देहाती मुलगी पुरेपूर नासून गेली होती. प्रश्न विचारणारांना तिने प्रतिप्रश्न केला, 'आता कोणत्या तोंडाने मी गावी जाऊ? या अशा अवस्थेत गावी जाण्यापेक्षा मी मरण पत्करीन!' तिच्या या उत्तरानंतर कोणत्या तरी सुधारणा केन्द्रात तिची भरती करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली. या सुधारणा केन्द्रात तिला काही शिक्षण देण्यात येईल आणि स्वतःच्या पायावर ती उभी राहू शकेल अशी व्यवस्था होईल. फार काही चांगले आयुष्य तिच्या वाट्याला येईल असे नव्हे; परंतु एका ओंगळ जीवनातून तिची सुटका झाली हे नक्की! हसीना स्वतःची सुटका करून घेऊ शकली हे खरे; पण या बाबतची आकडेवारी भयावह आहे. पोलिसांकडे आलेल्या याबाबतच्या तक्रारींची दखल घेतली तर प्रतिवर्षी सुमारे अडीचहजार मुली शहरात विकल्या जातात आणि आपल्या धन्याचे चोचले पुरविल्यावर वेश्यावस्तीत भरती होतात. या मुलींमध्ये प्रामुख्याने बिहार, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल येथील तरुणींचा मोठा भरणा असतो.

याच प्रकाराला पूरक ठरेल अशी तवायफ मुलींसंबंधीची माहिती उजेडात आली आहे. तवायफ म्हणविणाऱ्या मुली देहविक्री करीत नाहीत. केवळ नाचून-गाऊन त्या गिऱ्हाइकांचे मनोरंजन करतात. पूर्वी राजेरजवाड्यांकडे त्यांचे मुजऱ्याचे कार्यक्रम होत असत. संस्थाने गेली आणि या तवायफ म्हणविणाऱ्या मुलींचे ताफे मुंबई, दिल्ली अशा शहरांमध्ये येऊन दाखल झाले. श्रीमंत उद्योगपती, फिल्मी कलाकार, बडे सरकारी अधिकारी यांच्यासाठी खाजगी मैफली झडू लागल्या. केवळ नाचगाण्यावर ज्यांचे समाधान होत नाही अशा मंडळींची इतर सोय करण्यासाठी चांगल्या वस्तीत फ्लॅटस भाड्याने घेतले जाऊ लागले. नाच-गाण्यांच्या मैफलींवर तर पाण्यासारखा पैसा खर्ची पडू लागला. असे सांगतात की, दिल्ली आणि मुंबईमधील उत्तम तवायफ एका रात्रीत दोन ते पाच हजार रुपये सहज जमा करू शकते आणि एका बाजूने पैशाची लालूच आणि दुसऱ्या बाजूने चैनीच्या राहणीमुळे निर्माण होणारी वाढती गरज यामुळे या मुली आस्ते आस्ते नाच-गाण्याच्या मर्यादा झुगारून देतात. अगदी अलीकडेच लखनौमध्ये अतिशय चांगल्या वस्तीत छापा घालून पोलिसांनी स्वतःला तवायफ म्हणवून देहविक्रय करणाऱ्या आठ मुलींना अटक केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या वस्तीमधील फार थोड्या मंडळींना इथे असला काही उद्योग चालतो याची कल्पना होती. म्हणजेच हा सारा व्यवहार किती गुप्तता पाळून व संभावितपणे केला जात असला पाहिजे याची कल्पना यावी. ज्या मुलींना पकडण्यात आले त्यांपैकी एका विधवेने असे सांगितले की, मला फसवून या इतर मुलींबरोबर आणण्यात आले. प्रथम घरकामासाठी म्हणून मला घेण्यात आले आहे असे भासविण्यात आले आणि नंतर पैशाचा लोभ दाखवून मला या व्यवसायात ओढण्यात आले. या व्यवसायात मला जेव्हा प्रथम ३०० रुपये मिळाले तेव्हा मी माझ्या पतीच्या निधनानंतर अपुरे राहिलेले धार्मिक विधिसंस्कार पूर्ण केले. आज ही मुलगी पोलिस कस्टडीमध्ये असून लवकरच इतर मुलींबरोबर तिलाही गुन्हेगार म्हणून उभे करण्यात येईल. ◻

## ◻ जनतेमधील वाढती नाराजी

जनता पक्षाच्या मोठ्या पुढाऱ्यांच्या मनस्थितीप्रमाणे आणि महत्त्वाकांक्षेप्रमाणे पक्ष दोलायमान अवस्थेमध्ये वाटचाल करीत असताना या पक्षाबद्दल जनतेमध्ये नाराजी कशी वाढत आहे, याची झलक पहाण्यासारखी आहे. दिल्लीच्या रस्त्यावरून धावणारी एक बस रस्त्यात बंद पडली. कंडक्टर चिडून म्हणाला, इंदिराजींचे राज्य असते तर असे झाले नसते. इंदिराजींच्या राज्याचा आणि बस बंद पडण्याचा तसा अर्थाअर्थी काही संबंध नाही. त्यामुळेच असेल कदाचित्; पण इंदिराजींचे अनंत अपराध माहीत असलेला एक जण म्हणाला – इंदिराजींनी काय भयंकर गोष्टी केल्यात याचा तुम्हाला इतक्यातच विसर पडलेला दिसतो. जिथे आता ही बस बंद पडली आहे ना, नेमक्या याच भागात कुटुंब नियोजनाच्या शेकडो शस्त्रक्रिया

करण्यात आल्या आणि त्या अत्याचारांचे बळी ठरलेल्या दोघांनी आत्महत्या केली. कंडक्टर प्रथम जेवढा वाटला तेवढा बावळट खचितच नसावा. त्याने लगोलग उत्तर दिले, 'भाईसाहब, समजा अगदी हजार शस्त्रक्रिया जरी झाल्या तरी त्यामुळे काय बिघडणार होते ? आणि तुम्ही म्हणता तसा साराच जुलुमजबरदस्तीचा मामला असेल हे मान्य केले तरी त्या पापांची इंदिराजींना पुरेपूर किंमत मोजावी लागली आहे. मतदारांनी त्यांना योग्य तो धडा दिलेला आहे; पण मला सांगा ज्यांच्या हाती कौतुकाने सत्ता दिली ते जनता सरकार आज काय करीत आहे ? ही बस कोण सुरू करणार ?' तेवढ्यात एकजण म्हणाला, 'अहो जनता सरकार भले कसेही असले तरी बस सुरू होत नाही म्हणून त्याचा बोल जनता सरकारला लावणे म्हणजे बरीक फारच झाले हो ! अहो, असल्या किरकोळ गोष्टीत जर सरकार अडू लागले तर ते या आपल्या अवाढव्य देशाचा कारभार कसा करणार?' आता त्याच्या या तर्कशून्य बोलण्यालाही काही सुसंगती आल्यासारखी दिसू लागली.

कदाचित् त्या कंडक्टरने गेल्या निवडणुकीमध्ये जनता पक्षाला आपले मत दिले असेल आणि या पक्षाच्या आणि सरकारच्या ज्या आरत्या वृत्तपत्रांतून झडत आहेत त्यामुळे तो जाम वैतागला असावा. कारण काहीही असो, पण एका सामान्य माणसाची ही तिखट प्रतिक्रिया पुरेशी बोलकी आहे. पक्षामधील मोठ्या नेत्यांच्या लठ्ठालठ्ठीत जनता पक्षाची प्रतिमा रोज डागाळून निघत आहे. एकमेकांबद्दल कडवट निवेदने तर प्रसिद्ध होत आहेतच; पण ती निवेदने आणि ती निवेदने करणारे नेते या दोघांचीही विश्वासार्हता नष्ट झाली आहे. चरणसिंग आणि राजनारायण यांना हुसकून लावण्याचा कट होता, असे एका राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी म्हणायचे आणि लगोलग काही तासातच आपले निवेदन मागे घ्यायचे, तडजोड झाल्याची घोषणा करायची आणि त्या घोषणेला संमती देणाऱ्या नेत्यांनीच मग तडजोड मसुद्याला उपकलमेही जोडायची, हा साराच प्रकार हास्यास्पद आहे. या शेतकरी मेळाव्यासाठी उत्तर प्रदेश, हरियाना, बिहारमधील तमाम शेतकरी आपआपले उद्योग-धंदे आवरून बसले आहेत, असे गृहीत धरून आकडेवारी द्यायची आणि त्याचबरोबर मेळावा रद्द झाल्याची फुसकुली सोडायची हे काय राजकारण आहे का पोरखेळ आहे, असे वाटावे इतक्या उथळ पातळीवर हे सारे चालले आहे. आकाशवाणीच्या रात्री नऊच्या वार्तापत्रामधील वार्ता ऐकून दिलासा टाकावा तर सकाळच्या वृत्तपत्रांनी पुन्हा सारी हवाच काढून घ्यावी. बातम्यांचा काटा असा तासातासागणिक वरखाली होत असताना आणि उलटचा सुलटचा दिशेने कसाही वेडावाकडा प्रवास करीत असताना ती १२ विलिंग्डन क्रिसेंटमधील बाई अगदी चुपचाप बसून या सर्कशीची मजा चाखीत आहे. रिंगमास्तर नसलेल्या या सर्कशीचे सुयोग्य संचालन करण्यासाठी जेव्हा केव्हा रिंगमास्टरची शोधाशोध सुरू होईल तेव्हा हुकमी हंटर चालविणारी आपल्यासारखी समर्थ रिंगमास्टरच लागेल याची तिला खात्री आहे. आचार्य कृपलानी या वयोवृद्ध नेत्याने या साऱ्या राजकारणाचे अंतिम परिणाम अचूक जोखले आहेत. एक वेळ अशी होती की, जेपींसारख्या नेत्याला गिरफदार करण्यासाठी फौजफाटा रवाना झाला त्या वेळी त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली होती. विनाशकाले विपरीतबुद्धि । पण हा विनाशकाल येण्यापूर्वी निदान दहा-बारा वर्षांचे भलेबुरे साचले होते. इथे तर वर्षभरात व्यक्तिगत महत्त्वाकांक्षांनी पछाडलेले हे नेते साऱ्या आकांक्षांना नख लावायला निघाले आहेत.

## टीकेविना

मंत्रिमहोदयांना एका विशिष्ट प्रकरणाचा खुलासा विचारणारी पत्रे रवाना झाली. पत्रांना उत्तर नाही म्हणून रजिस्टर्ड पत्रे झाली, तारा झाल्या; पण मंत्रिमहोदय आपले थंडच! आता काय करावे ? बराच विचारविनिमय झाल्यावर ज्या खात्यातर्फे हे खुलासा-प्रकरण हाताळण्यात येत होते त्या खात्याच्या एका जबाबदार अधिकाऱ्याने मंत्रिमहोदयांची प्रत्यक्ष गाठ घ्यावी आणि कसे का होईना पण काही तरी उत्तर त्यांनी द्यावे असे त्यांना सुचवावे, असा निर्णय घेण्यात आला. संबंधित अधिकारी मंत्रिमहोदयांच्या कचेरीत गेला. रीतसर वेळ मागून घेतली असल्याने आणि कामही सरकारी असल्याने त्याचे काम सोपे झाले. मंत्रिमहोदयांची चटकन गाठ पडली. थोडेफार इकडले तिकडले बोलणे झाल्यावर अधिकाऱ्याने विचारले, 'साहेब, या प्रकरणी आम्ही आपल्याला इतकी पत्रे पाठविली, तारा केल्या पण आपण काहीच दखल घेतली नाही. हे कसे ?' मंत्रिमहोदय शांतपणे म्हणाले, 'आता उत्तरादाखल काही लिहायचे म्हणजे हात हवेत, हो ना ?' अधिकाऱ्याने मान डोलविली. आणि 'मला वाटते मला फक्त दोन हात आहेत !' हो. अधिकाऱ्याने पुन्हा मानेनेच होकार भरला. 'माझ्या पक्षातून माझी हकालपट्टी होऊ नये यासाठी एका हाताने मला माझी टोपी घट्ट पकडून ठेवावी लागते आणि दुसऱ्या हाताने मी मंत्रिपदाची खुर्ची घट्ट पकडून ठेवीत असतो. मग मला सांगा जनतेच्या काही प्रश्नांबाबत तुम्ही जे खुलासे मागता आहात ते मी करणार तरी कसे ?' काय समजायचे ते समजून अधिकाऱ्याने काढता पाय घेतला.

□